CMYK

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | गुरुवार, ५ मार्च २०२६ । वर्ष ३ रे अंक ३६२ । पाने १२ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. dainiktarunbharat.com epaper.dainiktarunbharat.com

विनम्र अभिवादन



आम्ही जातो आपुल्या गावा ।
आमचा राम राम घ्यावा ॥
तुमची आमची हेचि भेटी ।
येथुनियां जन्मतुटी ॥
जगद्गुरू तुकोबारायांच्या
चरणी साष्टांग दंडवत

# बाप नाही काढायचा, भास्कर जाधव अन् कल्याणशेट्टी भिडले?

- विधानभवनाच्या परिसरातील शाब्दिक बाचाबाचीचा व्हिडीओ व्हायरल
- आ. कल्याणशेट्टी : विरोधी पक्षनेतेपद न मिळाल्याने जाधव व्यथित



**मुंबई, दि.४ मार्च-**
शिवसेना (ठाकरे) पक्षाचे आमदार भास्कर जाधव आणि भाजपाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची बुधवारी विधानभवनाच्या परिसरात शाब्दिक चकमक झाल्याचे पाहायला मिळाले. राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून या अधिवेशनाच्या दरम्यान हा प्रकार घडल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार भास्कर जाधव यांच्यात जोरदार वाद झाल्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

यामध्ये दोन्ही आमदारांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाल्याचे दिसत आहे. मात्र, हा वाद नेमकं का झाला? याचे कारण समोर आलं नसले तरी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी माध्यमांशी बोलताना आमदार भास्कर जाधव यांनी सत्ताधारी पक्षाबाबत बोलताना भाषा व्यवस्थित वापरली नसल्याचा आरोप केला आहे. तुम्ही बाप का काढायला लागलात? तुम्हाला बाप काढायचा अधिकार आहे का?, असे सचिन कल्याणशेट्टी यांनी भास्कर जाधव यांना म्हटले. त्यावर उत्तर देताना भास्कर जाधव म्हणतात की, हो आहे. त्यावर सचिन कल्याणशेट्टी हे भास्कर जाधवांना म्हणतात की, तुम्ही जेष्ठ सदस्य आहात. शांततेत बोला ना, वाद का करता? आणि बाप का काढायला लागलात? बाप नाही काढायला पाहिजे. त्यावर पुन्हा भास्कर जाधव म्हणतात की, तुम्ही एवढ्यावर थांबा आणि मी देखील एवढ्यावर थांबतो. पण तुम्ही जर पुन्हा तेच तेच बोलणार असाल तर मी बाप काढणार, असे भास्कर जाधव यांनी म्हटले. त्यानंतर सचिन कल्याणशेट्टी यांनी पुन्हा म्हटलं की, तुम्ही आमचा बाप काढला तर आम्ही तुमचा बाप काढणार. दरम्यान, आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार भास्कर जाधव यांच्याचील या वादाचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

यासंदर्भात प्रसारमाध्यमांना माहिती देताना आ. कल्याणशेट्टी यांनी सांगितले की, मी सभागृहात जात असताना भास्कर जाधव हे एका कर्मचाऱ्याबरोबर वाद घालत होते. भास्कर जाधव हे एका कर्मचाऱ्याबरोबर वाद घालत असताना असे म्हणत होते की, ही व्यवस्था काय सत्ताधारी पक्षाच्या बापाची आहे का? तेव्हा मी त्यांना सांगत होतो की तुम्ही जेष्ठ सदस्य आहात, सभागृहाच्या बाहेर लोकांना अशा पद्धतीने बोलू नका. सत्ताधारी पक्षाचा बाप काढू नका आणि तुम्ही तसे बोललात तर आम्हीही बोलू. पण महाराष्ट्राचे सर्वोच्च सभागृह आहे, तेथे अशा पद्धतीने बोलणं योग्य नाही, हेच भास्कर जाधवांना मी समजावत होतो. मात्र, भास्कर जाधव हे काही समजून घेण्याच्या मनस्थितीत नव्हते. कदाचित त्यांना जे अपेक्षित होते विरोधी पक्षनेता पद. पण ते त्यांना मिळत नसल्याने ते व्यथित झालेले असावेत, असे सचिन कल्याणशेट्टी यांनी म्हटले आहे. राजकारणात काही वैचारिक मतभेद असतात. मात्र, असे असले तरी कोणाच्या पक्षाचा बाप काढण्याची आणि अशा पद्धतीने बोलण्याची संस्कृती महाराष्ट्रात नाही. त्यामुळे मी हीच विनंती भास्कर जाधव यांना करत होतो, तुम्ही अशा प्रकारे बोलू नका. मात्र, भास्कर जाधव हे ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नव्हते. सत्ताधारी पक्षाचा बाप अशा शब्दांचा उल्लेख त्यांनी केल्यामुळे मला त्यांना बोलावे लागले, असे स्पष्टीकरण सचिन कल्याणशेट्टी यांनी दिले आहे.

## विचारपुष्प



राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंदू राष्ट्राच्या जीवनध्येयाची उत्क्रांती आहे. संघ काही सामान्य संघटना नाही तर राष्ट्राचे एक अविभाज्य अंग आहे, जो हिंदू राष्ट्राची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्थापन झाला आहे. संघ आणि राष्ट्र यांच्यात एक दिव्य आणि अतूट नाते आहे. संघ हिंदू राष्ट्राची नैसर्गिक अभिव्यक्ती आहे, जो समाजाचे संघटन करीत राष्ट्राला परम वैभवापर्यंत नेण्याचे कार्य करत आहे.

**- दादाराव परमार्थ**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## ‘तरुण भारत’च्या पुणे आवृत्तीचा उत्साहात शुभारंभ

**विशेष प्रतिनिधी**

**पुणे, ४ मार्च**
तब्बल शतकभराचा देदीप्यमान इतिहास असलेल्या दै. तरुण भारतची पुणे आवृत्ती आजपासून (५ मार्च) पुणेकर वाचकांच्या सेवेत रुजू झाली असून, तिचे पुणे परिसरात उत्साहात स्वागत करण्यात आले. वाचकांनी तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांनी तरुण भारतला पहिल्या दिवसापासून मोठे पाठबळ दिले आहे.

दि. ५ मार्च पासून पुण्यात सुरू झालेल्या तरुण भारतच्या पहिल्या अंकाच्या वितरणासाठी पहाटेपासून पुण्यातील वृत्तपत्र वितरण केंद्रांवर लगबग सुरू होती. स्टॉल्सवर देखील असंख्य वाचकांनी या दैनिकाच्या प्रती विकत घेतल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि तरुण भारतची शताब्दी असा योग साधून नागपूरच्या श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेने पुण्यातून तरुण भारत सुरू केला आहे. नागपूर आणि विदर्भातील वाचकांच्या बळावरच आम्हाला हे पाऊल टाकता आले असल्याचे सांगत, पुण्यातही या राष्ट्रीय विचारांच्या दैनिकाला मोठा वाचकाश्रय लाभेल, असा विश्वास श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेचे प्रबंध संचालक धनंजय बापट यांनी व्यक्त केला आहे. पुणे वृत्तपत्र विक्रेता संघाने, विशेषतः वृत्तपत्र विक्रेता संघाचे अध्यक्ष विजय पारगे, मुख्य वितरक निर्मलदत्त एजन्सीचे धनंजय लांडे आणि छपाईसाठी राणे प्रकाशनाचे लक्ष्मण मोरे यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल बापट यांनी आभार मानले आहेत.

पुणे तरुण भारतचे कार्यालय पौड रोड, कोथरूड, पुणे येथे असून, वारजे येथील प्रहार प्रिंटिंग प्रेसमध्ये त्याचे मुद्रण केले जाते. दर्जेदार छपाई, वैचारिक खाद्य देणाऱ्या मागोवा आणि आसमंत या दोन पुरवण्या, दररोज किमान एक फिचर पेज यासह भरगच्च मजकूर या दैनिकातून रोज वाचकांना दिला जाणार आहे. ■

# इराणची युद्धनौका बुडविली

## अमेरिकेचा लंकेजवळ हल्ला; ८० खलाशांचा मृत्यू, ३२ जणांना वाचवले

**कोलम्बो, ४ मार्च**
भारतात अलिकडेच झालेल्या सरावात सहभाग घेतल्यानंतर परतणारी इराणी नौदलाची युद्धनौका अमेरिकेच्या पाणबुडीने हल्ला करीत श्रीलंकेच्या तटवर्ती भागाजवळ बुडवली. या नौकेने आपत्कालीन मदत मागितली होती. त्यानंतर श्रीलंकेच्या नौदलाने वेगाने शोध व बचाव मोहीम राबवली. नौकेवरील ८० खलाशांचा मृत्यू झाला, तर ३२ जणांना श्रीलंकेच्या नौदलाने वाचवले, अशी माहिती श्रीलंका नौदलाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

अमेरिकी नौदलाच्या पाणबुडीने आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात इराणी नौदलाच्या नौकेवर टॉरपिडोने हल्ला करून ती बुडवली, असा दुजोरा अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी दिला. श्रीलंकेच्या दक्षिणेकडील तटवर्ती भागात अमेरिकी पाणबुडीने हल्ला केल्याचे त्यांनी सांगितले.

मॉडज क्लासची फ्रिगेट आयआरआयएस डेना श्रीलंकेच्या दक्षिणेला ४० नॉटिकल मैलांवरील आंतरराष्ट्रीय पाण्यात बुडाली, असे श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. नौकेवरील ३२ जणांना वाचवण्यात यश आले आणि समुद्रातून काही मृतदेह काढण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.



परतीचा प्रवास सुरू करण्यापूर्वी इराणची ही युद्धनौका भारतातील इंटरनॅशनल फ्लीट रिव्ह्यू-२०२६ मध्ये सहभागी झाली होती. बुडण्याच्या दोन आठवड्यांपूर्वी भारताच्या निमंत्रणावरून आलेल्या या नौकेचे स्वागत भारतातील बंदरावर ईस्टर्न नेव्हल कमांडने केले होते. ही घटना श्रीलंकेच्या प्रादेशिक पाण्याच्या पलीकडे घडली.

मात्र, आपत्कालीन मदतीची विनंती आल्यानंतर आम्ही वेगाने धाव घेतली, असे श्रीलंकेचे परराष्ट्र मंत्री विजिथा हेराथ यांनी सांगितले. या नौकेवर पाणबुडीने हल्ला करण्यात आला. नौकेवरील ८० खलाशांचा मृत्यू झाला, असे श्रीलंकन नौदलातील सूत्रांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### जखमींवर गॅलेत उपचार

जखमी झालेल्या ३२ जणांची नौकेवरून सुटका करण्यात आली आणि त्यांच्यावर दक्षिणेतील बंदराचे शहर गॅलेतील अत्याधुनिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत, असे सूत्रांनी सांगितले. ■

### इतर नौका किंवा विमान दिसले नाही

इराणच्या नौकेवरून आपत्कालीन परिस्थितीत मदत मागण्यात आल्यानंतर परिसरात कोणतीही नौका किंवा विमान दिसले नाही. मदतकार्यात सहभागी झालेल्या श्रीलंका वायुदलाला या परिसरात कोणतेही विमान दिसले नाही किंवा कोणतीही असामान्य हवाई हालचाल आढळली नाही. ■

| युद्धाने आर्थिक संकट गडद | इस्रायलच्या कारवाईने लेबनॉन हादरले | होर्मुझची सामुद्रधुनी इराणच्या ताब्यात | युद्धात ‘एआय’ ठरले अमेरिकेचे सर्वांत शक्तिशाली शस्त्र | मोजतबा इराणचे नवे नेते |
|---|---|---|---|---|

## महत्त्वाचे



फिन ॲलन
धावा : १००
चेंडू : ३३
चौकार : १०
षटकार : ८

### न्यूझीलंड दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत

**कोलकता** : न्यूझीलंडने दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. बुधवारी झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात त्यांनी दक्षिण आफ्रिकेवर ९ गडी राखून मात केली २०२१ नंतर न्यूझीलंडचा संघ पहिल्यांदाच अंतिम फेरीत पोहोचला. कोलकात्यातील ईडन गार्डन्स स्टेडियमवर झालेल्या सामन्यात न्यूझिलंडचा कर्णधार मिचेल सँटनरने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेने निर्धारित २० षटकांत ८ बाद १६९ धावा केल्या. त्यांच्या मार्को जेन्सनने (नाबाद ५५) शानदार अर्धशतकी खेळी केली. न्यूजिलंडकडून मॅट हेन्री, कोल मॅकॉंची व रॅचिन रविंद्रने प्रत्येकी दोन गडी बाद केले. न्यूझीलंडने विजयी १७० धावांचे लक्ष्य १२.५ षटकांत १ गडी गमावून पूर्ण केले. फिन ॲलनने ३३ चेंडूंत १०० धावांची नाबाद खेळी केली. त्यात १० चौकार व ८ षटकारांचा समावेश आहे. त्याने टी-२० विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वात जलद शतक ठोकले.

## राज्यसभेसाठी विनोद तावडे, माया इवनाते, रामराव वडकुतेंना संधी

### रामदास आठवलेंना पाठविणार वरिष्ठ सभागृहात



**मुंबई, ४ मार्च**
महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागांसाठी १६ मार्च रोजी होणाऱ्या निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर भारतीय जनता पार्टीने आपल्या कोट्यातील चार उमेदवारांची घोषणा केली आहे. ज्येष्ठ नेते विनोद तावडे, नागपूरच्या माजी महापौर मायाताई इवनाते, रामराव वडकुते यांना उमेदवारी दिली. तसेच केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनाही पुन्हा संधी देण्यात आली आहे.

विधानसभेतील संख्याबळाच्या समीकरणानुसार महाराष्ट्रातील सातपैकी चार जागांवर भाजपचे उमेदवार निर्विवाद राज्यसभेवर जाणार आहेत. तर, महायुतीतील अन्य शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाट्याला प्रत्येकी एक जागा मिळणार आहे. राष्ट्रवादीकडून पार्थ पवार यांच्या नावाची चर्चा असून, शिवसेनेने अद्याप आपले पत्ते उघडलेले नाही. मात्र, राहुल शेवाळे यांची वर्णी लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे. (तभा वृत्तसेवा)

## शरद पवारांचा राज्यसभेचा मार्ग मोकळा

### विलीनीकरणाचा मुद्दा संपुष्टात; उमेदवारीमुळे मतफुटीला ‘ब्रेक’ लावण्यात यश

**मुंबई ४ मार्च**
राज्यसभेच्या एका जागेसाठी सुरू असलेल्या ‘मविआ’तल्या धुसफुशीवर शरद पवारांच्या उमेदवारीचा उतारा लागू करण्यात आला आहे. शिवसेना उबाठा आणि काँग्रेसमधील मतभेद दूर करण्यात मविआच्या नेत्यांना यश आल्याने शरद पवार यांचा राज्यसभेत जाण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. काँग्रेसच्या हायकमांडची भूमिका महत्त्वाची ठरली.



दरम्यान, दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावरून सुरू असलेल्या चर्चेला पूर्ण विराम देत, जयंत पाटील यांनी आम्ही मविआतच असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे काँग्रेस आणि उबाठा पक्षाचा जीव भांड्यात पडला आणि मविआकडून शरद पवारांसाठी राज्यसभेचा मार्ग मोकळा झाला.

**विलीनीकरण थांबल्यानेच...?**
रिक्त झालेल्या राज्यसभेच्या ७ जागांपैकी संख्याबळानुसार मविआच्या पदरात केवळ एक जागा आहे. त्यामुळे या जागेवर शरद पवार यांना संधी द्यावी, यासाठी शरद पवार गटाकडून उबाठा आणि काँग्रेसकडे साकडे घालणे सुरू होते. विलिनीकरणाची कल्पना दुसऱ्या गटाकडून पुढे आली होती; मात्र सध्याच्या परिस्थितीत त्याबाबत कोणतीही हालचाल सुरू नसल्याचे सांगून जयंत पाटील यांनी मविआच्या मित्रपक्षांना विश्वास दिला. (तभा वृत्तसेवा)

### काय होती काँग्रेस-उद्धवसेनेची शंका ?

राकॉंच्या संभाव्य विलीनीकरणामुळे राज्यसभेची जागा शरद पवार गटाला दिल्यास ती जागा पुढे एनडीएकडे जाऊ शकते, अशी भीती काँग्रेस आणि उद्धवसेना गटात व्यक्त होत होती. या पृष्ठभूमीवर, विलीनीकरणाचा विषय कायमचा बंद झाल्याची घोषणा करून राकॉंने मित्रपक्षांची शंका दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. ■

## बोगस प्रमाणपत्रांवर नोकरी करणारे ३१६ अधिकारी निलंबित

### राज्यातील ६,२१८ जणांची पडताळणी पूर्ण

**मुंबई, ४ मार्च**
बोगस दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय नोकरी मिळवणाऱ्या ३१६ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना राज्य सरकारने जबर धक्का दिला आहे. ४० टक्क्यांहून कमी दिव्यांग असलेल्या आणि बोगस प्रमाणपत्र सादर केलेल्या तब्बल ३१६ जणांना दिव्यांग कल्याण विभागाने निलंबित केले आहे, अशी माहिती मंत्री अतुल सावे यांनी दिली. भाजपाचे आमदार श्रीकांत भारतीय यांनी लेखी प्रश्नाच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित केला होता.

राज्यातील २८ जिल्हा परिषदेत पडताळणीअंती प्रमाणपत्र नसलेले, बनावट दिव्यांग प्रमाणपत्र आणि ४० टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांगत्व असलेल्या ३१६ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. भाजपा आमदार श्रीकांत भारतीय यांनी या संदर्भात उपस्थित केलेल्या लेखी प्रश्नावर मंत्री अतुल सावे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात २८ जिल्हा परिषदांचा अंतरिम अहवालात १० हजार ९२२ दिव्यांग अधिकाऱ्यांची नोंद असल्याचे स्पष्ट झाले आहे. यापैकी ६,२१८ कर्मचाऱ्यांची पडताळणी पूर्ण झाली आहे. यातील ३१६ अधिकारी-कर्मचारी दिव्यांगांसदर्भात असलेल्या नियमावलीत बसत नसल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांचे निलंबन करण्यात आले आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या कलम ९१ नुसार, बनावट दिव्यांग प्रमाणपत्र आढळल्यास संबंधित व्यक्तीला २ वर्षांपर्यंत कारावास किंवा १ लाख रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकते.

## नेपाळमध्ये आज सार्वत्रिक निवडणूक

**काठमांडू** : गेल्या वर्षी सप्टेंबर मध्ये ओली सरकारविरोधात झालेल्या जनरेशनल झेडच्या आंदोलनानंतर गुरुवारी, ५ मार्च रोजी नेपाळमध्ये सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. सकाळी ७ वाजतापासून मतदानास सुरुवात होणार असून, सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान करता येईल, त्यानंतर मतमोजणीस सुरुवात होणार आहे.

## शेअर बाजार कोसळला

**मुंबई** : भारतीय शेअर बाजारात सलग तिसऱ्या दिवशी मोठी घसरण झाली. अमेरिका- इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष आणखी वाढण्याची चिन्हे असल्यानं मुंबई शेअर बाजार निर्देशांक आणि राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमध्ये घसरण झाली. कच्च्या तेलाच्या दरात वाढ झाल्यानं महागाई वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे फेड रिझर्व्ह आणि भारतीय रिझर्व्ह बँकेकडून व्याज दरात कपात होण्याची शक्यता कमी असल्याने याचा परिणाम बाजारावर झाला. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ११,२३ अंकांनी घसरून ७९,११६ अंकांवर बंद झाला. निफ्टी ३८५ अंकांनी घसरून २४,४८० पातळीवर बंद झाला. बीएसई १५० मिडकॅप निर्देशांक २.२६ टक्क्यांनी आणि बीएसई २५० स्मॉलकॅप निर्देशांक २.२४ टक्क्यांनी कमी झाला

## जिल्ह्यात पेट्रोल-डिझेल व गॅसचा पुरेसा साठा



**सोलापूर, दि. ४ मार्च-**
सोलापूर जिल्ह्यात पेट्रोल-डिझेलचा कोणताही तुटवडा निर्माण होणार नाही, याबाबत जिल्हा प्रशासनाने ठोस उपाययोजना केल्या आहेत.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या निर्देशानुसार आज जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी Indian Oil Corporation Limited, Bharat Petroleum Corporation Limited व Hindustan Petroleum Corporation Limited या तीनही तेल कंपन्यांच्या सेल्स ऑफिसर्सची तातडीची बैठक घेऊन इंधन साठा व पुरवठा याबाबत सविस्तर आढावा घेतला. सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी इंधन पुरवठ्याच्या अनुषंगाने कोणत्याही अफवावर विश्वास ठेवू नये. जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे सांगितले. पाकणी डेपो येथील तिन्ही कंपन्यांच्या ऑइल डेपो मॅनेजर्ससोबत चर्चा करून डिझेल-पेट्रोल साठ्याची स्थिती व इंधन वितरणाची तयारीची खात्री करण्यात आली. तसेच जिल्ह्यात कुठेही तुटवडा भासणार नाही, याबाबत संबंधित कंपन्यांकडून लेखी आश्वासनही प्रशासनाने घेतले आहे.

## कोणालाही पाठीशी घालणार नाही : मुख्यमंत्री

**मुंबई** : राऊळगाव येथील एसबीएल एनर्जी लिमिटेड मध्ये झालेल्या भीषण स्फोटप्रकरणी एफआयआर दाखल असून, २१ जणांवर गुन्हे दाखल झाले व ११ जणांना अटक झाली आहे. या कारवाईत कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकाचाही समावेश आहे. त्यामुळे या घटनेत कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सभागृहात ठामपणे सांगितले.

## मिनी मंत्रालयाच्या ‘कारभाऱ्यांचा’ ‘योग्य’ निर्णय तुम्हीच घ्या!

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पालकमंत्री गोरेंना सूचना

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**
जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि पंचायत समितीचे सभापती, उपसभापती कोण होणार? या नूतन पदाधिकाऱ्यांच्या नावाचा फैसला करण्यासाठी बुधवार, दि. ४ मार्च रोजी सकाळी १० वाजता मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानभवनात बैठक घेतली. मिनी मंत्रालयाच्या ‘कारभाऱ्यांचा’ योग्य फैसला पालकमंत्री जयकुमार गोरे आणि पदाधिकाऱ्यांनीच घ्यावा, अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत. येत्या १२ मार्चला पंचायत समिती सभापती तर १८ मार्चला जिल्हा परिषद अध्यक्षांच्या नावांची घोषणा होणार असल्याची माहिती भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी दै. तरुण भारतशी बोलताना दिली.




पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, आ. समाधान आवताडे, भाजपा अध्यक्ष शशिकांत चव्हाण, माजी आ. दिलीप माने, यशवंत माने, राजाभाऊ राऊत यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री जयकुमार गोरे हे शनिवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी सोलापूर दौऱ्यावर असतानाच जिल्हा परिषद गटनेता, अध्यक्ष-उपाध्यक्ष आणि पंचायत समिती सभापती-उपसभापती आदींच्या नावावर सर्वानुमते शिक्कामोर्तब झाल्याचे समजते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी चर्चा करून नावेही फायनल झाली आहेत.

**स्वीकृत सदस्यांच्या प्रस्तावाचा अजून जीआर नाही**
जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी स्वीकृत सदस्य नियुक्तीचा नवा पॅटर्न ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांनी तयार केला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्य निवडीसाठीचा प्रस्ताव त्यांनी तयार करून मंजुरीसाठी मंत्रालयाकडे सादर केला आहे. या प्रस्तावाची फाईल सध्या मंजुरीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या टेबलवर असून, अद्याप जीआर निघालेला नाही, अशी माहिती भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तुकया रंगी रंगले



माझ्या तुकोबांची वाणी
गाते विठोबांची गाणी ।।
माझ्या तुकोबांची वीणा
वाजे मंजूळ तराणा ।।
माझ्या तुकयाची माळ
जडे पंढरीशी नाळ ।।
माझ्या तुकयाची चिपळी
रमे तिथे वळमाळी ।।
माझ्या तुकयाचे अभंग
चढे भक्तीचा की रंग ।।
माझ्या तुकयाचा शेला
झाला विठ्ठलाचा भूला ।।
माझ्या तुकोबांची गाथा
तिथे ठेवितो मी माथा ।।
तुकया रंगी रंगले
मन तिथेच दंगले ।।

- शरदकुमार एकबोटे

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापनेपासून तळागाळात जाऊन काम करतोय

## विराट हिंदू संमेलनात ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**पुणे दि. ४ मार्च-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापनेपासून तळागाळात जाऊन काम करतोय. स्वातंत्र्य आंदोलनात संघाने सक्रीय सहभाग घेतला होता. तसेच फाळणीनंतर सर्वांच्या पुनर्वसनासाठी संघाने मोलाचे योगदान दिले. असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांनी केले.

सकल हिंदू समाजाच्या वतीने नुमवी प्रशालेत आयोजित हिंदू संमेलनाप्रसंगी ते बोलत होते.यावेळी दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाचे अध्यक्ष सुनील रासने, आमदार हेमंत रासने, नगरसेवक कुणाल टिळक,नगरसेविका स्वप्नाली पंडित आदि उपस्थित होते. यावेळी विश्व संवाद केंद्राच्या संपादक अंजली



तागडे यांनी पंच परिवर्तन संकल्पना काय आहे याबाबत माहिती दिली.स्वबोध, नागरी कर्तव्ये, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संरक्षण, सामाजिक समरसता या पाच बिंदुंच्या आधारे संघ सकारात्मक आणि रचनात्मक कार्यावर भर देत असून प्रत्येकाने स्वतःपासून आपल्या जीवनात, समाजात हे विषय कसे रुजवायचे याविषयी माहिती दिली. तसेच यावेळी काही वैयक्तिक आणि सामाजिक संकल्प मांडून ते आचरणात आणण्याचे आवाहन त्यांनी केले. तर डॉ. भावार्थ देखणे यांनी संत परंपरेच्या माध्यमातून हिंदू धर्म आणि आचार या विषयावर आशीर्वचन दिले. भारतमाता, छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन आणि शंख वादनाने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.माही जोशी आणि अंतरा मिणियार यांनी गणेशवंदना,शिववंदना सादर केली. वेद पाठशाळेतील विद्यार्थ्यांनी रुद्रपठण केले.या हिंदू संमेलनात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सूत्रसंचालन चैतन्य कुसूरकर यांनी केले. अरुंधती शहा यांनी म्हणलेल्या संपूर्ण संपूर्ण वंदे मातरम् ने संमेलनाची सांगता झाली.

## महत्वाचे...



### एसव्हीसीएस प्रशालेत विज्ञान दिन

**सोलापूर, दि. ४ मार्च-**

एस.व्ही.सी.एस.हायस्कूल एमआयडीसी येथे मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांच्या मार्गदर्शनाखाली थोर शास्त्रज्ञ नोबेल पारितोषिक विजेते डॉ. सी. व्ही. रमण यांचा जन्मदिन राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. प्रारंभी डॉ. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन उपमुख्याध्यापक धनंजय नकाते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे व पर्यवेक्षक केदार पटणे यांची प्रमुख उपस्थिती होती. विज्ञान दिनानिमित्त प्रशालेत विज्ञान प्रदर्शन, प्रयोग सादरीकरण, मॉडेल व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. पाचवीच्या विद्यार्थ्यांनी 'बॅलन्स डाइट' या विज्ञान नाटकातून पोषणाचे महत्व व सहावीच्या विद्यार्थ्यांनी प्लास्टिक पिशव्यांच्या वापराने होणारे हानिकारक परिणाम व्यक्त केले व कापडी पिशवी वापरण्याचा संदेश दिला. अनुष्का पाटील यांनी सूत्रसंचालन तर गौरव समाणे यांनी आभार मानले.

### द वेल्थ कंपनी म्युच्युअल फंडचा स्मॉल कॅप क्षेत्रात प्रवेश

**सोलापूर, दि. ४ मार्च-**

देशातील वेगाने वाढणारी मालमत्ता व्यवस्थापन कंपनी द वेल्थ कंपनी म्युच्युअल फंडने स्मॉल कॅप श्रेणीत पाऊल टाकत आपली नवीन योजना द वेल्थ कंपनी स्मॉल कॅप फंड लाँच करण्याची घोषणा केली आहे. गेल्या आठ महिन्यांतील हा कंपनीचा नववा फंड असून, सक्रियपणे व्यवस्थापित धोरणांमध्ये आपला विस्तार अधिक वेगवान करण्याचा कंपनीचा मानस आहे. जुलै २०२५ पासून या एएमसीने इक्विटी, हायब्रीड आणि पॅसिव्ह अशा विविध धोरणांचा समावेश असलेले उत्पादन संच तयार केले आहेत. हा फंड इक्विटी स्मॉल कॅप श्रेणीमध्ये वर्गीकृत आहे. सेबीच्या नियमांनुसार, बाजार भांडवलानुसार २५१व्या क्रमांकावर आणि त्यापुढील कंपन्यांमध्ये (स्मॉल कॅप) या योजनेच्या निव्वळ मालमत्तेपैकी किमान ६५ टक्के गुंतवणूक केली जाईल. या फंडाची तुलना निफ्टी स्मॉलकॅप २५० टीआरआय शी केली जाईल.

### पत्रकार भवन येथून चोरीला गेली दुचाकी

**सोलापूर, दि. ४ मार्च-**

पत्रकार भवन येथे पार्क केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे त्याप्रकरणी सदर बाजार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यात हकीकत अशी की, दि. २८ फेब्रुवारी रोजी विश्वनाथ पंडित सोरेगावकर राहणार बनसिद्ध नगर सोरेगाव यांची निळे काळ्या रंगाची हिरो होंडा १५ हजार रुपये किमतीची मोटरसायकल क्रमांक एम एच १३ बिडी ०५३२ ही पार्क पत्रकार भवन जवळ पार्क केली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात दिनांक ३ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास चव्हाण करत आहेत.



# कंदर-सातोली शिवरस्ता तातडीने दुरुस्त करा

### अन्यथा ६ मार्चला आत्मदहनाचा इशारा

### चार वर्षापासून रस्ता अर्धवट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

करमाळा तालुक्यातील कंदर- सातोली हा अडवलेला शिवरस्ता तातडीने दुरुस्त करून देण्यात यावा अन्यथा ६ मार्च रोजी याच रस्त्यावर आत्मदहन करण्याचा इशारा येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रांत अधिकारी यांच्याकडे २०२३ पासून तक्रार करूनही अद्याप पर्यंत या रस्त्याची पाहणी करण्यात आलेली नाही किंवा मदत केली नसल्यामुळे आमचे आर्थिक, शैक्षणिक मोठे नुकसान झाले असल्याने, आम्हाला



जगणे नकोसे झाले आहे. त्यामुळे ६ तारखेपर्यंत हा रस्ता भरून द्यावा अन्यथा ६ मार्च शुक्रवार रोजी कुटुंबासह याचा रस्त्यावर आत्मदहन करणार असल्याचे नागनाथ चव्हाण, सिद्धेश्वर गोडसे, हनुमंत साळुंके, राजेंद्र जगताप, सचिन जाधव, दशरथ बारबोले, शिवाजी साळुंके अजित फरताडे, संतोष पवार यांनी सह कुठून करणार असल्याचे कळवण्यात आले आहे. या रस्त्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी दखल घेतली आहे. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्र्यासह पोलीस अधीक्षक प्रांताधिकारी तहसीलदार पोलीस स्टेशन यांना देण्यात आलेल्या आहे.

> **रस्त्यासाठी आत्मदहन**
>
> २०२३ सालापासून आम्ही घराकडे आणि शेतामध्ये जाणाऱ्या रस्त्या करिता तहसीलदार, प्रांत यांच्याकडे मागणी करत आहोत मात्र आमचा हा प्रश्न सोडवला जात नाही. आम्हाला आमचा हक्काचा रस्ता करून मिळावा. याकरिता आम्ही अडविलेल्या रस्त्यावरच आत्मदहन करत आहोत.
>
> **- नागनाथ चव्हाण, शेतकरी**



## मध्य रेल्वेच्यावतीने सेवा संकल्प ठराव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने ऐतिहासिक सेवा संकल्प ठराव वर चर्चा करण्यासाठी एक बैठक घेतली. या बैठकीचे अध्यक्षस्थान विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा यांनी सेवा संकल्प ठराव वाचून दाखवला. त्यानंतर त्याच्या मार्गदर्शक तत्त्वांवर आणि विभागातील प्रभावी अंमलबजावणीवर चर्चा झाली. याबैठकीत पायाभूत सुविधा विकासाद्वारे कर्मचारी कल्याण, डिजिटल उपक्रमांद्वारे पारदर्शकता, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, नागरिक-केंद्रित सेवा वितरण, ऐतिहासिक मैलाचा दगड या विषयांवर चर्चा करण्यात आली.

सत्तेपेक्षा सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित केले जाईल आणि १.४ अब्ज नागरिकांच्या कल्याणाला प्राधान्य दिले जाईल. धोरणनिर्मितीमध्ये पारदर्शकता, प्रतिसाद आणि संविधानाचे पालन यावर भर देण्यात आला. केंद्रीय मंत्रिमंडळाने 'विकसित भारत २०४७' च्या दृष्टिकोनाप्रती आपली वचनबद्धता पुन्हा एकदा निश्चित केली, ज्याचे उद्दिष्ट स्वातंत्र्याच्या शताब्दीपर्यंत भारताला विकसित आणि स्वावलंबी राष्ट्रात रूपांतरित करणे आहे.

# पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून जनता दरबार

### तक्रार निवारण दिनाचे आयोजन; नागरिकांनी व्यक्त केले समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

नागरिकांचे तक्रारींचे निराकरण करण्याकरिता जनता दरबार व तक्रार निवारण दिन अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, यांच्या संकल्पनेतुन अलंकार हॉल पोलीस मुख्यालय येथे आयोजन केले होते.

जनता दरबार व तक्रार निवारण दिन अनुषंगाने सुमारे १२४ तक्रारदार उपस्थित होते. प्रामुख्याने नागरिकांनी जमिनीच्या कारणांवरुन, कौटुंबिक कारणांवरुन, शिवीगाळ व दमदाटी केल्याचे कारणांवरुन तसेच घरगुती कारणांवरुन असलेल्या तक्रारी समक्ष मांडल्या. तक्रारदारांच्या तक्रारींचे जागेवरच निराकरण करुन



त्याच्यावरती तात्काळ कारवाई करण्यासाठी संबंधित पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या.

जिल्ह्यातील २३२ तक्रारी अर्जावर कार्यवाही करुन त्याचा निपटारा करण्यात आला. ज्या तक्रारीमध्ये गुन्हा दाखल करायचा आहे. त्यावर योग्य ती चौकशी करुन कायदेशीर कार्यवाही करणेबाबत स्पष्ट सुचना देण्यात आल्या आहेत. जनता दरबार व तक्रार निवारण दिन आयोजन करुन त्याचे पूर्तता करण्याकरीता अर्ज शाखेकडील उस्मान शेख पोसई पोहेकॉ ज्योती कोरे, पोकॉ सचिन चव्हाण, पोकॉ तांबोळी, मपोकॉ कुर्ले यांनी उपस्थित सर्व तक्रारदारांचे तक्रारीवर तात्काळ कारवाई होणेकरिता संबंधित पोलीस ठाणे यांच्यासमक्ष हजर ठेवून प्रसंगी पाठपुरावा करुन तक्रारदारांचे निरसन कसे होईल याकरीता प्रयत्न केले आहेत. महिला शाखा भरोसा सेल पथकामधील मसपोफौ गंगुबाई कवचाळे, मपोहवा मोहिणी भोगे, मपोकॉ मधुमती शिंदे, मपोकॉ अर्चना मस्के असे सुरुवातीपासून हजर राहून अनेक कौटुंबिक तक्रारीचे समुदेशन करुन समाधान केले आहे.

## राहत्या घरातून चोरीला गेले चार तोळे सोने व रोख रक्कम

**सोलापूर, दि. ४ मार्च-**

राहत्या घरातून बेडरूम मधील लोखंडी कपाटातील चार तोळे सोन्याचे पाटल्या व रोख रक्कम असा एकूण २ लाख ५४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला असल्याबाबतचा गुन्हा बहिणी विरोधात दाखल झाला आहे. या हकीकत अशी की, दि. १८ फेब्रुवारी रोजी सचिन नागेश चव्हाण (रा. ४९०, पूर्व मंगळवार पेठ) यांच्या राहत्या घरातून सचिन यांची बहीण ज्योती नागेश चव्हाण (रा. पूर्व मंगळवार पेठ) यांनी आई मीनाक्षी यांच्या बेडरूम मधील लोखंडी कपाटातील चार तोळे सोन्याचे पाटल्या व रोख रक्कम असा एकूण २ लाख ५४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला असल्याबाबतचा गुन्हा जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. पुढील तपास शेख करत आहेत.



## भाषा हे संस्कृती वहनाचे प्रभावी माध्यम : डॉ. उघडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

भाषा केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृती आणि परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोहोचवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. मराठी भाषेचा वारसा जपणे हे प्रत्येक मराठी भाषकाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन प्रा. वसुंधरा कला महाविद्यालयाचे डॉ. सुहास मुरलीधर उघडे यांनी केले.

नेहरू नगर येथील श्री सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन येथे मराठी राजभाषा गौरव दिन सप्ताह व कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि प्रतिमेच्या पूजनाने झाली.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मागास समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष सुभाष चव्हाण व विवेक चव्हाण उपस्थित होते. प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्या कलाश्री देशपांडे यांनी केले. कार्यशाळेस डॉ. समिना नदाफ व डॉ. लालसिंग रजपुत यानी व्याख्याते म्हनुन विद्यार्थानां मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन रेवणसिद्ध कट्टे व प्रतिमा स्वामी यांनी केले. निखिल घोडके यांनी आभार मानले.


# ९ मार्चपासून झेडपी शाळा भरणार सकाळच्या सत्रात

### हॉट मार्च; उन्हाचा वाढता तडाखा

**.तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मार्च-**

मार्चच्या सुरुवातीलाच सोलापूर जिल्ह्यात तापमानाने उच्चांक गाठला असून मंगळवारी यंदाच्या उन्हाळ्यातील तब्बल ३८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. हवामान खात्याच्या अंदाजानुसार संपूर्ण मार्च महिना उष्णतेचा असणार असून तापमान ३३ ते ३९ अंश सेल्सिअसदरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाढत्या उष्णतेचा परिणाम विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होऊ नये, यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळा ९ मार्चपासून सकाळच्या सत्रात भरविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शाळांची वेळ सकाळी ७ ते ११.४५ अशी राहणार आहे. यासंदर्भातील अंतिम निर्णय जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम दोन-तीन दिवसांत घेणार आहेत.

सोलापूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकूण २,७९५ शाळा असून त्यामध्ये सुमारे पावणेदोन लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. गेल्या तीन दिवसांत तापमानाचा पारा ३६ अंशांवर कायम आहे. उष्णतेची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्याने शिक्षक संघटनांनीही शाळा सकाळच्या सत्रात सुरू



करण्याची मागणी केली होती. त्यानुसार प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी तापमानाचा आढावा घेऊन सकाळच्या सत्रासंदर्भातील प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सादर केला आहे.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर २६ एप्रिल रोजी होणारी इयत्ता चौथी व सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा हेही प्रशासनासमोरचे महत्त्वाचे आव्हान आहे. या परीक्षेसाठी चौथीतील सुमारे ३२ हजार, तर सातवीतील १७ हजार विद्यार्थी बसणार आहेत. त्यापैकी जिल्हा परिषदेच्या शाळांमधील चौथीचे २१ हजार २०२ आणि सातवीचे ५ हजार ४६७ विद्यार्थी आहेत. परीक्षेत प्रत्येकी १५० गुणांचे दोन बहुपर्यायी प्रश्नपत्रिका असतात. परीक्षा दहावी-बारावीप्रमाणे सीसीटीव्ही देखरेखीखाली घेतली जाते. यशस्वी चौथीतील विद्यार्थ्यांना तीन वर्षांपर्यंत दरवर्षी पाच हजार रुपये, तर सातवीतील विद्यार्थ्यांना दरवर्षी साडेसात हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळते.

सकाळच्या सत्रात शाळा सुरू झाल्यानंतरही शिक्षकांना विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करून घ्यावी लागणार आहे. त्याआधी अंतिम सत्र परीक्षा पार पडणार आहे. त्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण करणे आणि विद्यार्थ्यांची तयारी करून घेणे, हे दुहेरी आव्हान शिक्षकांसमोर असणार आहे.वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने वेळीच पावले उचलण्याची तयारी दर्शविली असून, सकाळच्या सत्रामुळे विद्यार्थ्यांना उष्माघाताचा धोका कमी होऊन शिक्षणाची गती अबाधित राहणार आहे.

> **मुख्य कार्यकारी अधिकारी अंतिम निर्णय घेतील**
>
> ''सोलापूर जिल्ह्यात तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून पुढील आठवड्यापासून सकाळच्या सत्रात शाळा भरविण्याचे नियोजन आहे. तापमानाचा अंदाज लक्षात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी अंतिम निर्णय घेतील,''
>
> **-कादर शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी**

## युवकाच्या खूनप्रकरणी मूर्तीकारासह सहा जणांची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

विनायक उर्फ हर्षल बाळकृष्ण बोझा (वय ३२, रा. नवीन वेडी घरकुल) याचा खून केल्याप्रकरणी मूर्तिकार नागेश दत्तात्र लगशेट्टी (वय ४६), भूपती उर्फ गोट्या अरुण नारा (वय २४), रमेश उर्फ शाम मल्लेश्याम गुंतुक (वय २४), अमोल दिगंबर संदूपटला (वय २४), गणेश काशिनाथ गडगी, संतोष उर्फ सनी श्रीनिवास मरगम (सर्व रा. विडी घरकुल) यांच्या खटल्याची सुनावणी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा यांच्यासमोर होऊन पुराव्याअभावी त्यांनी सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

या हकीकत अशी की, यातील आरोपी नागेश लगशेट्टी हा गणेश मूर्तीचा व्यापारी होता. मयत विनायक हा गणेश मूर्तीचे साचे बनविण्याचे काम करत होता. मयत गणेश याने आरोपी नागेश याचेकडून हात उसने पैसे घेतले होते ते त्याने दिले नव्हते. त्या कारणावरून आरोपी नागेश याने इतर आरोपींशी संगणमत करून विनायक खून करण्याचा कट रचला. २० एप्रिल २०२४ रोजी विनायक हा त्याच्या गाडीवरून घरी जात असताना स्वराज्य तरुण मित्र मंडळसमोर मैदानात विनायक यास अडवून आरोपींनी धारदार हत्याराने वार केले व त्यास गाडीवर बसून क्रांती चौक भाजी मंडई येथे रस्त्यावर टाकले टाकले व त्याच्या डोक्यावर सिमेंटचा ठोकळा घालून खून केला. त्यावरून मयताची आई राधाबाई बाळकृष्ण बोजा हिने वळसंग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यावरून पोलिसांनी आरोपींना अटक करून त्यांचेविरुद्ध दोषारोप पत्रक दाखल केले होते. खटल्याच्या सुनावणी वेळी अ‍ॅड. मिलिंद थोबडे यांनी आपले युक्तीवादात, प्रत्यक्षदर्शी आरोपींना ओळखणारा कोणताही साक्षीदार नसून कट रचून खून केला. हे सरकारी पक्षाने शाबित केले नसल्याचा युक्तिवाद मांडला, त्यावरून न्यायाधीशांनी सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. यात आरोपीतर्फे अ‍ॅड. मिलिंद थोबडे, अ‍ॅड. मनोज पामुल, अ‍ॅड. विनोद सूर्यवंशी यांनी तर सरकारतर्फे अ‍ॅड. आनंद कुर्डूकर यांनी काम पाहिले.




## उकाड्यात वीज गायब; नागरिकांनी व्यक्त केला संताप

### ''दिवसा 3८ चा तडाखा, मंगळवारी रात्री वीज गायब; आबालवृद्धांची झोप उडाली''

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मार्च-**

कुमठा नाका परिसरातील सोलागी नगर येथे मंगळवारी (दि.३) सुमारे एक तासांपासून वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना तीव्र उकाड्याचा सामना करावा लागत आहे. ऐन दुपारच्या वेळेत अचानक वीज गेल्यामुळे घरातील पंखे, कुलर आणि इतर विद्युत उपकरणे बंद पडली आहेत. त्यामुळे लहान



मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच आजारी व्यक्तींची विशेष गैरसोय झाली.

दरम्यान, शहरात आज उन्हाने अक्षरशः कडाडून हजेरी लावली असून तापमानाचा पारा ३८ अंश सेल्सिअसवर पोहोचला. दिवसभर कडक उन्हाचा सामना केल्यानंतर रात्री तरी थोडा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा असताना अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांची झोपच उडाली. उकाड्याने हैराण झालेल्या सोलापूरकरांना रात्रभर त्रास सहन करावा लागला. वीज बिल भरण्यास थोडा जरी उशीर झाला तरी तत्काळ वीजपुरवठा खंडित केला जातो. मात्र वारंवार होणाऱ्या अशा अचानक वीजखंडिताबाबत कोणतीही पूर्वसूचना दिली जात नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. ''बिलासाठी कठोर नियम आणि सेवेसाठी मात्र दुर्लक्ष,'' अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### पाकिस्तान सोडण्याचा अमेरिकेने दिला आदेश

**इस्लामाबादः** मध्यपूर्वेतील अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील युद्धाने संपूर्ण प्रदेश हादरला आहे. २८ फेब्रुवारी रोजी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांचा अमेरिका-इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यात मृत्यू झाला. या हत्येच्या प्रत्युत्तरात इराणने क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांद्वारे दिले. हे संकट आता पाकिस्तानातही पोहोचले आहे. खामेनेई यांच्या हत्येविरुद्ध इथे हिंसक निदर्शने सुरू आहेत. या परिस्थितीत अमेरिकेने कराची आणि लाहोरमधील आपल्या वाणिज्य दूतावासातील काही कर्मचाऱ्यांना पाकिस्तान सोडण्याचे आदेश दिले आहेत. लाहोर आणि कराची येथील सर्व व्हिसा अपॉइंटमेंट्स ६ मार्चपर्यंत रद्द करण्यात आल्या आहेत. सुरक्षा धोक्यांमुळे गैर-आणीबाणीच्या कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना पाकिस्तान सोडण्याचे आदेश दिले आहेत. मात्र इस्लामाबादमधील दूतावासाची स्थिती कायम आहे, असे पाकिस्तानमधील अमेरिकन दूतावासाच्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे.

### मध्यपूर्वेतील संघर्षात महाराष्ट्रातील तरुणाचा मृत्यू

**मुंबईः** मध्यपूर्वेतील युद्धात मुंबईतील एका तरुणाचा मृत्यू झाला. मुंबईतील कांदिवली रहिवासी दीक्षित सोलंकी, हा हॉर्मुझच्या सामुद्रधुनीत ओमानच्या मस्कत किनारपट्टीजवळ एका मालवाहू ऑईल टँकरवर झालेल्या ड्रोन हल्ल्यात जागीच ठार झाला. हा हल्ला इराण-इस्रायल संघर्षाशी संबंधित असल्याचे संकेत आहेत. दीक्षितचा मूळ जन्मस्थान दीव (गुजरात)चा असून तो काही वर्षांपूर्वी व्यवसायासाठी मुंबईत आला होता. कांदिवली परिसरात राहणारा दीक्षित 'एमकेडी व्योम' या ऑईल टँकरवर क्रू सदस्य म्हणून काम करत होता. टँकरवर स्फोटकांनी भरलेल्या ड्रोन बोटीने हल्ला केला. यामुळे इंजिन रूममध्ये भीषण स्फोट झाला आणि आग लागली. या घटनेत त्याचा मृत्यू झाला.

### लोखंडी चौकट कोसळून २० विद्यार्थी जखमी

**अजमेरः** राजस्थानातील बहुतेक जिल्ह्यांमध्ये बुधवारी धुळंदीचा उत्सव साजरा केला जात आहे. तथापि, एक दिवस आधी चंद्रग्रहणामुळे काही भागात होळी अंशतः साजरी करण्यात आली. दरम्यान, मंगळवारी अजमेर महामार्गावर असलेल्या एका खाजगी विद्यापीठात होळी साजरा करताना सुमारे २० विद्यार्थी जखमी झाले. होळी साजरा करताना डीजे सेटअपजवळ बसवलेला चौकोनी लोखंडी चौकट आणि क्रेनसारखी रचना विद्यार्थ्यांवर पडली. यामुळे २० विद्यार्थी जखमी झाले. जखमींपैकी सतरा विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले, तर तीन जणांना प्राथमिक उपचारानंतर घरी सोडण्यात आले. इमारत कोसळली तेव्हा विद्यार्थी पावसाळी नृत्यात सहभागी होत होते. अजमेरमधील पुष्कर येथे आंतरराष्ट्रीय होळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

### चिमुकल्यांसोबत अनैसर्गिक कृत्य

**इगतपुरीः** इगतपुरीच्या समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहात संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. दहावीच्या अल्पवयीन विद्यार्थ्यांनी वसतिगृहातील पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना गुंगीचे औषध आणि मद्य पाजून त्यांच्यावर अनैसर्गिक कृत्य केल्याचे समोर आले आहे. हा संपूर्ण प्रकार उघडकीस आल्यानंतर संतप्त पालकांसह विद्यार्थ्यांनी इगतपुरी पोलिसांत धाव घेतली.

# सावकारांविरुद्ध फौजदारी कारवाई

## परवाना रद्द करणार; मुख्यमंत्र्यांची विधान परिषदेत घोषणा

◆ **मुंबई, ४ मार्च**

राज्यातील परवानाधारक सावकारांनी शेतकऱ्यांकडून कर्जवसुली करताना अवाजवी व्याज आकारल्यास त्यांचा परवाना तात्काळ रद्द करून कठोर फौजदारी कारवाई करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत केली.

विधानपरिषद सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील मिंथुर येथे एका शेतकऱ्याने सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी स्वतःची किडनी विकल्याची धक्कादायक घटना सभागृहात मांडली. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, संबंधित सावकाराविरुद्ध विविध गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. चौकशीत या आरोपीने अन्य चार पीडितांनाही किडनी विक्रीस प्रवृत्त केल्याचे उघड झाले असून त्यांच्याविरोधातही कारवाई करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, परवानाधारक तसेच अनधिकृत सावकारांकडून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक रोखण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. अनधिकृत सावकारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत विशेष समिती आणि भरारी पथके (फ्लाईंग स्क्वॉड) स्थापन करण्यात येत आहेत.



### कायद्यात दुरुस्ती, नवीन अधिकार

यासंदर्भातील दुरुस्ती विधेयक सध्याच्या अधिवेशनात सादर करण्यात आले असून नव्या कायद्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांना विस्तारित अधिकार दिले जाणार आहेत. वाढत्या उद्वाहन संख्येचा विचार करता भविष्यात आणखी दुरुस्त्यांची आवश्यकता भासू शकते, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**व्याजदरांचे नियम पाळणे बंधनकारक**

गृहराज्यमंत्री (ग्रामीण) पंकज भोयर यांनी सांगितले की, परवानाधारक सावकारांनी शेतकऱ्यांना तारण कर्जावर ९ टक्के, विनातारण कर्जावर १२ टक्के, तर इतर कर्जदारांना तारण कर्जावर १५ टक्के आणि विनातारण कर्जावर १८ टक्के वार्षिक व्याजदर आकारणे बंधनकारक आहे. या नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

**राज्यभरातील २७१ बस आगारांचा कायापालट होणार**

राज्यातील परिवहन महामंडळाच्या सर्व २७१ आगारांतील चालक-वाहक विश्रांतीगृहे आता अत्याधुनिक आणि वातानुकूलित करण्यात येणार आहेत. तसेच, सार्वजनिक-खासगी सहभाग (पी.पी.पी.) तत्त्वावर या आगारांचा विकास करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत दिली. सदस्य विक्रम काळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर ते बोलत होते.

यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, विकासाचा समतोल राखण्यासाठी एक धोरण आखण्यात आले आहे. ज्या आगारांचे उत्पन्न चांगले आहे, अशा एका आगारासमवेत २ ग्रामीण किंवा तालुका स्तरावरील आगारे जोडून त्यांचे एक पॅकेज सिद्ध करण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील बसस्थानकांनाही विकासाची मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळेल.

**प्रवाशांसाठी विनामूल्य आणि स्वच्छ स्वच्छतागृहे**

बसस्थानकांवरील अस्वच्छतेच्या समस्येवर उपाय म्हणून स्वच्छतागृहे विनामूल्य आणि स्वच्छ राखण्यासाठी स्वतंत्र कंत्राटदार नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. येत्या २ महिन्यांत याची कार्यवाही पूर्ण होईल आणि प्रवाशांकडून स्वच्छतागृहांच्या वापरासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

**राज्यातील उद्वाहन तपासणी यंत्रणा अधिक सक्षम करणारः मुख्यमंत्री**

राज्यात सध्या सुमारे २ लाख १० हजार उद्वाहन कार्यरत असून नुकत्याच २५ हजार नवीन उद्वाहनांना मान्यता देण्यात आली आहे. सध्या मर्यादित कर्मचाऱ्यांवर सर्व उद्वाहनांना तपासणीची जबाबदारी आहे. एवढ्या मोठ्या संख्येतील उद्वाहनांची तपासणी या मनुष्यबळाकडून करणे प्रत्यक्षात शक्य नसल्याचे शासनाने ५१९ नवीन पदांची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, उद्वाहनांची वाढती संख्या पाहता ही पदेही भविष्यात अपुरी पडू शकतात, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.

विधान परिषद सदस्य ॲड. निरंजन डावखरे, सचिन अहिर यांनी राज्यातील गृहनिर्माण सोसायटीमध्ये उद्वाहनांची नियमित देखभाल दुरुस्तीसंदर्भात प्रश्न विचारला असता, राज्यातील उद्वाहन तपासणी यंत्रणा अधिक सक्षम करण्याबरोबरच व्यापक सुधारणांची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. (तभा वृत्तसेवा)

### आखाती देशांतील भारतीयांना सुरक्षित मायदेशी आणणार : मुख्यमंत्री

आखाती देशांमध्ये तणावपूर्ण परिस्थितीमुळे परदेशात अडकलेल्या प्रत्येक भारतीयाला पूर्ण सुरक्षिततेसह मायदेशी आणण्याचा आमचा प्रयत्न आहे, असा विश्वास व्यक्त करत मुख्यमंत्र्यांनी केंद्र-राज्य समन्वयातून ही प्रक्रिया राबवली जात असल्याचे स्पष्ट केले.आमदार संजय केनेकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर चर्चा करताना मुख्यमंत्री म्हणाले की, युद्धजन्य परिस्थितीमुळे काही देशांतील एअरस्पेस बंद झाल्याने पर्यटक, व्यावसायिक आणि कामगार अडकले आहेत. या पृष्ठभूमीवर भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाने संबंधित देशांतील भारतीय दूतावासांना सक्रिय केले असून अडकलेल्या नागरिकांना दूतावासांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्य सरकारच्या पातळीवर मदत व पुनर्वसन तसेच आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे समन्वयाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. अडकलेल्या नागरिकांसाठी विशेष व्हॉट्सप क्रमांकही जारी करण्यात आला असून नागरिकांकडून येणाऱ्या संदेशांवर तत्काळ कार्यवाही केली जात असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

### थर्ड पार्टी ऑडिट यंत्रणा उभारणार

मुंबईत अग्निसुरक्षेसाठी जशी क्रिडेटेड थर्ड पार्टी ऑडिट व्यवस्था उभारण्यात आली आहे, त्याच धर्तीवर उद्वाहन तपासणीसाठीही अधिकृत, मान्यताप्राप्त तृतीय पक्ष यंत्रणा उभारण्याचा शासनाचा मानस आहे. या यंत्रणेमार्फत तांत्रिक तपासणी करून नियमित प्रमाणपत्र (सर्टिफिकेट) उद्वाहनमध्ये प्रदर्शित करणे बंधनकारक केले जाईल. प्रत्येक उद्वाहनाची तपासणी कधी झाली, ती किती कालावधीपर्यंत वैध आहे, याची स्पष्ट नोंद उद्वाहनमध्ये लावणे आवश्यक राहील, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.




# वाघांचा भ्रमणमार्ग मोकळा करा

## आजपासून 'इको-प्रो'चे बंडू धोतरे यांचा अन्नत्याग

**१६ मागण्यांचे दिले निवेदन** | **प्रशासनाने आंदोलनासाठी जागाच दिली नाही**

◆ **चंद्रपूर, ४ मार्च**

ताडोबा 'लॅण्डस्केप'च्या सभोवतालचे वाघ आणि अन्य वन्यप्राण्याच्या भ्रमणमार्गातून जाणाऱ्या राज्य व राष्ट्रीय महामार्गावर वन्यजीव उपशमन योजना राबवा. प्रस्तावित 'ओव्हरपास' बांधकामास मंजुरी द्या, लोहारडोंगरी खाण रद्द करा अशा १६ मागण्यांसाठी गुरुवार, ५ मार्चपासून इको-प्रो संस्थेचे अध्यक्ष बंडू धोतरे अन्नत्याग आंदोलन करणार आहेत.

या बेमुदत आंदोलनासाठी जिल्हा व वन प्रशासनाने जागाच दिली नसून त्यांची परवानगी मिळाली नाही, तरी मी इको-प्रो संस्थेच्या कार्यालयात उपोषण करेन, असे ठाम मत धोतरे यांनी बुधवारी येथे आयोजित पत्रपरिषदेत व्यक्त केले. केवळ लोहारडोंगरी खाण रद्द व्हावी एवढीच मागणी नसून जवळपास १६ अत्यंत महत्त्वाच्या मागण्या वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. त्या जोपर्यंत सुटत नाही, तोपर्यंत मी उपोषण कायम ठेवणार, असेही धोतरे यांनी यावेळी सांगितले. पर्यावरणप्रेमी सुरेश चोपणे, योगेश दुधपचारे, किशोर जामदार आदी यावेळी उपस्थित होते.

१६ मागण्यांमध्ये, चंद्रपूर-मूल मार्गावरील प्रस्तावित 'ओव्हरपास'ला निधी द्यावा, बामणी, आष्टी व इतर मार्गावरील 'अंडरपास' बांधकामास मंजुरी प्रदान द्यावी, 'लोहारडोंगरी' लोह खाण प्रकल्पाची वन्यजीवविषयक परवानगी रद्द करणे तसेच व्याघ्र अधिवासातील 'लोहारडोंगरी' लोह खाण ब्लॉक नेहमीसाठी रद्द करणे. चंद्रपूर जिल्ह्यातील वाघ-मानव संघर्षावर प्रभावी उपाययोजना करण्याकरिता राज्य सरकारद्वारा गठित ११ सदस्यीय तांत्रिक समितीच्या अहवालाची अंमलबजावणी करावी, कन्हाळगाव व घोडाझरी ही दोन्ही अभयारण्य वन्यजीव विभागाने ताब्यात घेऊन कर्मचारी-अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, 'बिबट समस्यामुक्त ग्राम योजनेला मंजुरी प्रदान करून निधी उपलब्ध करून द्यावा, चंद्रपूर जिल्हा 'व्याघ्र जिल्हा' घोषित करावा, ताडोबासह कन्हाळगाव व घोडाझरी अभयारण्याच्या पर्यटनातून मिळणाऱ्या लाभात स्थानिक गावांना ५० टक्के प्रत्यक्ष लाभ मिळण्यास योजना राबवावे, या अभयारण्यालगत 'कम्युनिटी रिसोर्ट, जिप्सी व होमस्टे' चालवावे व मिळणाऱ्या आर्थिक लाभातून गावविकास करावा, वाढता वाघ-मानव संघर्ष, 'कॅरींग कॅपेसिटी' या बाबीचा सर्वांगीण अभ्यास करावा तसेच वनविभागाच्या अंतर्गत वनव्याप्त गावात 'पोलिस पाटील'च्या धर्तीवर 'वनपाटील' नियुक्त करावे आदींचा समावेश आहे. (तभा वृत्तसेवा)



### वन विभागाचे दुर्लक्ष

महिनाभरापूर्वी वनमंत्री, प्रधान सचिव, वने तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांना यांसदर्भात निवेदन पाठविण्यात आले होते. सत्याग्रहाचा इशाराही देण्यात आला होता. मात्र, अन्नत्याग सत्याग्रहाच्या मागण्यांसंदर्भात अद्याप कुठलीच कार्यवाही न झाल्याने हे उपोषण सुरू करत आहे, असे धोतरे म्हणाले.

### पाच वर्षांत २०० ग्रामस्थांचा मृत्यू

वाघ-मानव संघर्ष वाढला असून मागील पाच वर्षांत २०० ग्रामस्थांचा मृत्यू झाला आहे. याचाच अर्थ, हा संघर्ष अगदी शिगेला पोहोचला आहे. २०२५ या वर्षात ४७ स्थानिक ग्रामस्थ, आदिवासी, शेतकरी यांच्या नरडीचा घोट वाघाने घेतला. एकट्या ब्रह्मपुरी वनविभागात १८ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे मागील एका वर्षात १० वाघांना जेरबंद करण्यात आले आहे.

# मुंबईच्या तोतया आयकर अधिकाऱ्यांना अटक

### वर्धा पोलिसांची कामगिरी

◆ **वर्धा, ४ मार्च**

मुंबई येथून आलेले तोतये अधिकारी वर्धा पोलिसांच्या हाती पडले आहेत. ही घटना आज बुधवार ४ रोजी दुपारी घडली.

प्रवीण हिवरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक रामनगर परिसरातील श्रीनिवास कॉलनी येथील रहिवासी चिंतामण कोंगरे यांच्या निवासस्थानी दुपारी २ वाजताच्या सुमारास किशन ज्ञानेश्वर पर्बत व चेतन रमेश चव्हाण हे आले. त्यांनी आपण आयकर निरीक्षक असल्याचे सांगून आयकर विभागाचे ओळखपत्रसुद्धा दाखविले. आयकर विभागाचा सर्च वॉरंट दाखवत आम्हाला तुमच्या घराची झडती घ्यायची आहे. सर्व कागदपत्रे व रोख रक्कम दाखवा, असे धमकावू लागले. घरच्यांनी त्यांना कागदपत्र दिले. या घटनाक्रमाची माहिती चिंतामण कोंगरे यांचे चिरंजीव प्रा. सुहास यांनी येथील काँग्रेसचे नेते शेखर शेंडे व प्रवीण हिवरे यांना दिली. प्रवीण हिवरे उद्योजक असल्याने त्यांनी कोंगरे यांना काही महत्त्वाचा सल्ला देत आमच्या चार्टर्ड अकाऊंटन्टला बोलावतो, असे सांगा.

असा सल्ला देताच बनावट आयकर अधिकाऱ्यांनी आम्हीच सीएकडे येतो, असे सांगितले. प्रा. डोंगरे, सीए जगदीश चांडक यांच्याकडे दोन्ही बोगस अधिकाऱ्यांना घेऊन गेले. दरम्यान, त्या ठिकाणी शेंडे व हिवरेसुद्धा पोहोचले. या दोघांनी मुंबईहून आलेल्या दोन्ही अधिकाऱ्यांची उलटतपासणी सुरू करताच त्यांना घाम फुटला. त्यांच्याकडे असलेले नियुक्तिपत्र बोगस असल्याचे लक्षात आल्यानंतर उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर व वर्धा पोलिस कंट्रोल रूमला माहिती देण्यात आली. सर्व शहानिशा केल्यानंतर मुंबईहून आलेले दोन्हीही अधिकारी बोगस असल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्यांना रामनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. (तभा वृत्तसेवा)



आयकर अधिकारी म्हणून आलेल्यांना रामनगर पोलिसांच्या स्वाधीन करताना शेखर शेंडे, प्रवीण हिवरे, प्रा. कोंगरे व जगदीश चांडक

# दुचाकी रोखल्याच्या रागातून पोलिसावर हल्ला

◆ **वसई, ४ मार्च**

बंदोबस्तात असलेल्या वाहतूक पोलिसावर एका दुचाकीस्वाराने प्राणघातक हल्ला केला. दगडाने डोके ठेचून त्यांची हत्या करण्याचा प्रयत्न केला. ही धक्कादायक घटना वसईमध्ये गोखिवरे नाक्यावर मंगळवारी दुपारी ३ वाजता घडली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या पोलिसावर रुग्णालयात उपचार सुरू आहे. जसवंत वळवी, असे जखमी पोलिसाचे नाव आहे. धुळवड निमित्ताने मंगळवारी वाहतूक पोलिसांनी शहरात ठिकठिकाणी तपासणी मोहीम सुरू केली होती. वसई वाहतूक विभागाचे सहाय्यक फौजदार जसवंत वळवी हे वसई पूर्वेच्या गोखिवरे रेंज नाक्यावर बंदोबस्तासाठी तैनात होते. दुचाकीवर चौघे असल्याने त्यांना थांबविल्यानंतर संतापलेल्या अभिषेक जैस्वार व साथीदारांनी हल्ला केला. या हल्ल्यात वळवींच्या डोक्याला तीन ठिकाणी गंभीर दुखापत झाली. वळवी यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी अभिषेक जैस्वारला अटक केली आहे. (वृत्तसंस्था)



जम्मू आणि काश्मीरमधील कठुआ जिल्ह्यात बुधवारी इंडो-तिबेटीयन बॉर्डर पोलिस अर्थात् आयटीबीपीच्या जवानांनी होळीचा सण साजरा केला. यावेळी एकमेकांना रंग लावत गाण्यावर ठेका धरला

# राजौरीत उधळला घुसखोरीचा प्रयत्न

◆ **जम्मू, ४ मार्च**

राजौरी जिल्ह्यातील नियंत्रण रेषेवरून होणाऱ्या अतिरेक्यांच्या घुसखोरीचा प्रयत्न लष्कराच्या पथकांनी बुधवारी उधळला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

सीमेच्या पलीकडून अतिरेक्यांच्या घुसखोरीचा प्रयत्न उधळण्यात आल्याच्या वृत्ताला जम्मूतील लष्कराच्या व्हाईट नाईट कॉर्प्सने दुजोरा दिला. गुप्तचरांनी दिलेली विश्वसार्ह माहिती आणि सतत नजर ठेवल्यानंतर ४ मार्च रोजी पहाटे नियंत्रण रेषेवरील भिंबर गल्लीच्या सामान्य भागात दहशतवाद्यांच्या हालचाली आढळून आल्या. निर्णायक शक्तीने प्रत्युत्तर देत आणि उत्कृष्ट रणनीतिक अंमलबजावणीचे प्रदर्शन करीत व्हाईट नाईट कॉर्प्सच्या सतर्क जवानांनी वेगाने कारवाई केली आणि घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडला. या समन्वित कारवाईमुळे शत्रूचे मनसुबे हाणून पाडण्यात आले, असे व्हाईट नाईट कॉर्प्सने 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. गोळीबारात अतिरेकी ठार झाले अथवा नाही, याची माहिती तत्काळ मिळू शकली नाही. या परिसरात मोठ्या प्रमाणात शोधमोहीम सुरू करण्यात आली. (वृत्तसंस्था)

# भारतीय तटरक्षक दलाला मिळणार प्रगत हेलिकॉप्टर्स

## रशियासोबत क्षेपणास्त्र करार ● ५०८३ कोटींच्या करारांवर शिक्कामोर्तब

◆ **नवी दिल्ली, ४ मार्च**

संरक्षण मंत्रालयाने मंगळवारी एकूण ५०८३ कोटी रुपयांचे दोन महत्त्वाचे करार केले. यामध्ये भारतीय तटरक्षक दलासाठी सहा प्रगत हलके हेलिकॉप्टर्स (एएलएच) मके-३ (सागरी भूमिका) आणि भारतीय नौदलासाठी पृष्ठभागावरून हवेत मारा करणारी व्हर्टिकल लाँच-शिटल (व्हीएल-शिटल) क्षेपणास्त्रे समाविष्ट आहेत.



पहिला करार हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड, बंगळुरूसोबत २,९०१ कोटी किमतीचा आहे. हा करार बाय (इंडियन-आयडीडीएम) श्रेणी अंतर्गत आहे, म्हणजेच तो पूर्णपणे भारतीय डिझाईन, विकास आणि उत्पादनावर आधारित आहे. या ट्विन-इंजिन हेलिकॉप्टरमध्ये प्रगत तंत्रज्ञान आहे. ते विद्यमान हेलिकॉप्टरला लक्षणीयरीत्या मागे टाकते. ते किनाऱ्यावरून किंवा जहाजांवरून काम करणे यासारखी विविध सागरी सुरक्षा कामे करू शकतात. हे हेलिकॉप्टर कृत्रिम बेटे आणि ऑफशोअर ऑईल प्लॅटफॉर्मचे संरक्षण, मासेमारांचे संरक्षण आणि सागरी पर्यावरणाचे रक्षण करण्यात महत्त्वपूर्ण मदत करतील.

या प्रकल्पात २०० हून अधिक एमएसएमई (लहान आणि मध्यम आकाराचे उद्योग) सहभागी होतील. मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होणार आहेत. हा करार आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडियाला बळकटी देण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. दुसरा करार, रशियन कंपनी जेएससी रोसोबोरोनेक्सपोर्ट सोबत, २,१८२ कोटींचा आहे. यात व्हीएल-शिटल जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे आणि त्यांच्या होल्डिंग फ्रेम्सचा समावेश आहे. ही क्षेपणास्त्रे भारतीय नौदलाच्या प्रमुख युद्धनौकांच्या हवाई संरक्षणाला लक्षणीयरीत्या बळकटी देतील.

ही क्षेपणास्त्रे शत्रूची विमाने, क्षेपणास्त्रे आणि ड्रोनसह सर्व प्रकारच्या हवाई धोक्यांना वेगाने तोंड देऊ शकतात. ते सर्व हवामान परिस्थितीत काम करतात आणि युद्धादरम्यान जहाजांची सुरक्षा वाढवतात. (वृत्तसंस्था)

### सागरी सुरक्षेत महत्त्वाची भूमिका

दोन्ही करार भारतीय नौदलाच्या सागरी सुरक्षेला बळकटी देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील. एएलएच मके-३ तटरक्षक दलाच्या क्षमता वाढवेल. व्हीएल-शिटल क्षेपणास्त्रांमुळे नौदल जहाजांना शत्रूच्या हवाई हल्ल्यांपासून चांगले संरक्षण करता येईल.

### पाकिस्तानी लष्कराने ठार केले 'टीटीए' कमांडरला

◆ **पेशावर, ४ मार्च**

पाकिस्तानच्या व्यायव्येकडील तोरखम सीमेवरव तेहरीक-ए-तालिबान (टीटीए) अफगाणिस्तानच्या कमांडरला पाकिस्तानी लष्कराने ठार केले, असा दावा सुरक्षा अधिकाऱ्यांनी बुधवारी केला. काहरामन असे ठार झालेल्या टीटीए कमांडरचे नाव आहे. तो आणि त्याचे साथीदार मंगळवारी रात्री सीमेजवळ जाण्याचा प्रयत्न करीत असताना एका कारवाईत मारले गेले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# ऊर्जा क्षेत्रात ४.१७ लाख कोटींची गुंतवणूक

## ५५ सामंजस्य करार, ७८,२१५ मेगावॅट क्षमतेची उभारणी ● १,२७,९९० रोजगार निर्मिती

◆ **मुंबई, ४ मार्च**

राज्यात ऊर्जा क्षेत्रात मोठी गुंतवणूक होत असून जलसंपदा विभागाच्या माध्यमातून उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठीचे विविध कंपन्यांसोबत एकूण ५५ सामंजस्य करार बुधवारी करण्यात आले. या करारांद्वारे ७८,२१५ मेगावॅट वीज निर्मिती क्षमतेची उभारणी प्रस्तावित आहे. एकूण गुंतवणूक सुमारे ४,१६,७०१ कोटी रुपये इतकी अपेक्षित असून या प्रकल्पाद्वारे सुमारे १,२७,९९० रोजगार निर्मिती होणार आहे. ऊर्जाक्षेत्राला सक्षम करण्यासाठी करार महत्वाचे असून कालबद्धरित्या या प्रकल्पांची अंमलबजावणी करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

विधानभवनात राज्यातील उदंचन जलविद्युत प्रकल्पांची (पंपस्टोरेज प्रकल्प) आढावा बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधितांना सूचित केले. बैठकीस जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री गिरीश महाजन यांच्या सह जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर व इतर संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात मोठ्या प्रमाणात ऊर्जा क्षेत्राच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने जलसंपदा विभागाच्या माध्यमातून उदंचन जलविद्युत प्रकल्पांची उभारणी करण्यात येत आहे.

या कामाची व्याप्ती वाढवण्याच्या दिशेने या क्षेत्रातील नामांकित विविध कंपन्यांसोबत राज्य शासनाने सामंजस्य करार केले आहेत. आतापर्यंत एकूण ५५ सामंजस्य करार हे उदंचन जलविद्युत प्रकल्पांच्या निर्मितीसाठी करण्यात आले आहेत. (तभा वृत्तसेवा)

### पाच प्रकल्पांचे अहवाल मंजुरीच्या प्रतीक्षेत

अल्पावधीतच या प्रकल्पांच्या कामाने गती घेतली असून ५५ पैकी १०३०० मेगा वॅट क्षमतेच्या सहा प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना केंद्रीय विद्युत प्राधिकरणाची मंजूरी मिळाली असून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली आहे. तसेच ८२०० मेगावॅट क्षमतेच्या पाच प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल मंजुरीच्या टप्प्यात आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# मनोबल राखणे ही देशसेवाच...

आज जगात ज्या पद्धतीने संघर्ष आणि युद्धे सुरू आहेत, त्यावरून 'शांतता' हा शब्द केवळ शब्दकोशातच उरलाय की काय, अशी शंका येते. जग अधिक सभ्य होतेय की रानटी, असा प्रश्न पडण्यासारखी ही स्थिती. लढण्याचा, आक्रमणाचा तर्क प्रत्येकाकडे तयार. पण, संयमाची वाणवा. सुरुवातीला रशिया-युक्रेन युद्ध म्हणजे आठवड्यात संपणारा खेळ वाटला होता, पण तो आता रेंगाळलेला विषय झालाय. अमेरिका, इस्रायल आणि इराण या त्रिकोणी संघर्षाने त्यात 'तेल'च ओतले आहे. इराणची तयारी पाहता हे युद्ध केवळ क्षेपणास्त्रांपुरते मर्यादित न राहता, जागतिक अर्थव्यवस्थेच्या मुळावर येणार, असे स्पष्ट संकेत दिसत आहेत. अमेरिका-इस्रायलच्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते खामेनेई ठार झाल्यानंतर इराणनेही ताकदीने प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे. या हल्ल्यानंतर सौदी अरेबियातील सरकारी मालकीचा सर्वांत मोठा तेल शुद्धीकरण प्रकल्प तात्पुरता बंद करावा लागला. या बंदीच्या बातमीनंतर जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती ९.३२ टक्क्यांनी वाढल्या. सध्याच्या काळात जगातला प्रत्येक देश एकमेकांशी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात जोडला गेला आहे. कुठेही ठिणगी पडली की त्याची झळ कमी-जास्त प्रमाणात सर्वांना बसतेच. सध्या सुरू असलेली युद्धे त्याला अपवाद नाही. हे युद्ध पुरवठा साखळीवर घाला घालणारे आहे. तेल आणि गॅसचे भाव वाढले की, भाजीवाल्यापासून ते उद्योजकांपर्यंत सर्वांचेच बजेट कोलमडणार. भारताकडे जरी काही दिवसांचा इंधन साठा असला आणि आपण आयातीचे इतर मार्गही मोकळे ठेवले आहे असे म्हणत असलो, तरी महागाईचा राक्षस कुणालाही सोडणार नाही. अशा वेळी आमचं कसं होणार, असा टाहो फोडण्यापेक्षा, आपण आपल्या वागण्यात थोडी शिस्त, धैर्य आणि संयम आणण्याची गरज आहे. सरकार आपल्या हिताचा सर्वार्थाने विचार करते आहे. बेंबीच्या देठापासून निरर्थक प्रश्न विचारण्यापेक्षा देशहित कशात आहे, याचा विचार करणे सर्वांसाठी योग्य.

आचार्य चाणक्य म्हणतात, ज्या देशात स्वाभिमान आणि सुरक्षा संकटात असते, तिथे नागरिकांची खरी परीक्षा असते. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध इतक्यात संपेल असे वाटत नाही. ते केव्हा संपेल हेही सांगता येत नाही. पुढच्या काळात परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होऊ शकते. अशा वेळीच देशातील नागरिकांच्या धैर्य आणि संयमाची परीक्षा असते. भारतीयांना ही परीक्षा द्यावी लागणार आहे. देश जेव्हा अशा कोणत्याही संकटात असतो तेव्हा देशासोबत उभे राहणे, देशावर अनावश्यक ताण येणार नाही असे वर्तन करणे हे जबाबदार नागरिकांचे लक्षण. एखाद्या गोष्टीची टंचाई निर्माण झाली तर आरडाओरड करण्यापेक्षा संयम दाखवणे, प्रसंगी पर्यायांचा वापर करणे, नजीकच्या ठिकाणी पायी जाण्याचा प्रयत्न करणे हीसुद्धा येत्या काळात देशसेवा ठरणार आहे.

भारतीय जनतेने अशा संकटांचा सामना यापूर्वीही केलेला आहे. जेव्हा केव्हा असे संकट देशावर आले, तेव्हा जनतेने तेवढ्याच जबाबदारीने, प्राणपणाने प्रतिसाद दिला आहे. १९६५ च्या युद्धात जेव्हा अमेरिकेने भारताला गव्हाची निर्यात थांबविण्याची धमकी दिली, तेव्हा तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री अजिबात डगमगले नाहीत. त्यांनी देशाला एक वेळचे जेवण बंद करण्याचे आवाहन केले. त्याही आधी तो प्रयोग त्यांनी आपल्या स्वतःच्या घरात केला. पत्नीला- ललिता देवींना त्यांनी सांगितले की, आजपासून आपण एक वेळचे जेवण बंद करू या! त्यांच्या परिवाराने तो त्याग केला तेव्हाच त्यांनी देशाला सांगितले. पुणेकरांनी तर तेव्हा हॉटेलबाहेर फलक लावले होते- 'आज शास्त्रीजींसाठी हॉटेल बंद!' एका हाकेवर संपूर्ण देशाने पोटाला चिमटा घेतला आणि लष्कराला बळ दिले. याचा अर्थ, शास्त्रीजींनी देशाला उपाशी ठेवले असा होत नाही, तर देशाला स्वाभिमानी कसे राहायचे हे त्यांनी शिकवले. देशावरचे संकट हे आपले संकट असते, हे त्यांनी अधोरेखित केले. आज आपण इंधन वापरात संयम दाखवला तर तीही आपली 'शास्त्री-वृत्ती' ठरेल.

तत्पूर्वी, हिमालयाच्या सीमा रक्ताने माखल्या जात असताना आणि देशाच्या तिजोरीत खडखडाट असताना, मुख्यमंत्री मा. सा. कन्नमवार यांनी, सह्याद्रीच्या कड्याकपाऱ्यांतून महाराष्ट्राला साद घातली होती- 'माझ्या रक्ताच्या बांधवांनो, देश संकटात आहे. हिमालयाच्या रक्षणासाठी सह्याद्रीला धावून जावे लागेल.' त्या हाकेचा असा काही चमत्कार झाला, जो या मराठी मायभूमीचा इतिहास आजही अभिमानाने सांगितला जातो. लष्कराच्या शस्त्रास्त्रांसाठी नागपूरपासून पुण्यापर्यंत आणि मुंबईपासून कोल्हापूरपर्यंतच्या नागरिकांनी त्यांच्याकडचे सोने दान करण्यासाठी रांगा लावल्या होत्या. एका सभेत एका माउलीने केवळ तिचे दागिने दिले नाहीत, तर आपले मंगळसूत्रही काढून मा. सा. कन्नमवार यांच्या हाती ठेवले होते. त्याही काळी महाराष्ट्राने तब्बल पाच कोटी रुपयांहून अधिक किमतीचे सोने आणि रोख रक्कम संरक्षण निधीसाठी दान दिले होते. अशी उदाहरणे कमी नाहीत. अलिकडच्या काळात कोविडने जेव्हा अवघ्या जगाला आपल्या विळख्यात घेतले, तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संयम आणि धैर्याचे आवाहन केले. 'लॉकडाऊन'च्या काळात घरातील पिंजऱ्यात राहूनही भारतीयांनी जो संयम दाखवला, तो पुढे जगासाठी अभ्यासाचा विषय ठरला. अखेर कोविडवर आपण सर्वांनी मात केली.

युद्ध फक्त सीमेवरच लढले जाते असे नव्हे. ते घराघरातल्या बचतीच्या पातळीवरही लढले जाते. दुसऱ्या महायुद्धानंतर जपान पूर्णपणे उद्ध्वस्त झाला असताना तिथे इंधनाची इतकी टंचाई होती की, लोक मोठ्या प्रमाणात सायकलचा वापर करू लागले. एकाही जपानी नागरिकाने रस्त्यावर उतरून सरकारविरुद्ध आरडाओरड केली नाही. उलट प्रत्येकाने ठरवले की, मी देशासाठी दिवसाला किमान १० मिनिटे जास्त काम करेन! त्यांनी त्या पलीकडे काम केले. आजही करताहेत. परिणाम आहे आजचा विकसित जपान. अशी असते देशभक्ती. तेलाचा साठा मर्यादित असताना, तो अधिक महाग होत असताना, आपली गाडी 'सिग्नल'ला बंद करणे किंवा विनाकारण गाडी बाहेर न काढणे ही देखील देशसेवाच. केवळ मौज म्हणून 'लाँग ड्राईव्ह'वर न जाणे हेही येत्या काळात देशासाठी काहीतरी केल्याचे समाधान देणारे ठरणार आहे. शक्य तिथे पायी जाणे किंवा पर्यायी छोटे वाहन वापरणे एवढे तरी प्रत्येकाने केले पाहिजे. उद्या तेल मिळणार नाही, या अफवेने घाबरून डबेच्या डबे भरून ठेवणे ही आप्पलपोटी वृत्ती संपविली पाहिजे. आखाती देशांत युद्ध असेच सुरू राहिले, तर प्रति बॅरल १० ते २० डॉलर्सची वाढ होणे अपेक्षित आहे. पुढे ती आणखी वाढू शकेल. तेलाच्या किमतीत १० टक्के वाढ झाली की, घाऊक महागाईचा दर साधारण १ टक्क्याने वाढतो. याचा अर्थ, आपल्या ताटातील भाजी आणि डाळ महागणार आहे. तेल-मीठही महाग होऊ शकते. सध्या विशाखापट्टणम, मंगळुरू आणि पदूर येथे इंधनाचे तेल साठविण्याची सोय आहे. सुमारे ५.३३ दशलक्ष मेट्रिक टन एवढ्या कच्च्या तेलाचा आपल्याकडे साठा आहे, जो साधारण १० दिवस पुरू शकतो. या व्यतिरिक्त तेल कंपन्यांकडे ६४ दिवसांचा साठा असतो. अशाप्रकारे साधारण ७४ दिवस आपण तग धरू शकतो, असे सांगितले जात आहे. पण त्यानंतर काय, हा प्रश्न आहेच. तोवर युद्ध संपून पुरवठा साखळी सुरळीत झाली तर ठीक. अन्यथा, परिस्थिती सामान्य होईपर्यंत संयम आणि धैर्यच आपल्या कामी येणार आहे.

देशात अशी स्थिती निर्माण होते तेव्हा हक्क गाजवण्यापेक्षा कर्तव्य बजावण्यात जास्त मोठेपण असते. आरडाओरड करून भाव कमी होत नाहीत. सोशल मीडियावर कितीही पोस्टी डकवल्या तरी युद्ध लगेच थांबणार नाही. प्रत्येकाने संयम राखल्यास देशाचे मनोबल नक्कीच वाढेल. मनोबल राखणे आणि ते वाढविणे ही देखील देशसेवाच आहे!

## निमित्त

# तरुण भारत पुणे आवृत्तीचे हार्दिक स्वागत

**मोरेश्वर जोशी**

३५ वर्षांच्या अवकाशानंतर पुण्यात दैनिक 'तरुण भारत' नियमित प्रकाशित होत आहे, ही तरुण भारत प्रेमींसाठी अतिशय आनंदाची बातमी आहे. वाचकांच्या दृष्टीने ती समाधानाची बाब आहेच; पण आम्हा जुन्या कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत हर्षउल्हासाची बाब आहे. पुणे तरुण भारत मे-१९९० मध्ये बंद झाला होता. त्यात काम करणाऱ्यांची संख्याही आता हाताच्या बोटावर मोजण्याइतकी कमी राहिली आहे आणि जी आहे ती आता काम करण्याच्या वयोगटातील नाही. तरीही पण जेथे आपण घडलो आणि वाढलो, तो उपक्रम पुन्हा सुरू होत असल्यामुळे त्या काळात परत जाऊन कामाला सुरुवात करण्याच्या तयारीपर्यंत आमचे मन धावत आहे.

आम्ही पुण्यात तरुण भारतचा जो काळ पाहिला, तो प्रतिकूलतेचाच अधिक होता. तरीही प्रत्येक दिवस हा आम्हाला काही ना काही शिकवणारा होता. तेव्हाची जवळजवळ सर्व वृत्तपत्रे तशी आर्थिक स्थितीने बेताचीच. मात्र, आम्हाला पुण्यात जी परंपरा मिळाली, ती फार मोठी होती. दैनिक तरुण भारत हा संघपरिवाराशी जोडला असल्याने तेव्हापासूनच तो जीवनमूल्यांशी जोडला गेलेला होता. त्या काळी तरुण भारतवर सरकारची फारशी प्रेमाची दृष्टी नसे. आम्ही जेव्हा या कामात आलो, तेव्हा तरुण भारतमध्ये अतिशय प्रतिकूल स्थितीत झगडलेले लोक होते. बापूराव तथा चं. प. भिशीकर आरंभी संघाचे प्रचारक होते आणि त्यांचे कार्यक्षेत्र सध्याच्या पाकिस्तानातील कराची हे होते. त्यांनी फाळणीच्या वेदना प्रत्यक्ष बघितल्या होत्या. त्यांनी शाखेवर आणलेले अनेक लोक फाळणीनंतर पुण्यातही होते आणि उल्हासनगर येथे होते. माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांना संघशाखेवर त्यांनीच आणले. १९९० मध्ये अडवाणी यांनी श्रीराम जन्मभूमीच्या आंदोलनात जेव्हा सोमनाथ ते अयोध्या रथयात्रा काढली, तेव्हा ते पुण्यातून पुढे गेले. तेव्हा त्यांनी सर्किट हाऊसवरच बापूराव भिशीकर यांची भेट घेतली होती. अर्थात ती फारच छोटी भेट होती. त्या भेटीत लालजी बापूराव यांच्याशी तोडक्या-मोडक्या मराठीत बोलत होते आणि बापूरावांनी त्यांनी तोडक्या-मोडक्या सिंधीत उत्तर दिले होते. तरीही ती भेट फार हृदयस्पर्शी होती. त्यांनी एकमेकांना आलिंगन दिले तेव्हा दोघांच्या डोळ्यात अश्रू तरळले होते.

पुण्याच्या पत्रकारितेला त्यावेळी स्वातंत्र्य चळवळीत काम केलेल्या अनेक पत्रकारांची पृष्ठभूमी लाभली होती. स्वातंत्र्य चळवळीत पुण्यातील मंडळींचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असल्याने पत्रकारांमध्ये त्यात काम केलेले लोक होते. त्यामध्ये बाळासाहेब रुद्र, माधवराव साने, भि. ना. ठाकोर, प्रभातचे संपादक वा. रा. कोठारी, वि. स. माडिवाले यांचा समावेश होता. काही जणांकडे सरकारी परवानगीचे पिस्तूलही असायचे. अशा लोकांशी या ना कारणाने गप्पा मारण्याची वेळ यायची, तेव्हा अनेक घटना समोर उभ्या राहायच्या. तरुण भारतमध्ये आमच्या संपादक विभागातच बापूराव भिशीकर, वसंतराव गीत आणि विनायकराव जोशी ही वरिष्ठ मंडळी होती. प्रत्यक्ष उपसंपादक आणि बातमीदार वर्गात प्रामुख्याने माजी केंद्रीय मंत्री प्रमोद महाजन, बाळ भिडे, गो. ह. परांजपे, सुधाकर वेलणकर, गोपाळराव बुधकर ही मंडळी होती. १९७० चा तो काळ बांगलादेश निर्मितीचा होता. त्या काळी केंद्रीय राजकारणाशी संबंधित असलेले अटलबिहारी वाजपेयी व अनेक केंद्रीय पदाधिकारी पुण्यात येत. कोणतीही घटना घडली की, रामभाऊ म्हाळगी, डॉ. लेले यांच्यासह मोहन धारिया, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे यांच्या प्रतिक्रिया घेतल्या जात असत. या काळातील एक दखलपात्र घटना म्हणजे पुण्यातील 'डिफेन्स'या विषयाची आवड असलेला एक तरुण गजानन मेहेंदळे यांना तरुण भारतने बांगलादेशातील मुक्ती चळवळीच्या बातमीदारीसाठी पाठविले होते. ती बातमीदारी त्यांनी चांगली केलीच; पण नंतर त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्र लेखनाचे काम हाती घेतले. त्यानंतरच्या ५० वर्षांच्या काळात त्यांनी शिवचरित्र लिहून पूर्ण केले. त्याआधी ते चरित्र लिहिण्यासाठी १० मोठ्या इतिहासकारांनी प्रयत्न केला होता, पण ते प्रयत्न फळाला गेले नाहीत. मेहेंदळे यांनी सहा खंड लिहिल्यानंतरही त्यांचे असे म्हणणे होते की, मी हे चरित्र पूर्ण केले आहे. पण शिवाजी महाराजांच्या मुत्सद्देगिरीवर भाष्य करीत चरित्र लिहायचे झाले तर त्याला दोन ते तीन आयुष्ये लागतील.



अनेक दशकांपूर्वीची आठवण... पुणे तरुण भारतच्या एका कार्यक्रमात बोलताना गोव्याचे तत्कालीन मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर, शेजारी बाळासाहेब देवरस. सोबत वसंतराव गीत, बापूराव जोशी, बाबाराव भिडे आणि अन्य मान्यवर. (वसंतराव गीत यांचे चिरंजीव डॉ. श्रीराम गीत यांच्या संग्रहातून साभार.)

वृत्तपत्रांच्या संदर्भात आमच्या आधीचा सुमारे दीडशे वर्षांचा काळ वृत्तपत्रांनी स्वातंत्र्य चळवळच हाती घेतल्याचा काळ होता. इसवीसन १८१८ मध्ये देशावर ब्रिटिशांची जुलमी सत्ता असताना बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' वृत्तपत्र काढले. त्या काळात पुण्यातील थोर मंडळी अर्थात एक एक व्यक्ती म्हणजे एक एक विद्यापीठ होते. याच काळी ब्रिटिशांनी पुण्याला देशाची राजधानी म्हणून निश्चित केले होते. पण नंतर केसरी, मराठा या दैनिकांनी साऱ्या स्वातंत्र्य चळवळींना एक निश्चित दिशा दिल्याने ब्रिटिशांनाच तो बेत आवरता घ्यावा लागला.

आमची पिढी पत्रकारितेत आली तेव्हा नुकताच पुणे विद्यापीठाने पत्रकारिता हा अभ्यासक्रम सुरू केला होता. तो पूर्ण करून आम्ही पत्रकारितेत आलो. पण त्या आधी पत्रकारितेत यायचे म्हणजे कोणातरी ज्येष्ठ पत्रकाराचा 'गंडा' बांधून कामाला आरंभ करावा लागे. वृत्तपत्रांनाही अधिक बातमीदार ठेवणे परवडत नसे. त्यामुळे महापालिका, १८ पोलिस स्टेशन्स, शिवाय राजकीय पक्षाची कार्यालये येथे जाऊन माहिती घ्यावी लागे. त्यातून पुण्यात दररोज किमान दोन तरी महत्त्वाच्या व्यक्तींच्या पत्रकार परिषदा असत. पुण्यात पानशेत होऊन नऊ वर्षे झाली होती. टेल्को, गरवारे, स्वस्तिक वैद्य, कल्याणी यांची बस्ताने बसून झाली होती. आम्ही सुरुवात करायच्या काळात कामगार चळवळी सुरू झाल्या होत्या. पानशेतनंतर सरकारने वेगाने चालना देऊन चार एमआयडीसी काढल्या होत्या. पण नंतरच्या कामगार चळवळीत त्यातील निम्म्या बंद झाल्या होत्या. दररोजच्या बातमीदारीत त्याचा मोठा सहभाग असे.

तरुण भारतमध्ये काम करतानाचा सर्वात अडचणीचा आणि भीतीचा काळ म्हणजे आणिबाणीचा काळ होय. प्रत्यक्षात मला कसलाही त्रास झाला नाही आणि पगारही कधी कमी दिला गेला असे झाले नाही. पण भीतीचे वातावरण असायचेच. पहिलाच दिवस म्हणजे २५ जून रोजी संध्याकाळी ही घोषणा झाली. आणिबाणी म्हणजे नेमके काय, हेही आम्हाला समजले नव्हते. पण तोपर्यंत देशातील मोठ्या लोकांना अटक झाल्याची बातमी आली होती. त्यावेळची एक गोष्ट निश्चित आठवते. ती म्हणजे त्यावेळी पुण्याचे महापौर भाई वैद्य आणि भारतीय जनसंघाच्या दोन-तीन व्यक्तींनी शनिवारवाड्यासमोर आणिबाणी विरोधात सत्याग्रह केला होता. त्यांना अटकही करण्यात आली. वास्तविक आंदोलनातील अटक हा आम्हा पत्रकारांना नव्याने काही पाहण्याचा विषय नव्हता. पण त्या दिवशी वातावरणात दहशत होती. पाठोपाठ रामभाऊ म्हाळगी, डॉ. अरविंद लेले. एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे तेथे येऊन पोहोचले. पण आत्ता तुम्हाला अटक करत नाही आहोत, असे पोलिसांनी सांगितले. पण, त्यांनी हेही सांगितले की, तुमचे क्रमांक पुढच्या आठवड्यात असू शकतात.

शहरातील साऱ्या बिटस्ना भेट दिल्यावर आम्ही शनिवारवाड्यावर थोडे अधिक रेंगाळलो होतो. तोपर्यंत कोणीतरी कानात येऊन सांगितले की, तरुण भारतच्या कार्यालयाला पोलिसांचा वेढा पडला आहे. एवढी बातमी आल्यावर तेथे जाणे तर होतेच. अर्थात तेथे वेढा वगैरे काही नव्हता. पण ड्रेसमधील काही पोलिस आणि खाजगी वेशातील १०-१२ पोलिस कार्यालयातच आले होते. बराच वेळ कोणालाच काही कळत नव्हते. पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, अंकातील प्रत्येक मजकूर आम्ही तपासू आणि अयोग्य वाटला तर तो काढायला लावू. आम्ही सारे अस्वस्थ झालो होतो. पण बापूराव अतिशय शांत होते. त्यांनी प्रसिद्धीपूर्व तपासणीस विरोध दर्शविला. तोपर्यंत सारे संचालक मंडळही आले होते. संचालक मंडळ, पोलिस अधिकारी आणि संपादक हे संचालक मंडळाच्या हॉलमध्ये गेले. तेथे १० मिनिटे चर्चा झाली. सारे पोलिस अधिकारी दररोजच्या परिचयाचेच होते. पण त्यांची भाषा काहीशी पोलिसी खाक्याची होती. त्यांनी एकच सांगितले की, तुमचा जो अंक तयार झाला आहे, त्यातील आम्हाला अमान्य असलेला मजकूर आम्ही काढून टाकू. पण हे तुम्ही करणार नसाल सर्वांना ताब्यात घेऊ. तुम्हाला प्रकाशन थांबवावे लागेल. एकूण परिस्थितीचा विचार करता, तयार अंक त्यांना द्यावा लागला. त्यांनी जवळजवळ निम्म्या बातम्या, संपादकीय काढून टाकले गेले. फक्त 'राष्ट्रीय आणिबाणी' एवढा मथळा शिल्लक ठेवला. दुसऱ्या दिवशी बाजारात जो अंक गेला, तो निम्मा अंक खोडलेला होता.

दुसऱ्या दिवशीपासून प्रत्येक बातमी पोलिसांना द्यावी लागत असे. त्या दिवशीपासून शहरातही दररोज आणिबाणीविरोधात निदर्शने होत होती. अटकसत्रही सुरू होते. देशभरातील आणिबाणीची दहशत व वृत्तांतही सर्वांना परिचित आहे. पण तरुण भारतमध्ये हळूहळू अटकसत्र व वेळी-अवेळी तपासण्या सुरू झाल्या. विनायकराव जोशी आणि सारोळकर या दोन वरिष्ठांना अटक झाली. तरुण भारतच्या साप्ताहिक बैठकीत संपादक बापूराव भिशीकर यांनी अतिशय संयमित भाषेत सांगितले की, एक दैनिक सुरू करायला एक पिढी लागते. त्यामुळे आपल्याला तरुण भारत बंद करायचा नाही. अतिशय शांतपणे सर्वांनी काम करावे. त्या प्रसंगाने संपादक बापूराव भिशीकर यांच्या स्वभावाचा एक धीरोदात्त पैलू कळला.

आता त्याच तरुण भारतची पुणे आवृत्ती पुन्हा सुरू होत आहे. आता तसे नव्या वृत्तपत्राचे फारसे अप्रूप राहिलेले नाही, पण राष्ट्रीय भूमिका मांडण्याची गरज असतेच. गेल्या १२ वर्षांत अगदी मोदी यांचे सरकार आल्यावरही आपण दहशतवादाचे नवे रूप सतत पाहतो आणि जिहादी-अत्याचाराच्या दररोज नव्या घटना पुढे येत असतात. लव्ह जिहाद, थुंकी जिहाद, गोध्रा जिहादाची तयारी तर प्रत्येक गावी केली गेलेली असल्याचे चित्र आहे. अशा घटना २०१४ पूर्वी अधिक प्रमाणात घडत, पण त्यांच्या बातम्या येत नसत. आता त्या येताहेत आणि त्यांच्या विरोधात जनमत तयार होते आहे. अर्थात, या साऱ्यांचा सामना कसा करायचा, हे बापूराव भिशीकरांनी ज्या सौम्य व ठाम भाषेत सांगितले होते, त्याच पद्धतीने तरुण भारतला पुढे जावे लागणार आहे.

पुण्यात नागपूर तरुण भारतची पुणे आवृत्ती निघत आहे आणि पुण्यातच मुद्रित होऊन वितरित होत आहे, याचे मनापासून स्वागत आहे. .

पुणे

## दिल्ली वार्तापत्र

# मुख्यमंत्रिपद गेल्यानंतर पक्षांतर करणारे नेते

**श्यामकांत जहागीरदार**

**एखाद्या पक्षाच्या माजी मुख्यमंत्र्याने पद गेल्यानंतर राजीनामा देत दुसऱ्या पक्षात जाण्याची देशातील ही पहिलीच घटना नाही. आतापर्यंत देशातील जवळपास दोन डझनांवर माजी मुख्यमंत्र्यांनी पद गमावल्यानंतर आपल्या पक्षाचा राजीनामा देत दुसऱ्या पक्षात प्रवेश केला वा आपला नवा पक्ष स्थापन केला.**

तामिळनाडू विधानसभेच्या निवडणुकीकडे राज्यातीलच नाही तर देशातील जनतेचेही लक्ष लागले आहे. राज्यात द्रमुक आणि अण्णाद्रमुक या दोन प्रादेशिक पक्षातच खरी चुरस असते. काँग्रेस आणि भाजपा या दोन्ही राष्ट्रीय पक्षांना एकतर द्रमुक वा अण्णाद्रमुकच्या मदतीने निवडणूक रिंगणात उतरावे लागते. काँग्रेस द्रमुकसोबत गेली तर भाजपाला अण्णाद्रमुकचा हात पकडावा लागतो. राज्यातील सत्ता द्रमुक आणि अण्णाद्रमुक या दोन पक्षातच आलटून पालटून फिरत असते. यावेळी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि अण्णाद्रमुकचे ज्येष्ठ नेते ओ. पनीरसेल्वम यांनी द्रमुकचे नेते आणि राज्याचे मुख्यमंत्री स्टॉलिन यांच्या उपस्थितीत द्रमुकमध्ये प्रवेश केला. यामुळे अण्णाद्रमुकला धक्का बसला, असे म्हणता येणार नसले, तरी राज्याच्या राजकारणात मात्र खळबळ उडाली. अण्णाद्रमुकच्या सर्वेसर्वा जयललिता यांच्या निधनानंतर अण्णाद्रमुकमध्ये फूट पडली, या पक्षाची शकले झाली. पनीरसेल्वम राज्यात ओपीएस म्हणून ओळखले जातात. पनीरसेल्वम यांनी तीनदा राज्याचे मुख्यमंत्रिपद भूषविले आहे. जयललिता यांचे अतिशय विश्वासू म्हणून ते ओळखले जात होते. पण जयललिता यांच्या निधनानंतर अण्णाद्रमुकमध्ये नेतृत्वाचा संघर्ष सुरू झाला. पनीरसेल्वम, पलानीसामी आणि शशिकला असे तीन गट अण्णाद्रमुकमध्ये पडले. पनीरसेल्वम २००१ मध्ये पहिल्यांदा राज्याचे मुख्यमंत्री झाले; मात्र सहा महिन्यातच त्यांना राजीनामा द्यावा लागला. २०१४ मध्ये पनीरसेल्वम दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. यावेळी एक महिन्यातच त्यांचे मुख्यमंत्रिपद गेले. २०१६ मध्ये पनीरसेल्वम तिसऱ्यांदा तामिळनाडूचे मुख्यमंत्री झाले. वर्षभरापेक्षा कमी कालावधीतच त्यांना राजीनामा द्यावा लागला.

एखाद्या पक्षाच्या माजी मुख्यमंत्र्याने पद गेल्यानंतर राजीनामा देत दुसऱ्या पक्षात जाण्याची देशातील ही पहिलीच घटना नाही. आतापर्यंत देशातील जवळपास दोन डझनांवर माजी मुख्यमंत्र्यांनी पद गमावल्यानंतर आपल्या पक्षाचा राजीनामा देत दुसऱ्या पक्षात प्रवेश केला वा आपला नवा पक्ष स्थापन केला. मात्र यातील एक अपवाद वगळता दुसऱ्या कोणालाच मुख्यमंत्री बनता आले नाही. अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू हे देशातील एकमेव असे मुख्यमंत्री होते, ज्यांना दुसऱ्या पक्षात गेल्यानंतरही मुख्यमंत्रिपदाची शपथ घेता आली. पेमा खांडू काँग्रेसचे नेते होते. सप्टेंबर २०१६ मध्ये त्यांनी काँग्रेस सोडत अरुणाचल पीपल्स पार्टी या पक्षाची स्थापना केली. नंतर तीन-चार महिन्यातच आपला पक्ष त्यांनी भाजपात विलीन करून टाकला. या दोन्ही परिस्थितीत मुख्यमंत्रिपद त्यांच्याकडे कायम राहिले. अन्य माजी मुख्यमंत्र्यांना मात्र केंद्रीय मंत्री, खासदार आणि पक्षप्रमुख या पदांवरच समाधान मानावे लागले. मुख्यमंत्रिपद गमवावे लागल्यानंतर दुसऱ्या पक्षात प्रवेश केलेले सर्वाधिक म्हणजे चार माजी मुख्यमंत्री हे गोव्यातील आहेत. महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तराखंडातील प्रत्येकी दोन माजी मुख्यमंत्र्याचाही यात समावेश आहे. महाराष्ट्रात अशोक चव्हाण यांनी काँग्रेसच्या शासनकाळात मुख्यमंत्रिपद भूषविले होते. नंतर चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केला. आता ते भाजपातर्फे राज्यसभेवर आहे. नारायण राणे यांनी शिवसेनेचे नेते म्हणून मुख्यमंत्रिपद भूषवले. नंतर राणे यांनी आधी काँग्रेसमध्ये आणि नंतर भाजपात प्रवेश केला. भाजपात आल्यानंतर राणे यांना केंद्रीय मंत्रिपद भूषविण्याची संधीही मिळाली. राजकीय आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात म्हणजे २०१७ मध्ये वयाच्या ८५ व्या वर्षी काँग्रेस नेते एस. एम. कृष्णा यांनी काँग्रेस सोडत भाजपामध्ये प्रवेश केला. कृष्णा १९९९ ते २००४ या काळात कर्नाटकचे मुख्यमंत्री होते. ज्येष्ठ काँग्रेस नेते नारायणदत्त तिवारी यांनी उत्तरप्रदेश आणि उत्तराखंड अशा दोन राज्यांचे मुख्यमंत्रिपद भूषविले होते. तिवारी यांनी काँग्रेस सोडत नव्या पक्षाची स्थापना केली होती. विजय बहुगुणा यांनी काँग्रेस नेते म्हणून उत्तराखंडचे मुख्यमंत्रिपद भूषविले होते. पण २०१६ मध्ये त्यांनी काँग्रेस सोडत भाजपात प्रवेश केला.जितनराम मांझी जदयुचे ज्येष्ठ नेते होते. नितीशकुमार यांच्या जागेवर त्यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. पण वर्षभरापेक्षा कमी कालावधीत त्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. मांझी यांनी मुख्यमंत्रिपदासोबत जदयुचाही राजीनामा देत हिंदुस्थान अवाम मोर्चा या आपल्या पक्षाची स्थापना केली. आज हा पक्ष रालोआचा घटक पक्ष आहे आणि मांझी केंद्रात मंत्री आहेत.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते गुलाम नबी आझाद २००५ ते २००८ या काळात जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री होते. पक्षनेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत आझाद यांनी काँग्रेसचा राजीनामा देत डेमोक्रेटिक आझाद पक्षाची स्थापना केली. कॅप्टन अमरिंदरसिंग यांनी दोनदा पंजाबचे मुख्यमंत्रिपद भूषविले. मात्र नेतृत्वाशी मतभेद झाल्यानंतर अमरिंदरसिंग यांनी काँग्रेसचा राजीनामा देत पंजाब लोक काँग्रेस या आपल्या पक्षाची स्थापना केली. विधानसभा निवडणुकीत या पक्षाचे पानिपत झाल्यानंतर अमरिंदरसिंग यांनी आपला पक्ष भाजपात विलीन करून टाकला.

गोव्याचे माजी मुख्यमंत्री असलेले दिगंबर कामत यांनी २०२२ मध्ये काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केला. राज्यातील दुसरे माजी मुख्यमंत्री लुईजिन्हो फेलेरियो यांनी काँग्रेसचा राजीनामा देत तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. रवी नाईक यांनीही काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केला. चर्चिल आलेमाओ यांनी काँग्रेस सोडत तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री जगदीश शेट्टर यांनी भाजपा सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. पण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधी त्यांची भाजपात घरवापसी झाली. झारखंडचे माजी मुख्यमंत्री बाबुलाल मरांडी यांनी छत्तीसगडमध्ये भाजपा सोडत झारखंड विकास मोर्चा या आपल्या पक्षाची स्थापना केली; २०२० मध्ये ते पुन्हा भाजपात परतले. चंपाई सोरेन फेब्रुवारी ते जुलै २०२४ या काळात झामुमोचे नेते म्हणून मुख्यमंत्री होते. पण मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर सोरेन यांनी भाजपात प्रवेश केला.

मेघालयचे मुख्यमंत्रिपद दोनदा भूषविणारे मुकुल संगमा यांनी २०२१ मध्ये काँग्रेस सोडत तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ओडिशाचे माजी मुख्यमंत्री गिरधर गमांग यांनी २०१५ मध्ये काँग्रेस सोडत आधी भाजपात आणि नंतर भाजपातून तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री किरणकुमार रेड्डी यांनी आंध्रप्रदेशचे विभाजन करण्याच्या काँग्रेसच्या निर्णयाच्या निषेधार्थ २०२३ मध्ये भाजपात प्रवेश केला होता. छत्तीसगडचे पहिले मुख्यमंत्री अजित जोगी यांनी २०१७ मध्ये काँग्रेस सोडत जनता छत्तीसगड काँग्रेसची स्थापना केली होती. या मालिकेत आता अण्णाद्रमुकचे ज्येष्ठ नेते ओ. पनीरसेल्वम यांनी अण्णाद्रमुक सोडत द्रमुकमध्ये प्रवेश केला. पक्षविरोधी कारवाया केल्याच्या आरोपात त्यांना पलानीसामी गटाने अण्णाद्रमुकमधून निष्कासित केले होते. नवा पक्ष स्थापन करण्याचा आणि स्टॅलिन यांच्या नेतृत्वातील द्रमुकमध्ये प्रवेश करण्याचा असे दोन पर्याय होते. द्रमुकमध्ये प्रवेश केल्यानंतर पनीरसेल्वम यांनी राज्यात अण्णाद्रमुक कधीच सत्तेवर येऊ शकणार नाही, असा शापही दिला आहे. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत राज्यात द्रमुक आपली सत्ता कायम ठेवणार की अण्णाद्रमुक सत्तेवर येणार, याकडे आता सगळ्यांचे लक्ष राहणार आहे.

९९९९६६७८१७

## वाचक पत्रे

### तुका आकाशा एव्हढा



संत तुकारामांच्या अभंगवाणीने अवघ्या महाराष्ट्राला सुसंस्कारित करण्याचे कार्य केले. समाजमनावर संस्काराचा फार खोल परिणाम त्यांच्या अभंग रचनेने केला आहे. त्यांच्या प्रत्येक अभंगातून जीवनमूल्यांचा संदेश दिलेला आहे. आजच्या यंत्रयुगामध्ये परोपकाराची जागा उपद्रवी वृत्तीने घेतलेली आहे. या सर्व उपद्रवी वृत्तींना संत तुकारामांनी साडेचारशे वर्षांपूर्वी प्रखर विरोध करून जीवनोपयोगी तत्त्वज्ञान मांडले आहे. पुण्य परउपकार पाप ते परपीडा ।

आणीक नाहीं जोडा दुजा यासी ॥१॥
सत्य तो चि धर्म असत्य ते कर्म ।
आणीक हे वर्म नाहीं दुजे ॥धृ.॥

असा सोपा तत्त्वज्ञानाचा जीवनमूल्यविचार आपल्या अभंगातून सांगितला. तुकोबा सर्वांना जवळचे वाटतात. ते खरे लोकशिक्षक ठरले आहेत. त्यांनी सांगितलेली जीवनमूल्ये ही जीवनाला 'स्वाभिमानी' व 'तेजस्वी' करणारी आहेत. त्याद्वारे कुणालाही आपल्या आयुष्याच्या कालमर्यादित समाधानाच्या अत्युच्च शिखरावर पोहोचता येते. संत तुकारामांनी आपल्या अभंग वाङ्मयातून सात्त्विकतेचा समाधानी भाव निर्माण केला. त्यामुळेच त्यांचे अभंग अक्षरवाङ्मय ठरले. सोबतच ते भागवत संप्रदायातील वैचारिक धर्ममंदिराचे कळस ठरले आहेत.

**डॉ. हरिदास आखरे** / ७५८८५६६४००

### अमेरिकेला विरोध करावा

अमेरिकेने युद्ध कितीही चालू ठेवू शकतो सांगून त्यांचा दंभ जगाला दाखवून दिला असला, तरी तिसऱ्या महायुद्धाची नांदी घालणे त्यांना अशोभनीय आहे. आत्तापर्यंत शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी तारांगण घालणारे ट्रम्प इराणवर हल्ला करून खामेनेईचा खात्मा करतात, ही दुसऱ्या देशात ढवळाढवळ करण्याची परिसीमा आहे. त्यात पुन्हा इस्रायलने त्यांना साथ दिली याचेही दुःख आहेच. अर्थात खामेनी हे धुतल्या तांदळासारखे कधीच नव्हते हे इराणमधील महिला नक्की सांगतील; तरीही एखाद्या देशात राजवट उलथायचा निर्णय हा तिथल्या नागरिकांचा असला पाहिजे, महासत्तेच्या नव्हे! त्याही पलीकडे जाऊन ट्रम्पना लागलेली नैसर्गिक तेलाची पिपासा हा जगासाठी चिंतेचा विषय ठरत आहे. संपूर्ण जग आपल्या तालावर नाचावं ही अपेक्षाच अस्थानी असून संपूर्ण जगात उलथापालथ करण्याचा अमेरिकेला काडीमात्र अधिकार नाही. याआधीही सद्दाम हुसेन, ओसामा बिन लादेन, व्हेनेझुएलाच्या अध्यक्षांचे अपहरण ही निव्वळ पुंडशाही असून त्याला खीळ घालण्याची गरज आहे. जगातील सर्व देशांनी निर्भयपणे अमेरिकेला विरोध केला पाहिजे आणि वेळ आलीच तर वाळीतही टाकायला पाहिजे.

**माया हेमंत भाटकर**/ पुणे-९८६९०७४४९९

### युवकांसाठी मार्गदर्शन

आजच्या स्पर्धात्मक युगात युवकांना करिअर, उद्योजकता आणि स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शनाची गरज आहे. तरुण भारतने राष्ट्रभावनेसोबतच युवकांच्या प्रगतीसाठी साप्ताहिक विशेष पुरवणी सुरू करावी. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा फायदा होईल.

**साक्षी पाटील** /पुणे

### ग्रामीण प्रश्नांवर अधिक भर द्यावा

तरुण भारतमधील राजकीय विश्लेषण प्रभावी असते; मात्र ग्रामीण भागातील शेतकरी, पाणीटंचाई, शेतीमालाचे दर यांसारख्या प्रश्नांवर अधिक सखोल लेख येणे आवश्यक आहे. ग्रामीण भारत हा देशाचा कणा आहे. त्यांचे प्रश्न ठळकपणे मांडले जावे, ही नम्र विनंती.

**संकेत बोरावके** /पुणे

### सामाजिक एकात्मतेबाबत...

दैनिक तरुण भारतमध्ये प्रसिद्ध होणारे सामाजिक एकात्मता आणि राष्ट्रभक्तीवरील लेख वाचून समाधान वाटते. आजच्या विभाजित राजकारणाच्या वातावरणात समाजाला एकत्र ठेवण्याची गरज आहे. आपल्या वृत्तपत्रातून भारती संस्कृती, परंपरा आणि राष्ट्रीय मूल्ये यांचा सातत्याने प्रचार होत असल्याने तरुण पिढीला योग्य दिशा मिळत आहे. अशाच प्रकारचे वैचारिक लेख अधिक प्रमाणात प्रसिद्ध व्हावेत, ही अपेक्षा.

**विश्वास कुलकर्णी** / पुणे

### तिसऱ्या महायुद्धाची ठिणगी

सध्या इराण युद्धात इस्रायल व अमेरिका क्षेपणास्त्राच्या हल्ल्यात दोन्हीही बाजूने जीवित-वित्त हानी होत आहे. भारतातील चाकरमाने सौदी अरेबिया, कुवैत आदी अडकून पडले आहेत. पश्चिम आशिया खंडातील स्थिती चिंताजनक आहे. अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाने यात वेगाने मुसंडी मारली आहे. जगातील इतर खंडातील ब्रिटन, फ्रान्स, जर्मनीसारखे प्रगत देश युद्धात उडी घेण्याच्या तयारीत आहेत. युद्धाचे स्वरूप आता भीषण झाले आहे. भारतातील शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या निर्यातीला फटका बसला आहे. भाववाढ होत आहे. पर्यटक भारतीय प्रवासी हवालदिल झाले आहेत. ही तिसऱ्या जागतिक महायुद्धाची ही ठिणगी आहे, असे वाटू लागले आहे.

**ॲड. बळवंत रानडे** / ९८८१४७३५८०

## महत्वाचे...



### महावितरणमध्ये लाईनदिन निमित्ताने सुनिल काळे यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ४ मार्च-**

केंद्र सरकारने ४ मार्च हा दिवस लाईनमन दिन म्हणून घोषित केला असून त्या अनुषंगाने महावितरण शहर विभाग यांच्या वतीने स्काडा सेंटरमध्ये शहर विभाग कार्यकारी अभियंता राजकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरा करण्यात आला. मंडल कार्यालयाचे अधीक्षक अभियंता सुनिल माने यांच्या हस्ते प्रकाशदूत सुनिल काळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सोलापूर ग्राम ीण विभाग कार्यकारी अभियंता मनिषकुमार सूर्यवंशी, शहर विभाग उपव्यवस्थापक विधी कांबळे मॅडम, अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे, संजीवकुमार कोंडगुळी, हेमंत ताकपिरे, सुरेश मैलापुरे, अशोक निशाणदार, उपकार्यकरी अभियंता नागनाथ गयाळे, आशिष खेडेकर आदी मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी उत्सवमूर्ती प्रकाशदूत म्हणून निलकंठ कांबळे, महेबूब बागवान, श्रीकांत तोटदार, गणेश बसवंती, रमेश कुंभार, अमजद पठाण, संतोष कुंभार, सचिन कानडे, नंदकुमार मार्तंड, दिनेशकुमार बळवंत, सुनिल वाघमोडे, अनिल हब्बू, मद्दसर तोडलबाग, स्वप्निल कोरे, अजिंक्य खिलारे, शोभा पाटकर, प्राजक्ता राऊतराव, जनबाई येलगुंडे, निर्मला पाटकर आदी उपस्थित होते.



### जिल्हाधिकारी कार्यालयाच्या लोकशाही दिनात ४० तक्रारी अर्ज

**सोलापूर, दि. ४ मार्च-**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या लोकशाही दिनात ४० तक्रारी संबंधित कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत असून त्या कार्यालयानी तात्काळ या तक्रारींचा निपटारा करावा, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिले. उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी तक्रारदारांचे म्हणणे ऐकून त्यांचे तक्रार निवारणासाठी योग्य ती कारवाई केली. लोकशाही दिनात उपस्थित सोलापूर विद्यापीठातील लोकप्रशासन व राज्यशास्त्र विभागातील प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थी देखील लोकशाही दिन कार्यक्रमामध्ये काय कामकाज चालते हे पाहण्यासाठी उपस्थित होते.

**लोकशाही दिनात आलेल्या तक्रारी अशा**

पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण-३, महसूल विभाग-१७, जिल्हा परिषद सोलापूर-५, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी-२, सार्वजनिक बांधकाम विभाग-१, सहाय्यक आयुक्त, नगरपालिका प्रशासन-१, महाराष्ट्र उद्योग विकास महामंडळ एमआयडीसी-१, महावितरण-१, म्हाडा-१, लिड बँक-२, अन्न औषध प्रशासन-१, इतर-५ असे एकूण ४० तक्रारी अर्ज प्राप्त झाले.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender (1st call) Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000039118 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 18/2025-2026**, **Particulars:** Enhancement of transformer capacity of 220kV South Solapur by replacement of ICT at 220kV South Solapur under EHV O&M Circle, Solapur. Estimated **cost:** Rs. 58,48,533/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost): Rs** 58,485/- **Tender Fee cost in Rs.** 500.00 + GST, **Sale period:** 05.03.2026 to 22.03.2026 **Last Date of Submission:** 22.03.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 23.03.2026 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Executive Engineer 7447440852 / Dy. Executive Engineer 7447440605 For further details please visit to https://srmetender.mahatransco.in. **Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**
**1) https://srmetender.mahatransco.in.**
**2) https://mahatransco.in**
**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV O&M Circle Solapur**

# माकपचे आक्रमक आंदोलन; ट्रम्प-नेतन्याहूंचा जाळला पुतळा

### इराणवरील हल्ल्यांचा केला निषेध

### हिंदू संघटनेनं विरोध केल्याने काही काळ तणावाचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

अमेरिका आणि इजरायल यांच्याकडून इराणवर सुरू असलेल्या लष्करी कारवायांच्या निषेधार्थ माकपने जिल्हाधिकारी कार्यालय येथे तीव्र व आक्रमक जनआंदोलन आणि निदर्शने करत ट्रम्प-नेतन्याहूंच्या पुतळ्यांचे दहन केले.

यावेळी हिंदू संघटनांनी आंदोनात हस्तक्षेप करत घोषणाबाजी केली. पुतळा जाळल्याने सर्वत्र धुराचे लोळ उठले होते. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत परिस्थिती हाताळली. सुधीर बहिरवाडे यांच्यासह दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

माजी आमदार कॉ नरसय्या आडम मास्तर म्हणाले की , इराणवर



अमेरिका व इस्रायल यांनी केलेले हल्ले हे त्या देशाच्या सार्वभौमत्वावर उघड आक्रमण असून आंतरराष्ट्रीय कायद्याचे गंभीर उल्लंघन आहे. या युद्धजन्य परिस्थितीमुळे मध्यपूर्वेतील तणाव तीव्र झाला असून जागतिक शांततेसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे.माकपचा ठाम विश्वास आहे की युद्ध हा कोणत्याही समस्येचा उपाय असू शकत नाही. संवाद, मुद्सेद्दीगिरी आणि शांततापूर्ण चर्चेच्या माध्यम ातूनच मतभेद सोडवले जावेत. लष्करी हस्तक्षेपामुळे निरपराध नागरिकांचे बळी जात आहेत, तेलाच्या किमती वाढत असून सर्वसामान्यांवर महागाईचा अतिरिक्त भार पडत आहे, असे त्यांनी नमूद केले.

केंद्र सरकारला आवाहन करताना आडम म्हणाले, भारताने आपल्या स्वतंत्र व निर्भीड परराष्ट्र धोरणाची परंपरा जपत या हल्ल्यांचा स्पष्ट शब्दांत निषेध करावा व तात्काळ युद्धविराम ासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढाकार घ्यावा. भारत हा शांतता, सहअस्तित्व आणि निर्गुट परंपरेचा पुरस्कर्ता देश असून त्याने ठाम युद्धविरोधी भूमिका जाहीर करावी.

या आंदोलनात पक्षाचे ज्येष्ठ नेते कॉ. एम. एच. शेख, नलिनी कलबुर्गी, नसीमा शेख, ॲड. अनिल वासम, दत्ता चव्हाण, व्यंकटेश कोंगारी, रंगप्पा म रेड्डी, सुनंदा बल्ला, शकुंतला पाणीभाते, विल्यम ससाणे, विक्रम कलबुर्गी, नरेश दुगाणे, दाऊद शेख, अकील शेख, मल्लेशाम कारमपुरी, अशोक बल्ला, वीरेंद्र पद्मा, सनी शेट्टी, बालकृष्ण मल्याळ, विजय हरसुरे, अभिजित निकंबे, रफिक काझी, वसीम देशमुख, आसिफ पठाण, प्रदीप मरेड्डी, तबसुम शेख, मोहन कोक्कुल,अफसाना बेग आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**काळे झेंडे, घोषणाबाजी करत पुतळा दहन**

जिल्हा परिषद पुनम गेट येथून आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. कार्यकर्त्यांनी काळे झेंडे, काळी वस्त्रे व काळ्या फिती लावून घोषणाबाजी केली. ''युद्ध नको, शांतता हवी'' अशा घोषणा देत निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेत्यांहू यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले.

**बांगलादेशमध्ये हिंदूंवर अत्याचार झाला तेव्हा हे कुठे गेले होते?**

बांगलादेश मध्ये हिंदूंवर अत्याचार झाले. अनेक हिंदूंना मारले गेले. तेव्हा माकप कार्यकर्ते कुठे गेले होते. त्यावेळेस त्यांना दया माया आली नाही. माकापने देश विरोधी आंदोलन केले आहे.

**- सुधीर बहिरवाडे, बजरंग दल व हिंदुत्ववादी संघटना पदाधिकारी**

# आंतरजिल्हा मोटार सायकल चोर जेरबंद



### १५ मोटार सायकली हस्तगत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

सराईत आंतरजिल्हा म ोटार सायकल चोराला शहर गुन्हे शाखेकडून जेरबंद करून त्याच्याकडून ४ लाख ४५ हजार किंमतीच्या १५ मोटार सायकली हस्तगत केल्या.

शहर गुन्हे शाखेने पोलिस आयुक्त एम. राज कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस आयुक्त, शाखेचे स.पो.नि. शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार हे सी.सी.टी.व्ही. फुटेजचे तांत्रीक विश्लेषण करुन मोटार सायकल चोरी करणाऱ्या गुन्हेगारांचा शोध घेत होते. ''एक इसम हा नंबर प्लेट नसलेली होंडा युनिकॉर्न कंपनीची काळया रंगाची मोटार सायकल घेवून विक्री करण्यासाठी सोलापुरातील विष्णू घाट जवळील फुटपाथ जवळ थांबलेला आहे'' त्या इसमास ताब्यात घेतले. सचिन अंकुश कात्रे (वय-४०, मुळ रा. मसोबाची वाडी, ता. वाशी जि. धाराशिव सध्या रा. अंबिका चौक, बीड) असे त्याचे नाव आहे. त्याने या मोटार सायकल काही दिवसापूर्वी दुपारी हुतात्मा स्मृती मंदिर येथून चोरल्याचे कबुल केले. अधिक चौकशी करता त्याने मागील सहा महिन्यात अहिल्यानगर, बीड, जालना, धाराशिव, लातूर व सोलापूर जिल्ह्यातुन आणखी १४ मोटार सायकली चोरल्याने त्या पंचनाम्याने हस्तगत केल्या आहेत.

**THE MAHARASHTRA AGRO-INDUSTRIES DEVELOPMENT CORPORATION LIMITED, MUMBAI**
(A Govt. of Maharashtra Undertaking)
Krushiudyog Bhavan, Aarey Milk Colony, Dinkarrao Desai Marg, Goregaon (E),Mumbai - 65. Tel. 022-28719364
**E-mail -** agroenggmaidc@gmail.com

**RFP NOTICE 2025-26**

The Maharashtra Agro-Industries Development Corporation Limited (MAIDC) invites Online Request for Proposal (RFP) from eligible and qualified agencies under the Quality and Cost Based Selection (QCBS) method for implementation of the Machinery & Equipment Unique ID (ME-UID) Program.

**LAST DATE OF SUBMISSION - 20.03.2026**

Interested Bidders are requested to enroll and visit Maharashtra State E-tendering Portal – **www.mahatenders.gov.in** for details of the tender documents. Tender document can also be seen on our website **www.maidcmumbai.com**

**Sd/-**
**(Suresh Sonawane)**
**Dy.Gen.Manager (AE)**

**जाहीर सूचना**

या जाहीर सूचनेद्वारे जनतेला आवाहन करण्यात येत आहे की परिशिष्टात नमूद मिळकतीच्या संदर्भात खालील मूळ दस्त गहाळ झाले आहेत आणि त्यासंबंधी गहाळ तक्रार अर्ज संबंधित पोलिस स्टेशनला दि. २७/०२/२०२६ रोजी दाखल केला आहे.

* उपनिबंधक सोलापूर उत्तर-२ यांच्या कार्यालयात नोंदणीकृत मूळ खरेदीखत दिनांक : १८/०१/१९९६, रोजी अ.क्र. २९८/१९९६ वरील, मूळ नोंदणी पावती आणि सूची क्र. II.
* उपनिबंधक सोलापूर उत्तर-२ यांच्या कार्यालयात नोंदणीकृत मूळ खरेदीखत दिनांक. ०४/०७/२०१३, रोजी अ. क्र. ७२९८/२०१३ वरील, मूळ नोंदणी पावती आणि सूची क्र. II.

आमच्याकडे उपलब्ध असलेल्या या दस्तऐवजांची प्रमाणीतप्रत, गहाळ तक्रारी दाखल्याची प्रत आणि ही जाहीर सूचना, हे दुय्यम पुरावा म्हणून गृहीत धरून ती मूळ मालकी दस्त म्हणून स्वीकारली जातील. तसेच परिशिष्टात नमूद मिळकत श्री. श्रीनिवास पोशेट्टी बंडी यांच्या मालकीची आहे आणि सध्या परिशिष्टात नमूद मि ळकती त्यांनी कोणत्याही बँकेकडे गहाण ठेवलेली नाही आणि श्री. श्रीनिवास पोशेट्टी बंडी, ती मिळकत जना स्मॉल फायनान्स बँक लि.,कडे गहाण ठेवणार आहेत. खाली दिलेल्या परिशिष्टात नमूद मिळकतीबद्दल कोणत्याही स्वरूपाचा आक्षेप असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत, खाली नमूद केलेल्या कार्यालयाच्या पत्त्यावर ते लेखी स्वरूपात कळवावेत.

**परिशिष्ट**

जिल्हा सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर, पैकी मौजे मजरेवाडी, येथील नवीन सर्वे क्र. २९/१/१ जुना सर्वे क्र. २३५/१/१, इंगळे वस्ती येथील, प्लॉट क्र. २९ पैकी उत्तरेकडील ४६.३५ चौ. मी., ची मिळकत.

ही जाहीर सूचना प्रसिद्ध केली दि. ०४/०३/२०२६

**सही/-**
**ॲड. गणेश वसंत कटारे**
**ॲड. मंजुषा ग. कटारे (लोखंडे)**
**कार्यालय क्र. ११, पहिला मजला,**
**स्क्वेअर-वन कॉम्प्लेक्स,**
**१३१, सिध्देश्वर पेठ, सोलापूर-०३**
**मोबाइल क्र. ९८६०११००११**

**जाहीर नोटीस**

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ६३/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. तबस्सुम अमीर मुल्ला** - **अर्जदार**
रा. तानाजी चौक आनंद नगर लातूर
(असल्यास, तर्फे वकील अजुम पटेल)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** - **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. तानाजी चौक आनंद नगर, लातूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी दिनांक ०२ जुन १९७१ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०२ जुन १९७१ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

**जाहीर नोटीस**

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. २९/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. निकहत आरा बहाउददीन जुनेदी** - **अर्जदार**
रा. टंगसाल नगर मजेरवाडी सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील सोमनाथ ह. सावंत)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** - **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. टंगसाल नगर मजेरवाडी सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी दिनांक ०२ जुन १९७५ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०२ जुन १९७५ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

**जाहीर नोटीस**

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. १२/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. नसरीन अजीज तांबोळी** - **अर्जदार**
रा. १८९/१ नाळे प्लॉट, बार्शी
(असल्यास, तर्फे वकील अजुम पटेल)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** - **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. १८९/१ नाळे प्लॉट, बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी दिनांक ०९ जुलै १९८१ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०९ जुलै १९८१ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

अर्ज वारस दाखला मिळणेबाबत
दि. कि. अर्ज नं. ०६/२०२६
नि.नं.६

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. साहेब यांचे कोर्टात**
**(मे. आर.पी. बागडे सो कोर्ट)**

१) **श्रीमती रुक्मीणी विठ्ठल भोरे,**
वय - ७३ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. कासारी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **दिलीप विठ्ठल भोरे,**
वय - ४३ वर्षे, धंदा - शेती,
रा. कासारी, ता. बार्शी, जि. सोलापूर
३) **सविता विष्णू संकपाळ,**
वय - ४० वर्षे, धंदा - घरकाम,
रा. स.नं. ४१/१/अ, चौधरी वस्ती,
रक्षकनगर, फ-२ मागे खराडी,
चंदन नगर, दुकीक्लींने पुणे-४११०१४
— **अर्जदार**
विरूध्द
**कोणी नाही** - **सा.वाला**

**अर्ज - अर्ज वारस दाखला मिळणेबावत**

ज्या अर्थी, यातील अर्जदार वरिल नमूद ठिकाणचे रहिवाशी असून अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल विठ्ठल जालिंदर भोरे हे दि. ०७/०६/२०२४ रोजी कासारी, ता. बार्शी या ठिकाणी मयत झाले. मयत विठ्ठल जालिंदर भोरे यांना अर्जदाराशिवाय जवळचे व कायदेशीर वारस दुसरे कोणीही नव्हते व नाहीत. त्यामुळे सदर मयत विठ्ठल जालिंदर भोरे यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ३ हेच जवळचे व कायदेशीर वारस असल्यामुळे अर्जदारांना मयत विठ्ठल जालिंदर भोरे यांचे जवळचे व कायदेशीर वारस ठरवून वारस दाखला मिळणे न्यायाचे दृष्टीने जरूरीचे असल्याने सदरचा अर्ज यातील अर्जदार नं. १ ते ३ यांना मयत विठ्ठल जालिंदर भोरे यांचे कायदेशार वारस ठरवून अर्जदारांना वारस दाखला मिळणेसाठी अर्जदारांचा हा अर्ज आहे.

त्या अर्थी सदर अर्जदार नं. १ ते ३ यांचे व्यतिरीक्त मयत विठ्ठल जालिंदर भोरे यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा मे. कोर्टानी नेमली ता. ३०/०३/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे हे जाहीर प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिवकयानिशी दिले असे. ता. ०४/०३/२०२६.

कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, बार्शी**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि. कि. अर्ज ०८/२०२८
नि.नं. ०६

**बार्शी येथील मे. सिव्हिल जज्ज सिनिअर डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात**

**श्रीमती सुनंदा नागनाथ गायकवाड, वगैरे** - **अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही** - **सा.वाला**

**अर्ज - भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे**

ज्या अर्थी, यातील अर्जदार नं. १ ते ३ हे अर्जात दिलेल्या पत्त्यावरील कायमचे रहिवाशी होते व आहेत. अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २, ३ चे वडिल नागनाथ भाऊराव गायकवाड हे दि. ०३/१२/२०२५ रोजी बार्शी या ठिकाणी मयत झालेले आहेत. मयत नागनाथ भाऊराव गायकवाड यांचे नावे युनियन बँक ऑफ इंडिया शाखा बार्शी, कालभैरव नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बार्शी व सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सोलापूर शाखा रिधोरे या बँकामध्ये, त्यांचे नावे असलेल्या खात्यांमध्ये एकूण रक्कम रु. ५,९६,५२३.५५ पै. (अक्षरी र. रु. पाच लाख शहाण्णव हजार पाचशे तेवीस रु. पंचावन्न पैसे) जमा असून मयत नागनाथ भाऊराव गायकवाड यांना व त्यांचे नावावरील रक्कमेस अर्जदार नं. १ ते ३ यांचे शिवाय दुसरे कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्यामुळे सदरची रक्कम घेणेस अर्जदार नं. १ ते ३ यांना भारतीय वारसा कायदयानुसार हक्क अधिकार आहे. त्याप्रमाणे यातील अर्जदार नं. १ ते ३ हे मयत नागनाथ भाऊराव गायकवाड यांचे कायदेशीर वारस (Legal Heirs) आहेत, असे जाहीर होऊन त्याप्रमाणे वर नमूद रक्कम मिळणेकामी अर्जदार नं. २ व ३ यांच्या वतीने अर्जदार नं. १ यांना वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेसाठी सदरचा अर्ज आहे.

त्या अर्थी, सदर अर्जदार नं. १ ते ३ यांचे व्यतिरिक्त मयत नागनाथ भाऊराव गायकवाड यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. २९/०४/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी मे. कोर्टात दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदार नं. १ ते ३ यांना अर्जाप्रम ाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले असे. ता. ०४/०३/२०२६

शिक्का
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय,**
**वरिष्ठ स्तर, बार्शी**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः येळंब व बार्शी, ता बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन डि. सोलापूर, सब. डि. व ता. बार्शी पैकी मौजे येळंब येथील शेतजमीन याचा तपशील:- अ) श्री सुदाम मारुती चौधरी (खाते नं. ५४१) यांचे गट नं ३८/३ मधील क्षेत्र ०२ हे ८० आर यासी आकार ०३ रु ७२ पैसे आहे. यासी चतुःसीमा :- पूर्वेस - शिव, दक्षिण - सदर गटातील श्री विनोद सुदाम चौधरी यांची शेतजमीन, पश्चिमेस - गट नं. ३९, उत्तरेस - सदर गटातील श्री दिनेश भास्कर पवार, श्रीमती पुष्पा भास्कर पवार, सौ. दीप्ती अमित चेडे आणि श्री कमलाकर परशुराम पवार यांची गट नं. ३८ पैकी शेतजमीन ब) श्री विनोद सुदाम चौधरी (खाते नं. ५४२) यांचे गट नं ३८/३ मधील क्षेत्र ०२ हे ८० आर यासी आकार ०३ रु ७२ पैसे आहे. यासी चतुःसीमा :- पूर्वेस - शिव, दक्षिण - शिव, पश्चिमेस - गट नं. ३९, उत्तरेस - सदर गटातील श्री सुदाम मारुती चौधरी यांची शेतजमीन. असे गट नं ३८/३ मधील संपूर्ण शेतजमीन याचे क्षेत्रफळ ०५ हे ६० आर अशी जिरायत शेतजमीन.

सदर शेतजमीन १) श्री सुदाम मारुती चौधरी (खाते नं. ५४१) आणि २) श्री विनोद सुदाम चौधरी (खाते नं. ५४२) यांच्या खरेदी मालकीची असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांच्या नावाची नोंद असून सदर शेतजमीन प्रत्यक्ष कब्जे वाहिवाटीस आहे. सदरची शेतजमीन ते विक्री करू इच्छितात, शेतजमीन विक्री निघालेबाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने १) श्री सुदाम मारुती चौधरी (खाते नं. ५४१) आणि २) श्री विनोद सुदाम चौधरी (खाते नं. ५४२) यांनी सदरची शेतजमीन विक्री करणेबाबतचा करार आमच्या अशीलाशी केला. त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रक्कम स्वीकारली आहे, व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशील बरोबर ठरविला आहे.

सदर शेतजमिनीवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०८ दिवसाचे आत अशिलातर्फे वकिल यांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून शेतजमीन बिनबोजाची, क्लिअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर शेतजमीन खरेदी करतील. खरेदीनंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये करिता खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. दि. ०४/०३/२०२६.

**सही/-**
**ॲड. अमरदिप राजीव क्षीरसागर,**
**ऑफिस पत्ता :- गाळा नं. २७,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉम्प्लेक्स,**
**सुलाखे हायस्कूल रोड, बार्शी.**
**रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे सर्जापूर, ता. बार्शी येथील व आसपासचे परीसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. वैराग, ता. बार्शी पैकी मौजे सर्जापूर येथील जमीनी - गट नं. ११५/२ पैकी क्षेत्र ०२ हे. ०२ आर, आकार ०१ रु. ८० पैसे, तसेच ०३ हे. ७९ आर, + पो.ख. ०० हे. १२ आर, असे एकूण क्षेत्र ०३ हे. ९१ आर, आकार ०३ रु. ४७ पैसे, तसेच गट नं. १६१/२ क्षेत्र ०० हे. ९४ आर, आकार ०१ रु. ८३ पैसे, गट नं. १६१/३ क्षेत्र ०० हे. ९५ आर, आकार ०१ रु. ८१ पैसे आणि गट नं. १८३/२/अ क्षेत्र ०१ हे. ५६ आर, येणेप्रमाणे वर्णनाच्या जमीनी आतील सर्व तदंगभूत वस्तूसह.

वर वर्णन केलेल्या जमीनीपैकी काही जमीनी, आमचे अशिल नं. १ चे सासरे रामेश्वर ईश्वर गायकवाड, दीर सिध्देश्वर रामेश्वर गायकवाड आणि चुलत सासरे अर्जुन ईश्वर गायकवाड यांचे नांवे आहेत. आमचे अशिल, तसेच त्यांचे सासरे, सासू, दीर यांचे अविभक्त एकत्र हिंदू कुटूंब होते व आहे. वरील जमीनी सदर एकत्र कुटूंबाचे समाईक मालकीच्या व कब्जे वहिवाटीच्या आहेत. त्याबाबत त्यांचेमध्ये अद्यापही वाटप झालेले नाही. सदर जमीनीत आमचे अशिलांचे समाईक अविभक्त असे हिस्से होते व आहेत. आमचे अशिल त्यांचे हिस्स्यांचे वाटप होऊन पृथक कब्जा मिळणेसाठी तसेच पोटगी रक्कम ठरवून वसूल होवून मिळणेसाठी अलहिदा कोर्ट कारवाई करत आहेत.

आमचे अशिलांना सदर मिळकतीमधील त्यांचे हक्क, हिस्से मिळू नयेत म्हणून, सदरचे लोक, सदर मिळकती आमचे अशिलांचे संमतीविना, त्यांचे परस्पर, विक्री करून, रक्कमा हडप करणेचे प्रयत्नात आहेत. त्यादृष्टीने त्यांनी जोरदार खटाटोप चालू केलेला आहे.

तेव्हा सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांचे समाईक, अविभक्त हक्क, हिस्से असल्याने, सदर मिळकती बाबत, वरील लोकांशी कोणीही गहाण, दान, लिज, भाडेपट्टा, खरेदी, बक्षीस, वहिवाटीचे हक्क वा तत्सम स्वरुपाचे हस्तांतराचे व्यवहार, तसेच कर्जबोजाचे स्वरुपाचे व्यवहार, करु नयेत. केलेस ते आमचे अशिलाचे हक्क हिस्स्यांवर बंधनकारक राहणार नाहीत. तसे व्यवहार करण्यावर आमचे अशिल कायदेशीर कारवाई करतील. मग त्याचे खर्चाची परीणामाची सर्वस्वी जबाबदारी त्यांच्यावरच सहिल. कोणाचीही फसगत होवू नये ही जाहिर नोटीस दिली.

कळावे, ता. ०३/०२/२०२६

**सही/-**
**श्री. गुंड एस.एम. (लाडोळेकर)**
**(बी.ए., ऑनर्स एल.एल.बी.) ॲडव्होकेट**
**'सदानंद' ७३०/२/३७, सिध्देश्वर नगर,**
**कासारवाडी रोड, बार्शी**
**रोहिणी विश्वास गायकवाड, वगैरे,**
**रा. सध्या खुनेश्वर, ता. मोहोळ**
**तर्फे ॲडव्होकेट**



# टी-२० विश्वचषकाचा थरार



# भारताला अंतिम फेरीसाठी विजय हवा

◆ **मुंबई, ४ मार्च**

आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत गुरुवारी येथे गत विजेता भारत आणि इंग्लंड यांच्यादरम्यान दुसरा उपांत्य सामना खेळला जाणार आहे. उच्च-दबावाच्या उपांत्य लढतीत दोन्ही संघ आपल्या विजयाचा मार्ग शोधणार आहे. अंतिम फेरी गाठण्यासाठी भारताला इंग्लंडच्या धोकादायक फिरकी गोलंदाजीच सामना करावा लागणार आहे.

भारतीय संघाला साखळी फेरीत बऱ्या संघांविरुद्ध परिपूर्ण खेळ करता आला नाही.

तथापि, सुपर ८ च्या सलामीच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेकडून बाद झाल्यानंतर त्यांनी लवचिक दृष्टिकोन स्वीकारून स्वतःची चांगली सेवा केली आहे. पॉवरप्लेमध्ये डावखुऱ्या अव्वल तीनच्या अंदाजाला तोडण्यासाठी संजू सॅमसनला संघात परत आणण्यात आले आणि त्या चालीने उत्तम कामगिरी केली आहे.

भारतीय पदार्पणानंतर १० वर्षांहून अधिक काळानंतर, सॅमसनने अखेर वेस्ट इंडीजविरुद्धच्या उपांत्यपूर्व सामन्यासारख्या लढतीत नाबाद ९७ धावांची खेळी करत विश्वचषकाच्या मैदानावर उत्तम कामगिरी केली. त्या विशेष प्रयत्नानंतर ३१ वर्षीय खेळाडूचा आत्मविश्वास उंचावलेला असेल आणि त्याचा सलामीचा जोडीदार अभिषेक शर्मावर याचा परिणाम होईल अशी भारताला आशा आहे. आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत प्रवेश करण्यापूर्वी अभिषेक आपल्या कारकिर्दीत सर्वोत्तम फॉर्ममध्ये होता तर न्यूझीलंडविरुद्धच्या द्विपक्षीय सामन्यांमध्ये निराशाजनक कामगिरीनंतर सॅमसनला अंतिम एकादशमधून वगळावे लागले होते.



सूर्यकुमार यादव



हॅरी ब्रुक

आता परिस्थिती उलटली आहे. अभिषेकला आत्मविश्वास वाढवणाऱ्या खेळीची नितांत आवश्यकता आहे. अभिषेकने सुपर एट सामन्यात झिम्बाब्वेविरुद्ध अर्धशतक झळकावले होते.

इंग्लंडने दोन्ही सलामीवीरांसाठी आपले नियोजन तयार केले आहे. सॅमसनची परीक्षा घेण्यासाठी जोफ्रा आर्चरकडून आखुड टप्प्याच्या चेंडूंचा जोरदार वर्षाव होण्याची अपेक्षा आहे, तर पॉवरप्लेमध्ये विल जॅक्स आपल्या ऑफ-स्पिनने अभिषेकला शर्माला त्रास देऊ शकतो.

डावखुरा फिरकीपटू लियाम डॉसननेही पहिल्या सहा षटकांत गोलंदाजी केली, तर यजमान संघाला मधल्या षटकांत धूर्त आदिल रशीदविरुद्ध सर्वोत्तम कामगिरी करावी लागेल. मंगळवारी तीन तासांच्या सराव सत्रात सलामीवीर व उर्वरित भारतीय फलंदाजांनी त्या सर्व आव्हानांना लक्षात ठेवले होते. सुरुवातीच्या निराशाजनक कामगिरीनंतर ईशान किशन जोरदार फटकेबाजी करण्यासाठी सज्ज झाला असेल. भारतीय संघातील सध्याचे मुंबई इंडियन्सचे स्टार खेळाडू- कर्णधार सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा व हार्दिक पांड्या यांच्या बाबतीतही हेच आहे. त्यांनी उपांत्य फेरीपूर्वी सराव सत्रात दोन तासांपेक्षा जास्त वेळ फलंदाजी केली. अक्षर पटेल व वरुण चक्रवर्ती या फिरकी जोडीकडे चुकांसाठी जागा राहणार नाही. वेस्ट इंडीज व दक्षिण आफ्रिकेविरुद्ध थोडे महागडे ठरल्यानंतर या गूढ फिरकी गोलंदाजाला सातत्याने त्याच्या लांबी शोधण्याची आवश्यकता आहे. जसप्रीत बुमराह नेहमीप्रमाणे उत्कृष्ट कामगिरी करत आहे, परंतु शेवटच्या पाच षटकांमध्ये त्याला थोडी सुधारणा आवश्यक आहे. शिवम दुबे हा सहाव्या गोलंदाजीचा धोकादायक पर्याय असल्याने सूर्या त्याच्या संसाधनांचा कसा वापर करतो हे पाहणे मनोरंजक असेल.

कुलदीप यादवला खेळवणे नेहमीच आकर्षक संधी असते, परंतु भारत त्यांच्या अंतिम एकादशमध्ये बदल करण्याची शक्यता कमी आहे. (वृत्तसंस्था)

**आजचा उपांत्य सामना**

**भारत वि. इंग्लंड**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : सायं. ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

## लगान

**तर मंडळी पुन्हा एकदा वेळ आली आहे लगान वसूल करायची! मुहुर्त आहे आज संध्याकाळी आणि ठिकाण आहे वानखेडे मुंबई!!**

अब आएगा मजा. सॅम करननं ललकारलं आहेच. सामना सुरू व्हायच्या आधी राष्ट्रगीत होतं. त्यानंतर सामना सुरू झाल्यावर प्रेक्षक कल्ला करतात आणि मैदान दणाणून जातं.आपला संघ जसजसा खेळावर पकड मिळवत जातो, तसतसा हा जल्लोष वाढत जातो. तो जल्लोष शांत करण्याची धमकी सायबानं दिलीये. बघू आज संध्याकाळी वानखेडे गुपचूप होणार का जल्लोष वाढत जाणार!

भारत आणि इंग्लंड दोघांची सेमी फायनल पर्यंतची वाटचाल संमिश्र यशाची झाली आहे. भारताचा सुपर एट मधील प्रवेश आश्वासक होता. एकवेळ अशी होती की, इंग्लंड सुपर एट पर्यंत तरी पोचतो की नाही. पहिल्याच सामन्यात नेपाळने इंग्लंडला जवळ जवळ हरवलं होतं. नशीबाने साथ दिली, इंगलंडची झाकली मुठ सव्वा लाखाची राहिली! दुसऱ्या सामन्यात तर विंडीजने इंग्लंडला आस्मान दाखवलं तेव्हा या संघाला परतीचं तिकीट लवकर बुक करावं लागणार असं वाटलं होतं. तिसरा चवथ्या सामना स्कॉटलंड, इटली बरोबर होता. तिथे काही अपसेट झालं नाही, इंग्लंड कसाबसा सुपर एट ला पोचला.

त्यामानाने आपली सुपर एट पर्यंतची वाटचाल विश्व विजेत्या सारखी होती. अमेरिका,नामिबिया, पाकिस्तान, नेदरलँड्स या दुबळ्या प्रतिस्पर्ध्यांना आपण आरामात हरवलं. त्यातही पहिल्या सामन्यात याच वानखेडेवर अमेरिकेने आपल्याला घाम फोडला होता. नशीब सूर्या मदतीला धावून आला आणि संकट टळलं. उद्या वानखेडेवर आपली पहिली फलंदाजी आली तर अमेरिकेचा सामना विसरून चालणार नाही. सुपर एट नंतर इंग्लंड सुसाट सुटला आणि सगळ्यात आधी सेमीला पोचला. त्याउलट आपले प्रश्न जास्तच बिकट होत गेले. दक्षिण आफ्रिकेनं आपल्याला जमिनीवर आणलं. करो या मरो असे दोन सामने आपण जिंकलो.झिंबाब्वे आणि विंडिजला हरवून आपण कसेबसे सेमीला पोचलो. सगळ्यात शेवटी. विंडीज विरुद्ध चा सामना संजूचा सामना म्हणून लक्षात राहील! इंग्लंडसमोर सॉल्ट,बटलरचा हरवलेला सूर, तर आपल्या समोर अभिषेकचं अविश्वसनीय अपयश, त्यात भर म्हणून गेल्या दोन सामन्यात मिस्टरी स्पिनर वरुणचं दारुण अपयश आणि त्याची झालेली धुलाई, या दोन मोठ्या समस्या आहेत. कॅच पकडण्यात येणारं अपयश ही सुद्धा मोठी चिंतेची बाब आहे. याची उत्तरं शोधावीच लागतील.प्लेइंग इलेवन मध्ये कसंही करुन कुलदीपला आणावं लागेल. दंव! ड्यु फॅक्टर वानखेडेवर महत्वाचा ठरणार आहे. टॉस आपल्या हातात नाही, तेव्हा या ड्यु फॅक्टर वर मात करणारी रणनिती आखावी लागेल. पहिली फलंदाजी मिळाली तर कमी धोका पत्करून धावफलक २२५+ असा करता आला पाहिजे. समुद्र किनारी वानखेडेवर संध्याकाळी प्लेझंट ब्रीझ.. झुळझुळ वाहणारं वार असतं अंधार पडल्यावर वारं थांबतं आणि प्रचंड दंव पडलेलं असतं. सुमारे नऊ सवानऊ नंतर.... मार्क माय वर्ड्स.... रात्री सव्वा नऊ वाजता जो संघ आघाडीवर असेल तो संघ सामना जिंकणार.




आता फक्त दोन पावलं दूर आहोत आपण विश्वचषकापासून. एका पावलानं इंग्लंड आणि दुसऱ्या पावलानं प्रोटिएस किंवा किवी जो समोर येईल त्याला पाताळात धाडावं लागेल, मग पुन्हा एकदा विश्वचषक आपलाच! विजयी भव टीम इंडिया!!

**- मुकुंद कुलकर्णी**
मो. ९४२१४५४८८८

## महत्त्वाचे

### झील देसाई, अंकिता रैनाची दुसऱ्या फेरीत धडक



**कलाबुर्गी** : येथे सुरू असलेल्या आयटीएफ डब्ल्यू ३५ कलाबुर्गी टेनिस स्पर्धेत भारतीय स्टार अंकिता रैना आणि झील देसाईने आत्मविश्वासाने पहिल्या फेरीत विजय मिळवून दुसऱ्या फेरीत धडक मारली, तर कर्नाटकच्या सोहा सादिकने प्रारंभी आक्रमक खेळ दाखवला, पण नंतर पराभव पत्करला. आठव्या मानांकित अंकिता रैनाने भारतीय संघाच्या सोनल पाटीलचा ६-१, ६-३ असा पराभव केला. रैनाने पुढील फेरीत आपले स्थान निश्चित करण्यासाठी अधिकारासह सामना संपवला. पाचव्या मानांकित झील देसाईनेही सहकारी भारतीय जेनिफर लुईखमविरुद्ध दमदार कामगिरी केल्यानंतर प्रगती केली. देसाईने स्थिर बेसलाइन प्लेसह पहिला सेट ६-२ असा जिंकला आणि दुसऱ्या सेटमध्येही तिने वर्चस्व गाजविले व दुसऱ्या फेरीत आपले स्थान निश्चित केले.

# बांगलादेश वन-डे मालिकेसाठी पाकिस्तान संघात ६ नवे चेहरे

◆ **लाहोर, ४ मार्च**

पाकिस्तान क्रिकेट मंडळाने (पीसीबी) बुधवारी बांगलादेशविरुद्ध ११ मार्चपासून सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या परदेशातील एकदिवसीय मालिकेत १५ सदस्यीय संघात सहा नवोदित खेळाडूंची निवड केली आहे.

इराण युद्धामुळे विमान वाहतुकीत अडथळा निर्माण झाल्यामुळे दौऱ्याभोवती काही दिवस अनिश्चिततेनंतर पीसीबीने संघाची घोषणा केली. निवडकर्त्यांनी शाहिन शाह आफ्रिदीच्या नेतृत्वाखालील संघात वेगवान गोलंदाज हरिस रौफ आणि फलंदाज हुसेन तलत यांनाही परत बोलावले आहे. पाकिस्तानचा संघ ९ मार्च रोजी ढाक्याला रवाना होईल आणि ११, १३ व १५ मार्च रोजी शेरे बांगला नॅशनल स्टेडियमवर तिन्ही एकदिवसीय सामने होणार आहेत. **संघ** : शाहीन शाह आफ्रिदी (कर्णधार), अब्दुल समद, अब्रार अहमद, फहीम अश्रफ, फैसल अक्रम, हरिस रौफ, हुसेन तलत, माझ सदाकत, मोहम्मद रिझवान (यष्टिरक्षक), मोहम्मद वसीम ज्युनियर, मुहम्मद गाजी घोरी (यष्टिरक्षक), साद मसूद, साहिबजादा फरहान, सलमान अली आगा आणि शामिल हुसेन. (वृत्तसंस्था)

### सरफराज अहमदसमोर मुख्य प्रशिक्षकपदाचा प्रस्ताव

**कराची** : पाकिस्तान क्रिकेट मंडळाने (पीसीबी) माजी कर्णधार सरफराज अहमदसमोर पाकिस्तानच्या कसोटी संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी सोपविण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. पीसीबी सरफराजला ही भूमिका देऊ इच्छित असून ते ३८ वर्षीय सरफराजकडून अंतिम मंजुरीची वाट पाहत आहे.पीसीबीने परस्पर संमतीने अझहरचा करार संपवल्याने, सरफराज आता कायमस्वरूपी मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारणार असल्याचे एका विश्वसनीय सूत्राने सांगितले. मागील तीन आवृत्त्यांमध्ये पाकिस्तान कधीही प्रतिष्ठित डब्ल्यूटीसीसाठी पात्र ठरण्याच्या जवळ पोहोचला नाही. सर्फराज हा कसोटी संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून जबाबदारी मिळालेला सर्वात तरुण खेळाडू असेल. त्याने पाकिस्तानसाठी ५४ कसोटी, ११७ एकदिवसीय आणि ६१ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले, त्यामुळे पाकिस्तानने १९ वर्षांखालील विश्वचषक आणि २०१७ च्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद मिळवले.

### भारतीय महिला क्रिकेट संघाला लॉरियस पुरस्कारासाठी नामांकन

**नवी दिल्ली** : २०२५ हे वर्ष भारतीय महिला क्रिकेट संघासाठी ऐतिहासिक ठरले. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला संघाने पहिल्यांदाच एकदिवसीय विश्वचषक जिंकले. या यशानंतर आता संघाला लॉरियस स्पोर्ट्सच्या 'टीम ऑफ द इयर' पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे. हा नामांकन मिळालेला संघ हा महिला क्रिकेटमधील पहिला भारतीय संघ आहे. भारतीय संघाला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य फेरीत मिळालेल्या विजयाचा महत्त्वाचा लाभ मानला जात आहे.

# बार्शीचा सायकलपटू सुरज मुंढे 'चॅलेंज लेपरेटल' पुरस्कारासाठी पात्र

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ४ मार्च-**

बार्शी सायकलिंग क्लबचा सायकलपटू सुरज मुंढे याने ऑर्डॅक्स क्लब पॅरिसियन अंतर्गत पी.सी.एम.सी. सायक्लीस्ट क्लबतर्फे आयोजित केलेल्या पुणेबासरपुणे १२०० कि.मी. अंतराच्या एलआरएम (लाँग राईड मॅरेथॉन) स्पर्धेत ८३ तास ३२ मिनिटांत अंतर पूर्ण केले. या कामगिरीवर त्याने 'चॅलेंज लेपरेटल' या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी पात्रता मिळवली आहे. या यशामुळे त्याची या नामांकित आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झाल्यामुळे बार्शी सायकलिंग क्लबच्या नावात आणखी एक मानाचा तुरा रोवला जाणार आहे.

या एलआरएममध्ये देशातील १२ व रशियातील १ अशा एकूण १३ सायकलपटूंनी सहभाग नोंदविला होता. सर्व स्पर्धकांना १२०० कि.मी. अंतर निर्धारित ९० तासांत पूर्ण करणे अनिवार्य होते. २६ फेब्रुवारी रोजी सकाळी ५:३० वाजता हडपसर येथील सोजस पॅलेस येथून अल्ट्रामॅन श्री. दशरथ जाधव यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेची सुरुवात झाली. स्पर्धेदरम्यान आयोजकांकडून ठराविक अंतरावर ११ तपासणी नाके ठेवण्यात आले होते. प्रत्येक स्पर्धकाने नियमांचे काटेकोर पालन करत निश्चित वेळेत या तपासणी नाक्यांवर पोहोचणे बंधनकारक होते. अति उष्ण वातावरण, वेगवान वारे, काही ठिकाणी कडाक्याची थंडी, मोठी उड्डाणपुले, तसेच सततचे चढ-उतार अशा विविध आव्हानांना सामोरे जात आहार व झोपेचे नियोजन सांभाळत ही स्पर्धा पूर्ण करणे ही खऱ्या अर्थाने सहनशक्तीची परीक्षा होती. सुरज याने याआधी देखील त्याने १२०० कि.मी.च्या तीन स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केल्या असून ही स्पर्धा त्याच्यासाठी विशेष महत्त्वाची ठरली. स्पर्धा पूर्ण करणाऱ्या सर्व यशस्वी सायकलपटूंना क्लबतर्फे पुष्पगुच्छ, पगडी, पदक व मेडल हँगर देऊन सन्मानित करण्यात आले.आपल्या या यशाचे श्रेय सुरजने आपल्या मार्गदर्शक व प्रशिक्षक, कुटुंबीय आणि सायकलिंग क्षेत्रातील मित्रांना दिले असून पुढील काळातही अशाच स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्याचा त्याचा निर्धार आहे.




# पंढरपूरच्या लक्ष्मी मानेची राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ मार्च -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन कराटे स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या लक्ष्मी माने व अतुल चव्हाण यांनी उल्लेनीय कामगिरी केली. लक्ष्मीने ५५ किलो गटात सुवर्ण तर अतुलने रौप्य पटकाविले. लक्ष्मीची अखिल भारतीय आतंरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांचे प्राचार्य डॉ. बी. टी.जाधव, उपप्राचार्य डॉ भगवान नाईकनवरे, डॉ. राजेश कवडे, डॉ. सुशील शिंदे, विविध विभागांचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, क्रीडा विभागप्रमुख प्रा.अनिल परमार, प्रा.विठ्ठल फुले, प्रा.मनोज खपाले आदींनी शुभेच्छा दिल्या.





पश्चिम महाराष्ट्र भैरवनाथ श्री शरीरसौष्ठव स्पर्धा

# शहानवाज नदाफ प्रथम

## पंढरपूरचा लक्ष सुरवसे द्वितीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

पश्चिम महाराष्ट्र श्री भैरवनाथ श्री शरीरसौष्ठव स्पर्धेत येथील शहानवाज नदाफ याने ७५ किलो वजनी गटात प्रथम क्रम ांक पटकाविला. त्याने या स्पर्धे तील मोस्ट इम्प्रूव्हडचे पारितोषिके मिळविले. तसेच ७५ किलो गटात लक्ष सुरवसे याने द्वितीय स्थान मिळविले. शहानवाजला अन्वर शेख यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे जिल्हा शरीरसौष्ठव संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे व सचिव प्रमोद काटे यांनी अभिनंदन केले.

# सोलापुरात २८ व २९ मार्चला महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा

**४२ जिल्ह्यातील ४०० हून अधिक मल्लांचा सहभाग**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

चौथ्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन येथील ह. दे. प्रशालेच्या मैदानावर २८ आणि २९ मार्च रोजी करण्यात आले आहे. या स्पर्धेत ४२ जिल्ह्यांतील ४००हून महिला सहभागी होणार आहेत. या स्पर्धेची माहिती येथील निर्झरा केअर फाउंडेशनच्या संचालिका आणि संस्थापक स्वाती अळ्ळीमोरे-साखरे, केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस आणि संघाचे सरचिटणीस योगेश दोडके यांनी पुणे येथे पत्रकार परिषदेत दिली.

स्पर्धेसाठी ५०, ५३, ५५, ५७, ५९, ६२, ६५, ६८ व ७२ किलो तसेच महाराष्ट्र केसरी गट (६५ ते ७६ किलो) असे वजनी गट ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक गटातील पहिल्या तीन विजेत्यांना अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व कांस्यपदके दिली जाणार आहेत. महाराष्ट्र केसरी किताब जिंकणाऱ्या महिला कुस्तीपटूला गदा देऊन गौरविण्यात येईल.



**निर्झरा केअर फाऊंडेशनकडे स्पर्धेचे संयोजनपद**

येथील निर्झरा केअर फाऊंडेशन या संस्थेकडे स्पर्धेचे संयोजनपद देण्यात आले आहे. स्वाती अळ्ळीमोरे-साखरे यांचे वडील सिद्धाराम साखरे हे स्वतः ज्येष्ठ कुस्तीपटू, पोलीस अधिकारी व समाजसेवक होते. त्यांचा वारसा पुढे नेण्यासाठी त्यांच्या स्मरणार्थ अळ्ळीमोरे-साखरे यांनी २०२३ मध्ये निर्झरा केअर फाऊंडेशनची स्थापना केली. अळ्ळीमोरे-साखरे म्हणाल्या की, ''सोलापूर जिल्ह्यामध्ये कुस्तीसाठी चांगले नैपुण्य आहे. मात्र अव्वल दर्जाच्या सुविधा, आखाडे व स्पर्धांचे व्यासपीठ याअभावी या खेळाडूंना अपेक्षेइतके आंतरराष्ट्रीय दर्जाचे करिअर करता येत नाही, हे लक्षात घेऊनच आम्ही निर्झरा फाउंडेशनतर्फे कुस्तीगिरांच्या विकासासाठी कार्यक्रम आखला आहे.

**भाग्यश्री फंड प्रमुख दावेदार**

महिला महाराष्ट्र केसरी किताबासाठी भाग्यश्री फंड ही प्रमुख दावेदार मानली जात आहे. तीन वेळा विजेतेपद मिळवणाऱ्या भाग्यश्री फंड हिच्यापुढे अमृता पुजारी, प्रगती गायकवाड, अंकिता फटाले आणि वेदांतिका पवार यांचे आव्हान असणार आहे. भाग्यश्रीने स्पेनमध्ये आयोजित २० वर्षांखालील गटाच्या जागतिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले होते.

तसेच थायलंडमध्ये झालेल्या आशियाई स्पर्धेत तिने सुवर्णपदक जिंकले होते. गतवेळच्या महाराष्ट्र केसरी जेतेपदाच्या लढतीत भाग्यश्रीने अमृताला पराभूत करत विजेतेपद पटकावले होते.

# माढ्यातील इनडोअर स्टेडियमचे आ.पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**
**माढा, दि. ४ मार्च-**

माढा शहरात क्रीडा संकुलाचे कामाचे भूमीपूजन आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्षा ॲड मीनल साठे, यावेळी नगराध्यक्षा मीनल साठे, तहसीलदार संजय भोसले, तालुका क्रीडा अधिकारी नदीम शेख, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, आनंदराव कानडे, राजाभाऊ चवरे, बालाजी पाटील, नितीन कापसे, डॉ.संतोष दळवी, निलेश पाटील, सुरेश पाटील, दिनेश जगदाळे, आकाश पाटील, आबा साठे, ऋषीकेश तांबिले, संजय तांबिले, भैय्या खरात, जितू जमदाडे, अक्षय शिंदे, स्वाभिमान कदम, अभिजीत उबाळे आदी मान्यवर उपस्थित होते. या क्रीडा संकुलाचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित होता. याचा आराखडा तयार होऊन भूमिपूजन झाले असल्याने आता हे काम पूर्णत्वास जाईल. माढ्यासह परिसरातील खेळाडूंना या क्रीडा संकुलाचा चांगलाच फायदा होणार आहे.



**खेळाडूंची रत्नाची खाण देशपातळीवर गौरव करेल**

आमदार पाटील म्हणाले, संकुलासाठी तीन कोटीचा निधी मंजूर झाला आहे. यापुढेही लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी मी प्रयत्न करेन. या क्रीडा संकुलनामुळे तालुक्यातील उदयोन्मुख खेळाडूंना हक्काचं व्यासपीठ मिळेल. क्रीडा संकुलात इनडोअर हॉल, रनिंग ट्रॅक, क्रीडांगण, स्वच्छतागृह व अभ्यासिका, पुरूष व महिलांसाठी स्वतंत्र जिम, प्रशस्त हॉल, चेंजिंग रूम यासह अद्यावत सोयी उपलब्ध आहेत. येणाऱ्या काळात तालुक्यातील अनेक खेळाडूंची रत्नाची खाण देशपातळीवर गौरव करेल.

## महत्वाचे...



### कल्पकतेशिवाय प्रगती नाही, प्रगतीशिवाय आनंद नाही : सिद्धेश्वर म्हेत्रे

**दक्षिण सोलापूर, दि. ४ मार्च-**

कल्पकतेशिवाय प्रगती नाही आणि प्रगतीशिवाय आनंद नाही. विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करून स्वतःला सक्षम बनवावे. गावाचा विकास करायचा असेल तर लघुउद्योग निर्माण करणे आवश्यक आहे. या शाळेत शिकणारा प्रत्येक विद्यार्थी यशस्वी होऊ शकतो. ही शाळा निवडल्यामुळे या विद्यार्थ्यांचे पालक म्हणून तुम्ही खरोखर भाग्यवान असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपती पारितोषिकप्राप्त विज्ञान शिक्षक सिध्देश्वर म्हेत्रे यांनी केले. कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेज येथे राष्ट्रीय विज्ञान दिन निमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्य अतिथी म्हणून सिद्धेश्वर म्हेत्रे बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. अनिकेत चनशेट्टी होते. विद्यार्थ्यांनी विज्ञानाच्या विविध संकल्पनांवर आधारित ४० हून अधिक प्रकल्प सादर केले. कार्यक्रमात विज्ञान प्रदर्शनाबरोबरच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. तसेच इयत्ता पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करून त्यांच्या कौशल्यविकासाचा सन्मान करण्यात आला. या उपक्रमाच्या आयोजनासाठी अमृता कोरिशेट्टी, सोनाली मुदकन्ना यांनी योगदान दिले. सूत्रसंचालन श्रद्धा अचलारे व भाग्यश्री शिंदे यांनी केले तर आभार प्रिया खांडेकर यांनी मानले.




### पिलीवच्या दोघांना लक्षाधीश पुरस्कार प्रदान

**पिलीव, दि. ४ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कैलास जामदार व रुषीकेश जामदार दोन्ही रेशीम उद्योग शेतकऱ्यांना लक्षाधीश पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. २०२५-२०२६ या वर्षांत रेशीम व्यवसायात उल्लेखनीय कामगिरी करीत भरघोस उत्पन्न घेतल्याबद्दल हा सत्कार करण्यात आला. त्यांना जिल्ह्य रेशीम उद्योग कार्यालयाच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती निजामुददीन जमादार, न्या. फिरदोश पुनीवाला यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

### स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी स्वयंशिस्त आवश्यक : आयुक्त डॉ. ओंबासे

**पंढरपूर, दि. ४ मार्च -**

अभ्यासातील कॉन्सेप्टस पूर्णपणे समजून घेऊन त्यांचे कोणत्याही भाषेत प्रभावी सादरीकरण करता आले पाहिजे. यासाठी सर्वप्रथम प्रत्येक गोष्ट मनापासून समजून घ्या. इंटरनेटचा योग्य वापर करा असे आवाहन सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी केले. स्वेरीमध्ये 'डीकोडिंग द ड्रीम्सः पाथ वे टू पब्लिक सर्विस अपॉर्च्युनीटीज' या विषयावर आयोजिलेल्या प्रेरणादायी मार्गदर्शन सत्रात डॉ. ओंबासे मार्गदर्शन करत होते. स्वेरीच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा.अविनाश मोटे आयुक्त डॉ. ओंबासे यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळेल. असे सांगून प्रास्ताविक केले. यावेळी ज्ञानदीप अॅकॅडमीचे अॅड. महेश शिंदे यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी श्रीकांत जाधव, विनोद आसबे, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतीश मांडवे, अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, वैष्णवी नवले उपस्थित होते. ज्ञानेश्वर मिटकरी, सोनाली कांबळे आणि डॉ.नीता तळवलकर यांनी सूत्रसंचालन केले. स्टुडंट कौन्सिलच्या सचिवा नेहा झिरपे यांनी आभार मानले.

## निधन वृत्त...

### कमल पाठक



**रेणापूर, दि. ४ मार्च-**

पानगांव (ता. रेणापूर ) येथील कमल अंबादास पाठक (७८)यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचा मुलगा दै. सोलापूर तरुण भारतचे प्रतिनिधी उदय तथा शाम पाठक, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### भारत आंद



**पंढरपूर, दि. ४ मार्च-**

तालुक्यातील तुं येथील भारत आण्णा आंद (वय ७०) यांचे सोमवार (दि.२) निधन झाले. पाटबंधारे विभागात त्यांनी सेवा केली होती. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, एक भाऊ, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

### अमित शिंदे



**सोलापूर, दि. ४ मार्च-**

औंढी (ता. मोहोळ) येथील अमित हणमंत शिंदे (वय ४४) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी, मुले असा परिवार आहे. त्यांचा सावडन्याचा विधी गुरुवारी स. ७ वा. औंढी येथे त्यांचे शेतात आहे.

### सखाराम मोहिते



**सोलापूर, दि. ४ मार्च-**

सखाराम राजाराम मोहिते रा. पापाराम नगर, विजापूर रोड, सोलापूर, यांचे ४ मार्च रोजी सकाळी ९ वाजता राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे, मृत्यूसमयी त्यांचे वय ७५ वर्ष होते. मनोरमा बँकेच्या शिल्पा कुलकर्णी-मोहिते यांचे ते चूलते आणि कर्मचारी अमोल मोहिते यांचे ते वडील होत.

# बाळासाहेब इंगळे स्मृती उद्यानाचे १८ मार्च रोजी होणार लोकार्पण

**आ. कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टींनी केली पाहणी**



**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ४ मार्च-**

अक्कलकोट मैंदर्गी रस्त्यावरील हद्दवाड समर्थ पार्क येथे १८ मार्च रोजी लोकार्पण होणाऱ्या कै बाळासाहेब इंगळे स्मृती उद्यान लोकार्पण व कै बाळासाहेब इंगळे अर्ध पुतळा अनावरण प्रगती पथावरील कामाची नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी व आ सचिन कल्याणशेट्टी यांनी पाहणी केली.

दरम्यान हद्दवाड भागाचा समावेश असलेल्या प्रभाग क्र ११ चे नगरसेवक महेश इंगळे यांनी यावेळी हद्दवाढ भाग बासलेगाव रस्ता मैंदर्गी रस्ता नागनाळी रस्ता भागातील रहिवाश्याच्या रस्ते, ड्रेनेज, पथदिवे, पाणी आदि मुलभुत समस्याकडे नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे लक्ष वेधले. नपा च्या हद्दवाढ भागातील नागरी समस्या मार्गी लावण्या बाबत शासन स्तरावर निर्णय होताच प्राधान्याने हद्दवाढ भागात मुलभुत समस्या तात्काळ मर्गी लावून विकास कामे करू असे आश्वासन आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी यावेळी दिले. नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी कै. बाळासाहेब इंगळे अर्ध पुतळा अनावरण व स्मृती उद्यान प्रगती पथावरील कामाची पाहणी केली.

यावेळी आमदार कल्याणशेट्टी बोलत होते. नगरसेवक तथा वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, नगरसेवक अविनाश मडिखांबे, प्रथमेश इंगळे, सिध्देश्वर मठपती, संतोष पराणे, प्रा. शिवशरण अचलेर, मेजर संदिप सलगरे, मनोज जाधव, सुधाकर काशेट्टी सागर बबनराव इंगळे, बाळासाहेब एकबोटे आदि मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी बाकासाहेब इंगळे स्मारक स्मृती उद्यानाची पाहणी केली. हरित अक्कलकोट करण्यास व मुलभुत सोयी सुविधा देण्यास कटिबध्द आहे. उद्यानात वृक्षारोपण करण्यास स्वतः पुढाकार घेणार असल्याचे नगराध्यक्ष कल्याणशेट्टी यांनी सांगितले. यावेळी समर्थ पार्क वतीने आमदार सचिन कल्याणशेट्टी व नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी श्रीशैल गंवडी, अंकुश केत, ऋतुराज हिराकांत जामदार, विश्वजिल मनोज जाधव, बाळासाहेब एकबोटे, श्रीशैल गंवडी, ज्ञानेश्वर भोसले चंद्रकांत सोनटक्के 'विश्वनाथ सुतार, गोपाळ गंवंडी महेश बंदिछोडे वाय.पी. बिराजदार सागर इंगळे, बालाजी हादेवे, चन्ना स्वामी, गजाभाऊ घाटगे, विश्वजित जाधव, प्रणव, जाधव, ऋतुराजे आदी उपस्थित होते.

# जेसीबी चालकाचा निष्काळजीपणा; ट्रॅक्टर चालकाचा जागीच मृत्यू

**मालवंडी शिवारातील घटना; २५ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ४ मार्च-**




तालुक्यातील मालवंडी येथील शिवारात शेतात माती भरण्याचे काम सुरु असताना घडलेल्या दुर्दैवी अपघातात एका २५ वर्षीय ट्रॅक्टर चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे. या प्रकरणी जेसीबी चालकाविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात मंगळवार दि. ३ मार्च २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मालवंडी येथील अंकुश जनार्धन थोरात यांच्या शेतातील (गट क्र. २६०/१) नाल्यातील माती काढून शेतात टाकण्याचे काम गेल्या दोन दिवसांपासून सुरु होते. दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ८ वाजता सुरज रेवणनाथ खंडागळे (वय २५, रा. मालवंडी) हा दत्तात्रय रावसाहेब पाटील यांचा ट्रॅक्टर (क्र. चक १३ इठ ४४२४) घेऊन नेहमीप्रमाणे माती वाहतुकीसाठी शेतात गेला होता. दुपारी सुरजने माती भरण्यासाठी आपला ट्रॅक्टर जेसीबी (क्र. चक१३ ऊव् ६०३२) जवळ उभा केला. वाऱ्यामुळे उडणारी माती अंगावर येऊ नये म्हणून तो ट्रॅक्टरमधून खाली उतरुन ट्रॉलीच्या पाठीमागे उभा होता. त्यावेळी जेसीबी चालक उमेश संभाजी राजगुरु माती भरत असताना, निष्काळजीपणे जेसीबीचे बकेट ट्रॉलीवर जोरात आदळले. या धक्क्यामुळे ट्रॅक्टर अचानक पाठीमागे सरकला.

ट्रॉलीच्या पाठीमागे उभा असलेल्या सुरजला जोरदार धक्का बसून तो खाली पडला. त्यानंतर ट्रॉलीचे मागील चाक त्याच्या डोक्यावरुन गेल्याने त्याला गंभीर दुखापत झाली आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर नातेवाईकांनी सुरजला तातडीने बार्शी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

या प्रकरणी मयताचे मेव्हणे विकास सर्जेराव पाडुळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेसीबी चालक उमेश संभाजी राजगुरु याच्याविरुद्ध निष्काळजीपणाने मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# डॉ.धवलसिंह यांच्या वाढदिवसानिमित्त ११७ जणांचे रक्तदान




**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि.४ मार्च-**

लोकप्रिय नेतृत्व डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला तरुणाईचा आणि कार्यकर्त्यांचा मोठा प्रतिसाद लाभला.शिबिराचे उदघाटन जनसेवा संघटनेचे नेते माणिकराव मिसाळ,अण्णासाहेब शिंदे, राजाभाऊ गुळवे, रणजितसिंह देशमुख, सुधीर रास्ते यांचे हस्ते करण्यात आले.

या शिबिरात ११७ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली. वाढदिवसाचा कोणताही अनावश्यक खर्च टाळून, समाजासाठी उपयुक्त उपक्रम राबवण्यात आला होता. यावेळी सर्व रक्तदात्यांना आयोजक तांच्या वतीने सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. अकलुज व परिसरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या रक्तदान शिबिराला भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले आणि डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यशस्वी करण्यासाठी जनसेवा संघटनेचे राजु गुळवे, सुधीर रास्ते, प्रताप कोकीळ, सतिश साठे, बबनराव शेंडगे, रणजितसिंह देशमुख, प्रताप झंजे, चंद्रकांत गायकवाड, गणेशकाका महाडीक, ज्योतीताई कुंभार, नवनाथ भाऊ साठे,संजय गाडे, अनिल सोनार, रघुनाथ साठे, हिरा खंडागळे, शिवाजी जाधव, राजेश पवार, अभिजीत माने, मुबारक कोरबु, अजित पवार, निखिल फुले, बशीर शेख, अण्णा सुरवसे, कन्हैया चव्हाण, अनिल ओरसे, पिंटु वैद्य, इस्लाम पटेल, सोमनाथ कोरे, बाबु चव्हाण, पिंटु कदम, फिरोज देशमुख, राहुल जाधव, रोहिदास हनवते, अरुण शहाणे, शेखर शेंडे, आप्पा जाधव यांनी विशेष परीश्रम घेतले.

# मंद्रूप तहसीलतर्फे ७ मार्चपासून मंडलनिहाय समाधान शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ४ मार्च..**

महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर ग्रामिण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी मंद्रूप अप्पर तहसीलमधील प्रत्येक मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान आयोजित करण्यात आल्याची माहीती मंद्रूपचे तहसीलदार विष्णु बुटे यांनी दिली.

| | |
|---|---|
| माळकवठे | ७ मार्च |
| मंद्रूप | १४ मार्च |
| औराद | १० एप्रिल |
| विंचूर | १७ एप्रिल |
| निंबर्गी | ८ मे |
| टाकळी | १५ मे |

या शिबिरात फेरफार, ७/१२ मधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ आणि ८-अ उतार्याचे वाटप, उत्पत्र, रहिवासी आणि जातीचे प्रमाणपत्र, नॉन- कीमिलेअर प्रमाणपत्र, अकृषिक (छ) परवानगी, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजूर करणे, विद्यार्थ्यांसाठी दाखले वाटप यासह १५ विविध प्रकारच्या समस्यांचे करून निराकरण प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

# हॉटेल रानवारा येथे अवैध दारू जप्त


**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ मार्च -**

येथील हॉटेल रानवारा येथे पंढरपूर तालुका पुलिसांनी रंगपंचमी सणाच्या पार्श्वभूमीवर कारवाई करीत सुमारे ८ हजार रुपयाचा अवैध दारू जप्त केल्याची माहिती तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय.मुजावर यांनी दिली.

या कारवाई संदर्भात माहिती देताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुजावर यांनी सांगितले की, तालुका पोलीस ठाणे हद्दीतील आगामी रंगपंचमी या उत्सवाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे तावशी- तनाळी रोडवरील येथील रानवारा हॉटेल तसेच गुरसाळे, देगाव आणि कासेगाव या गावात पंढरपूर तालुका पोलिसांनी रेड करून एकूण ८ हजार २१० (आठ हजार दोनशे दहा) रुपयांची अवैध दारू जप्त केलेली असून त्याबाबत पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे मुंबई दारूबंदी कायदा कलम ६५ प्रमाणे आरोपीवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

कारवाई येथील उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय. मुजावर, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, पोलीस हवालदार साळुंखे, गावडे, बाजीराव काकडे, संजय गुटाळ, सतीश चंदनशिवे, तात्यासाहेब गायकवाड, परशुराम शिंदे यांच्या पथकाने केली.

# इराण-इस्त्राईल-अमेरिका युद्धाचा जिल्ह्यातील केळी उत्पादकांना फटका



**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि. ४ मार्च-**

इराण-इस्त्राईल-अमेरिका युद्धाचा फटका सोलापूर जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना बसत असून आखाती केळी निर्यात करणार्या सर्व व्यापार्यांनी निर्यातीसाठी केळी खरेदी करणे बंद केल्यामुळे केळी उत्पादक शेतकरी अडचणीत आला आहे.

सोलापूर जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर केळी आखाती देशात निर्यात केली जाते सध्या इराण इस्त्रायल अमेरिकेचे युद्ध सुरू झाल्यामुळे आखाती देशांकडे निर्यात होणारा शेतमाल घेऊन जाणारी जहाजांमधून होणारी वहातूक ठप्प झाली आहे.याचा परीणाम शेतकऱ्यांकडून होणाऱ्या केळी खरेदीवर झाला आहे. जिल्हयात उत्पादित सर्व केळी स्थानिक बाजारपेठेत विकणं शक्य होणार नसल्याने याचा परिणाम केळीच्या दरावर होऊन शेतकऱ्यांना याचा फटका बसू लागला आहे.सध्या काढणीला आलेली केळी कुठे पाठवायची हा प्रश्न केळी उत्पादक शेतकऱ्यांना पडला आहे.

> युद्धाचे कारण दाखवत सर्व केळी व्यापाऱ्यांनी निर्यातक्षम केळी खरेदी करणे बंद केल्याने केळी उत्पादक शेतकरी अडचणीत आला आहे. परिपक्व झालेली केळी सात आठ दिवसाच्या आत नाही काढली तर ती केळी जागेवरच पिकायला सुरुवात होते आणि अशी केळी कोणीही विकत घेत नाही त्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होणार आहे. शासन व व्यापाऱ्याने यातून काहीतरी मार्ग काढणे गरजेचे आहे.ज्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळेल.
>
> **- वैभव पोळ, केळी उत्पादक व अध्यक्ष लोकविकास शेतकरी**
>
> सध्या इराण अमेरिका युद्धामुळे आखाती देशाकडे केळी पाठवणे पूर्णपणे बंद झाले असले तरी ही स्थिती कायम राहणार नाही लवकरच या परिस्थितीमध्ये मध्ये नक्कीच सुधारणा होऊन पुन्हा केळी खरेदी सुरू होईल. शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये कोरोनासारख्या परिस्थितीवर मार्ग काढलेला आहे .याम धुनही नक्कीच मार्ग निघेल.
>
> **- किरण डोके, केळी निर्यातदार कंदर**

# भोयरेत दगडफेकीची धुळवड; ३०० वर्षांची परंपरा

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि. ४ मार्च-**

प्रत्येक परंपरेमागे अनेकदा ऐतिहासिक घटना, लोककथा किंवा आख्यायिका जोडलेल्या असतात. त्यामुळे त्या केवळ कृती राहत नाहीत, तर त्या लोकांच्या भावविश्वाचा भाग बनतात. गावागावांत होळी, धुळवड किंवा यात्रांमध्ये अनोख्या पद्धतीने सण साजरे केले जातात. श्रद्धेमुळे लोक त्यात सहभागी होतात आणि त्यातून सामूहिक बंध दृढ होतात. अशीच एक अनोखी प्रथा भोयरे येथे दगडफेकीतून साजऱ्या होणाऱ्या धुळवडीच्या रूपाने पाहायला मिळते.

मोहोळ तालुक्यातील सीना-भोगावती नदीच्या काठावर वसलेल्या भोयरे गावात ग्रामदैवत श्री जगदंबा देवी मंदिर येथे सुमारे ३०० वर्षांपासून दगडफेकीची परंपरा जोपासली जात आहे. संगणकाच्या आधुनिक युगातही ही परंपरा तितक्याच उत्साहात आणि श्रद्धेने साजरी केली जाते. मोहोळ-वैराग मार्गापासून आत सीना-भोगावती नदीच्या तीरावर हे गाव वसलेले आहे. उंच टेकडीवर दगडात बांधलेले जगदंबा देवीचे मंदिर शेकडो वर्षांपूर्वी उभारले गेले आहे. तुळजाभवानी मंदिर (तुळजापूर), बिटले (ता. मोहोळ) येथील देवी आणि भोयरे येथील जगदंबा देवी या सख्ख्या तीन बहिणी



असल्याची स्थानिक आख्यायिका प्रचलित आहे. देवीची यात्रा पौष महिन्यात भरते; मात्र धुळवडीच्या दिवशी येथे विशेष उत्सव रंगतो. धुळवडीच्या दिवशी गावातील सर्व जाती-धर्मांतील नागरिक,



कोणताही मतभेद न ठेवता एकत्र येतात. सर्वप्रथम देवीचे दर्शन घेतले जाते. आई राजा उदे उदे... च्या गजरात मिरवणूक गावाच्या वेशीजवळील हनुमान मंदिरापर्यंत जाते. त्यानंतर भोगावती नदीच्या पात्रात पारंपरिक हालग्या-झांजांच्या गजरात कुस्त्यांचा फड रंगतो. कुस्त्या संपल्यानंतर देवीचा छबिना गावाच्या वेशीजवळ आल्यानंतर दगडफेकीला प्रारंभ होतो. उपस्थित भाविक दोन गटांत विभागले जातात आणि एकमेकांवर दगडफेक करतात. काही वेळाने सर्वजण मंदिर परिसरात जमतात. काही भाविक मंदिराच्या उंच भागावर, तर काही मुख्य चौकात खाली उभे राहतात. देवीचे पुजारी छबिना घेऊन मंदिरात प्रवेश करताच सुमारे अर्धा ते पाऊण तास दगडफेक सुरू राहते. जयघोष आणि उत्साहात हा थरार अनुभवला जातो. या दरम्यान काही भाविक जखमी होतात. हात, पाय किंवा डोक्याला मार लागल्याच्या घटना घडतात. दगडफेक थांबल्यानंतर सर्वजण पुन्हा मंदिरात जमतात. जखमी भाविकांना देवीचा अंगारा लावला जातो. सात-आठ दिवस मंदिरात दर्शन घेऊन अंगारा लावल्यास जखम बरी होते, अशी श्रद्धा आहे. हा अनोखा धुळवड उत्सव पाहण्यासाठी तालुक्यासह जिल्हाभरातून हजारो भाविक उपस्थित राहतात. उत्सव सुरळीत पार पाडण्यासाठी ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर नियोजन आणि परिश्रम घेतात. वेगवेगळ्या परंपरा आणि श्रद्धा या समाजाच्या सांस्कृतिक वारशाचा अमूल्य ठेवा आहेत. त्या आपल्याला आपल्या मुळांची जाणीव करून देतात आणि एकात्मतेचा संदेश देतात.

# जि.प. अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीसाठी १८ मार्चला बैठक

**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद प्रमुख अधिकारी**

**अध्यक्ष, पंचायत समित्यांच्या सभापती, उपसभापती निवडीसाठी अध्यासी अधिकाऱ्यांची नियुक्ती**

**१२ आणि १८ मार्चला जिल्ह्याच्या राजकीय घडामोडींसाठी महत्त्वाच्या**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मार्च-**

जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी बुधवार, दि. १८ मार्च रोजी दुपारी २ वाजता यशवंतराव चव्हाण सभागृह जिल्हा परिषद येथे पहिली बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली आहे.

या निवडीवेळी प्रमुख अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी स्वतः जबाबदारी सांभाळणार आहेत. १२ आणि १८ मार्च या दोन तारखा जिल्ह्याच्या राजकीय घडामोडींसाठी महत्त्वाच्या ठरणार असून पंचायत समित्यांपासून जिल्हा परिषदेपर्यंत सत्तेची सम ीकरणे कशी जुळतात, याकडे जिल्हावासियांचे लक्ष लागले आहे. आगामी काळात विकासकामांना गती देण्यासाठी सक्षम नेतृत्वाची निवड होणार का, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्ष पदांपैकी अनुसूचित जाती, अनुसूचित जामाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) आणि महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती यातील महिलासह) यांच्यासाठी आरक्षित झालेल्या अध्यक्ष पदाचे वाटप ग्रामविकास विभागाच्या शासन राजपत्र अधिसूचना ९ सप्टेंबर २०२५ अन्वये सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद हे नागरिकांचा म ागास प्रवर्ग या करीता आहे. बुधवार १८ मार्च २०२६ पासून सुरु होणाऱ्या अडीच वर्षाच्या कालावधीकरीता जिल्हा परिषद सदस्यांमधून सोलापूर जिल्ह्यासाठी जिल्हा परिषद अध्यक्ष पद व उपाध्यक्ष पदाचे निवडणुकीसाठी बैठक घेण्यात येणार असल्याचेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले

ग्रामविकास विभागाने २५ फेब्रुवारी रोजी दिलेल्या सूचनांनुसार तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील नियम ६७ व ६८ नुसार ही निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी पंचायत समित्यांच्या सभापती-उपसभापती निवडीसाठी अध्यासी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. करम ाळा पंचायत समितीसाठी जिल्हा पुनर्वसन अधिकारी सुशांत बनसोडे, माढ्यासाठी प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, बार्शीसाठी उपजिल्हाधिकारी अमोलसिंह भोसले, उत्तर सोलापूरसाठी प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे, मोहोळसाठी उपजिल्हाधिकारी सीमा होळकर, पंढरपूरसाठी प्रांताधिकारी सचिन इथापे, माळशिरससाठी विजया पांगारकर, सांगोल्यासाठी प्रांताधिकारी भैरप्पा माळी, मंगळवेढ्यासाठी उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख, दक्षिण सोलापूरसाठी उपजिल्हाधिकारी अंजली मरोड आणि अक्कलकोटसाठी प्रांताधिकारी सुमीत शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### ११ पैकी ७ समित्यांमध्ये भाजपाचे वर्चस्व

जिल्ह्यातील ११ पंचायत समित्यांपैकी सात समित्यांमध्ये भाजपचे वर्चस्व आहे. अक्कलकोट, बार्शी, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, माढा, मोहोळ आणि मंगळवेढा येथे भाजपचे बहुमत आहे. माळशिरस पंचायत समिती राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) यांच्या ताब्यात आहे. करमाळा येथे भाजप-राष्ट्रवादी युतीचे समीकरण आहे, तर सांगोला तालुका विकास आघाडीचा प्रभाव सांगोल्यात आहे. पंढरपूर पंचायत समितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि भाजप यांचे प्रत्येकी आठ सदस्य असल्याने तेथे चुरशीची लढत अपेक्षित आहे.

### अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीवेळी गटबाजी निर्णायक

जिल्हा परिषदेत एकूण ६८ जागा असून त्यापैकी ३८ सदस्य भाजपचे आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ११, शिवसेनेचे ८, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) चे ५ सदस्य आहेत. करमाळा तालुका विकास आघाडीचे २, सांगोला तालुका विकास आघाडीचे ३ आणि तीर्थक्षेत्र विकास आघाडीचा १ सदस्य आहे. या आकडेवारीनुसार भाजपचे स्पष्ट बहुमत दिसत असले तरी अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीवेळी राजकीय रणनीती आणि गटबाजी निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

### हात वर करून मतदान

सभापती व उपसभापती निवडीची प्रक्रिया ठरावीक नियमांनुसार पार पडते. सुरुवातीला इच्छुक उमेदवारांकडून अर्ज स्वीकारले जातात. अर्ज मागे घेण्यासाठी ठरावीक वेळ दिला जातो. जर एकच अर्ज शिल्लक राहिला तर त्या उमेदवाराची बिनविरोध निवड घोषित केली जाते. मात्र एकापेक्षा अधिक अर्ज असल्यास सदस्यांमध्ये मतदान होते. सदस्यांनी हात वर करून मतदान करायचे असते आणि बहुमताने सभापतीची निवड होते. त्यानंतर उपसभापतीसाठीही हीच प्रक्रिया राबवली जाते. जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीसाठीही याच पद्धतीचा अवलंब केला जातो.

## महत्वाचे...



### टाकाऊतून-टिकाऊ या डॉ. गौरी बाचल यांच्या कलात्मक बागेचा 'परसबाग'कडून सन्मान

**सोलापूर, दि. ४ मार्च-**

वाढत्या प्लास्टिकचा वापर आणि त्या वस्तू वापरून झाल्यानंतर त्या टाकाऊ स्वरूपात पर्यावरणामध्ये अडचण ठरत असतात,पण अशाच प्लास्टिकचा वापर करून तुम्ही तुमच्या बागेला कलात्मक रूप हे देऊ शकता. हे या समर्थ वाटीकेचे वैशिष्ट्य. आपल्या घरामध्ये असे अनेक प्लास्टिकचे डबे, ब्रश, बाटल्या, डिश, लहान मुलांची खेळणी, रंगच्या बादल्या असे विविध प्लास्टिकचे घटक असतात आणि ते तुम्ही तुमच्या बागेमध्ये निश्चितच वापरून तुमच्या बागेचा कायापालट करून शकता असाच पर्यावरण संवर्धन संदेश या बागेतून देण्यात आला. या बागेची दखल ही परसबाग सोलापूरच्या संस्थेने घेऊन त्यांना सन्मानित करण्यात आले सन्मानपत्र, एक रोप आणि शाल असे सन्मानाचे स्वरूप होते. सोलापूरच्या बाहेरच्या जवळपास ५० बाग प्रेमींनी या बाग भेटीस उस्फूर्त प्रतिसाद नोंदवला. अशा कलात्मक बाग या सोलापूर मध्ये अत्यल्प पहावयास मिळतात, अशी समर्थ वाटिका ही सर्वांनी पहावी अशीच आहे असे मत संस्थेच्या संस्थापक नारायण पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.




### 'एकल' महिलांनी स्वत:साठी जगावे; शोभा बोल्ली यांचे प्रतिपादन

**सोलापूर, दि. ४ मार्च-**

लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशन तर्फे एकल महिलांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शोभा बोल्ली यांनी एकल पालक महिलांनी स्वत:साठी जगावे व स्वतःवर प्रेम करावे, असे प्रतिपादन करून महिलांना प्रेरित केले. लोकमंगल समूहाचे संस्थापक अध्यक्ष आमदार सुभाष देशमुख व लोकमंगल डेव्हलपमेंट फौंडेशनचे अध्यक्ष अलका देवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमंगल फाउंडेशन, होटगी रोड येथे महिला बचत गटांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी शोभा बोल्ली या बोलत होत्या. कार्यक्रमांमध्ये महिलांसाठी संवाद कौशल्य, व्यक्तिमत्व विकास, सामाजिक शिष्टाचार यावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. तसेच स्त्रीने स्वतःसाठी सुद्धा थोडा वेळ जगले पाहिजे; प्रत्येक गोष्टींचा आनंद घेतला पाहिजे आणि कोणत्याही गोष्टीला खचून न जाता हिमतीने तिने उभे राहिले पाहिजे, विविध उद्योगांवरती जसे की, लघुउद्योग फॅशन डिझाईन, ब्युटी पार्लर, चॉकलेट मेकिंग, राखी मेकिंग, कुरड्या पापड, बेकरी प्रॉडक्ट आदी विषयांवरती महिलांना त्यांनी संबोधित केले. लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनचे समन्वयक श्यामकुमार भंडारे यांनी प्रास्ताविक तर दिपाली नंदुरकर यांनी आभार मानले.

### लग्नात हुंडा दिला नाही म्हणत छळ

**सोलापूर, दि. ४ मार्च-**

तू दिसायला सुंदर नाही, लग्नात हुंडा दिला नाही असे म्हणत म ानसिक व शारीरिक त्रास दिल्याप्रकरणी पती, सासू, सासरा, दीर, जाऊ यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. दि. २६ फेब्रुवारी २०२२ ते ४ फेब्रुवारी २०२६ च्या दरम्यान अनुजा सुरेश कटारे, राहणार २१५, समाधान कॉलनी ४, फुरसुंगी पुणे यांना पती सुरेश, जयश्री सासू, इरण्णा सासरे, रमेश दिर, ज्योती जाऊ सर्व राहणार पुणे यांनी मिळून वेळोवेळी शारीरिक व मानसिक त्रास दिला. सुरेश याने हाताने मारहाण करून कर्ज फेडण्यासाठी माहेरून ५ लाख रुपये घेऊन ये. लग्नात हुंडा दिला नाही असे म्हणत मानसिक व शारीरिक त्रास दिल्याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दि. ३ मार्च रोजी पाच जणांना विरोधात गुन्हा दाखल झाला असून तपास कटके करत आहेत.

### अवैध दारूधंद्यावर कारवाई;११ जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि.४ मार्च-**

मौजे मुळेगांव तांडा, गुळवंची तांडा, कामती, जवळा ता. सांगोला आदी ठिकाणी दारुबंदी कायद्याखाली एकूण ७ केसेस करुन एकूण ७ हजार ८०० लि. गुळमिश्रीत रसायन, ५८ लिटर हा.भ. दारु, २५ लिटर शिंदी, १४१ देशी दारुच्या बाटल्या असा एकूण ३ लाख ८७ हजार २० रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन ११ आरोपींविरुध्द दारुबंदी कायदयाखाली गुन्हे दाखल करण्यात आले. सपोनि भाऊसाहेब गोसावी, पोलीस उपनिरीक्षक कुलदीप सोनटक्के, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक मुजावर यांचे पथक मौजे मुळेगांव तांडा ता. दक्षिण सोलापूर व मौजे गुळवंची ता. उत्तर सोलापूर येथील हातभट्टी दारुनिर्मितीच्या ०२ ठिकाणी छापेमारुन ३९ बॅरेल मधील एकूण ७ हजार ८०० लिटर गुळमिश्रीत रसायन जागीच नष्टकरुन एकूण ३ आरोपींविरुध्द सोलापूर तालुका पोलीस ठाणे येथे २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. तसेच कामती पोलीस ठाणे हद्दीत एकूण २ केसेस करुन ५३ लिटर हातभट्टी दारु, २५ लिटर शिंदी, तसेच मौजे जवळा ता. सांगोला येथे एकूण ३ केसेस करुन एकूण १४१ देशी दारुच्या बाटल्या व ५ लिटर हातभट्टी दारु जप्त करुन कारवाई करण्यात आली आहे. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अतिरीक्त अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई झाली.

# 'चित्राज् सिटी साईड' मुळे रिसॉर्ट पर्यटनाला मिळणार चालना

**धीरज, कुणाल व चित्रलेखा जवळकर यांनी दिली माहिती**










**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मार्च-**

शहरातील हॉटेल चित्रा एक्झिक्युटिव्ह हे आपल्या सेवेत गेल्या पाच वर्षापासून कार्यरत आहे. ग्राहकांच्या समाधानाला आणि सेवेला प्राधान्य देत आम्ही उत्कृष्ट सुविधा आणि सेवा देण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे. यापुढेही सेवा देण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. हॉटेल चित्रा एक्झिक्यूटिव्हच्या यशस्वीतेनंतर खास सोलापूरकरांसाठी एक भेट जे उत्तर सोलापूर येथील कोंडी-अकोलेकाटी रोडवर चित्राज सिटी साईड रिसॉर्टच्या माध्यमातून जवळकर परिवार देत आहेत. तसेच सोलापूर जिल्ह्यात पर्यटन विकासाला चालना देणे, पर्यटकांना दर्जेदार सेवा प्रदान करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन संचालक धीरज, कुणाल व चित्रलेखा जवळकर यांनी सांगितले.

नैसर्गिक सौंदर्य, शांत, सुरक्षित आणि अल्हाददायक वातावरण चा अनुभव सोलापूरकरांना देण्यासाठी चित्राज् सिटी साईड रिसॉर्टची निर्मिती करीत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. हे रिसॉर्ट अत्यंत निसर्गमय वातावरण असून सोलापूर शहरापासून केवळ १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या अकोलेकाटी, कोंडी-अकोलेकाटी रोड येथे उभे आहे. याचे उद्घाटन ७ मार्च रोजी सायंकाळी ७ वा. मातोश्री श्रीमती रंजना रमेश जवळकर यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. सोलापूरच्या वैभवात भर घालणारी ही वास्तू, प्रशस्त आधुनिक रिसॉर्ट असून या मध्ये ८० रूम्स, सात हजार स्केअर फुटचे बँक्वेट हॉल, ४० हजार स्केअर फुट चे सर्वात मोठे लॉन, सोबत १२ हजार स्केअर फुट चे छोटे लॉन, तसेच वॉटर पार्क, एडवेंचर पार्क, व्ही.आर. गेम्स, आर्केड गेम्स, इनडोअर आणि आउटडोअर गेम्स, रेन डान्स असे बरेच काही अत्याधुनिक सुविधा या रिसॉर्ट मध्ये उपलब्ध आहेत. लोकांना दर्जेदार सुविधा आणि सेवा हवी आहे, म्हणून आम्ही सिटीसाईड रिसॉर्ट मध्ये प्री - वेडिंग शूट, एंगेजमेंट, डेस्टिनेशन वेडिंग, कार्पोरेट प्रोग्रॅम्स, फॅमिली ट्रिप्स सह लग्न समारंभासाठी जवळजवळ ३००० लोकांची व्यवस्था असलेले मोठे लॉन उपलब्ध करून दिलेला आहे. अशा या अनोख्या आणि अत्याधुनिक सुविधेने नटलेल्या या रिसॉर्टला एक वेळ अवश्य भेट द्यावे असे आवाहन जवळकर परिवारांने केले आहे.

### विज्ञान गीतावर विद्यार्थ्यांचे नृत्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मार्च-**

विज्ञान दिनानिमित्त नवी शिशु शाळेच्या वतीने कार्यक्रमात छोटा गट बकुळमधील विद्यार्थ्यांनी विज्ञान गीतावर नृत्य सादर केले. या गीताचे नृत्यदिग्दर्शन स्नेहा गजेंद्रगडकर यांनी केले होते. यावेळी विज्ञान प्रदर्शनही भरविण्यात आले होते. त्याचे उद्घाटन मुख्याध्यापिकाद्वय प्राची साठे, अर्चना कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. नर्सरीच्या छोटा व मोठा गटातील विद्यार्थ्यांनी विज्ञानविषयक प्रयोग करुन दाखविले. सारिका कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

# 'त्या' मोर्चांना परवानगी देऊ नका

**पोलीस आयुक्त एम राजकुमार यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी**



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ मार्च -**

जगात सध्या युद्धजन्य परिस्थिती निर्माण झालेली आहे, त्या पार्श्वभूमीवर काही पक्ष व संघटना इराणच्या समर्थनार्थ मोर्चाचे नियोजन करून शहरातील सामाजिक सलोखा व शांतता बाधित करण्याचा प्रयत्न करत असून त्या मोर्चांना परवानगी देऊ नये असे अशी मागणी पोलीस आयुक्त एम राजकुमार यांच्याकडे भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका अलका भवर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

जगामध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे, या युद्धात सहभागी सर्वच राष्ट्राचे नुकसान होत असून, इराण वर झालेल्या हल्ल्याचा संदर्भ देऊन भारतात काही लोक आंदोलने करत आहेत, सोलापुरात देखील अशा मोर्चा करण्याचा काही समाजकंटकांचा मानस असून, त्यांचा शहरातील सामाजिक सलोखा व शांतता बाधित करण्याचा प्रयत्न करत असून, ज्या पद्धतीने इराण राष्ट्राला या युद्धाचा फटका बसला आहे, तसाच फटका इजराइल या राष्ट्राला देखील बसलेला असून, जर आज इराण समर्थनार्थ मोर्चा निघाला तर उद्या इजराइल राष्ट्रावर झालेल्या हल्ल्यात देखील अनेक निष्पाप लोकांचा मृत्यू झालेला आहे व इजराइल राष्ट्राने आतपर्यंत अनेक वेळा भारताला मदत केलेली असून, इजराइल समर्थनार्थ देखील मोर्चे निघतील. यामध्ये सामाजिक सलोखा व शांतता भंग होऊ नये याची काळजी घेण्यासाठी कोणत्याच मोर्चांना परवानगी तर देऊच नये, व कोणी असे म ोर्चे काढून शांतता बाधित करत असतील तर त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी आनंद भवर, धनंजय काकडे, अतुल शेंडगे, प्रभाकर क्षीरसागर, नागेश सुरवसे यांची उपस्थिती होती.

# फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचे महिला पुरस्कार जाहीर

**विविध क्षेत्रातील सात महिलांना उद्या गौरविणार**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय संस्थापक अध्यक्षा कै. आवाबाई वाडिया यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व दैदिप्यमान कार्य करणाऱ्या कर्तृत्वशालिनी महिलांचा 'पद्मश्री कै. आवाबाई वाडिया कर्तृत्वशालिनी महिला पुरस्कार' पुरस्कार निवड समितीचे समन्वयक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी जाहीर केले. यांचे वितरण शुक्रवार ६ मार्च रोजी दुपारी २ वाजता रूपाभवानी देवस्थान येथील श्री. सिद्धेश्वर वुमेन्स इंजिनिअरिंग कॉलेजच्या सभागृहात हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. पुरस्काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे असणार आहे. जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंह रजपूत यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून कार्यक्रम ाचे अध्यक्षस्थान श्री. सिद्धेश्वर पॉलिटेक्निक व वुमेन्स इंजिनिअरिंग कॉलेजचे अध्यक्ष धर्मराज काडादी भूषविणार आहेत.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन एफ.पी.ए.आय. सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, व्हाइस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, फायनान्स ड्व्हायझर सपना चिट्टे, माजी अध्यक्षा डॉ. नभा काकडे, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड तसेच कार्यकारिणी मंडळाने केले आहे.

### यांना जाहीर झाला पुरस्कार

डॉ. मंजुश्री यशवंत कुलकर्णी (वैद्यकीय), जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे (राजकीय, सामाजिक व शैक्षणिक), भाजपा शहराध्यक्षा रोहिणी रामचंद्र तडवळकर, नगरसेविका वंदना अजित गायकवाड, कॉ. ॲड. सरिता मोकाशी (राजकीय व सामाजिक), पाखर संकुल अध्यक्षा शुभांगी जयकृष्ण बुवा (कष्टकरी व कामगार महिलां सक्षमीकरण कार्य), ॲड. सुवर्णा हेमंत कोकरे (न्यायालयीन कामकाज तसेच बाल विकास प्रकल्प).

# भारतीय जनता युवा मोर्चाची जंबो कार्यकारिणी जाहीर

**शहराध्यक्ष विजय कुलथे यांनी केली घोषणा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मार्च-**

भारतीय जनता युवा मोर्चाच्या शहर कार्यकारिणीची घोषणा शहराध्यक्ष विजय कुलथे यांनी बुधवारी केली. या कार्यकारिणीत भाजयुम ोच्या सरचिटणीसपदी विश्वनाथ प्याटी, यतीराज होनमाने, तुषार पवार आणि विशाल बनसोडे यांना संधी देण्यात आली आहे.

भारतीय जनता युवा मोर्चाची शहरकार्यकारिणीमध्येसरचिटणीस- विश्वनाथ प्याटी, यतीराज होनमाने, तुषार पवार, विशाल बनसोडे. उपाध्यक्ष - अमर एक्कलदेवी, आकाश मुदगल, शिवानंद कावडे, रतिकांत कमलापुरे, धीरज बंदपट्टे, प्रविण गलांडे, संदीप महाले, निशांत सावळे, कपिल कावळे, अंबादास पामु, केतन अंजिखाने. चिटणीस - लक्ष्मण सरवदे, रोहित हंचाटे, गणेश पवार, अनिकेत प्रधाने, रोहन मराठे, डोंगरेश चाबुकस्वार, गुरुनाथ कोळी, सुरज विटे, नरेश दासरी, रोहित गोरे, अनिरुद्ध पाटील, श्रीनिवास दासरी. कोषाध्यक्ष - कृष्णा झंवर. विधानसभा संयोजक - शहर उत्तर - अर्जुन मोहिते, शहर मध्य - अनिल वंगारी, शहर दक्षिण - सिद्धेश्वर माळी. शहर संपर्कप्रमुख - योगेश कबाडे. विद्यार्थी आघाडी संयोजक - चंद्रकांत यमगर. युवती आघाडी संयोजिका - किरण माशाळकर. सोशल मीडिया संयोजक - कृष्णा थोरात. सोशल मीडिया सहसंयोजक - यश लंगडेवाले. मंडल अध्यक्ष - शहर उत्तर पूर्व - धरीराज रमणशेट्टी, शहर उत्तर मध्य - राज बंडगर, शहर उत्तर पश्चिम - सागर भोसले, शहर मध्य पूर्व - देवेंद्र डेरबेरे , शहर मध्य मध्य - ओंकार होमकर, शहर मध्य पश्चिम - श्रवण साबळे, शहर दक्षिण पूर्व - रविराज वाघमोडे, शहर दक्षिण पश्चिम - प्रदीप मोरे.

शहर कार्यकारिणी सदस्यांमध्ये विठ्ठल सरवदे, सिकंदर कतारी, अथर्व शहाणे, अभिषेक येमुल, भास्कर बोगम, दिनेश लोमटे, अजित पवार, सागर कजाकवाले, रविराज हरसुरे, मनोज पंगुडवाले, गोपी तांदळे, आकाश खरात, सौमित्र शिर्के, मोहन बाडीवाले, कृष्णात अगनूर, मंगेश फलमारी, राघव घनाते, सिद्धांत धोत्रे, प्रतीक अग्रवाल, लखन भोसले, सार्थक पुराणिक, निखिल दरीगोळ, विकास कारके, संगमेश केलूर, अभिषेक म्हेत्रे, विलास मासम, अभिषेक येमुल, सुमित पतंगे, अक्षय शिवसिंगवाले, विकास भोसले, ऋषिकेश चिट्टे, ऋषिकेश कदम, विरेश अंबलगी, सूर्यजीत सर्वगोड, महेंद्र मंजुळे, महेश वाघमारे, गजानन खिलारे, यश पवार, शुभम मंठाळकर, समर्थ वैद्य.

### सोलापूर जिल्ह्यात ४ ते १८ मार्च मनाई आदेश; आरडीसी अभिजित पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ४ मार्च-**

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून दि. ४ मार्च २०२६ रात्री २०.०० वाजलेपासून ते दि. १८ मार्च २०२६ रात्री २०.०० वाजेपर्यंत या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) (अ ते फ) व कलम ३७ (३), अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आला असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार समाजकंटक व गुंडप्रवृत्ती इसमांवर प्रतिबंधात्म क कारवाई करणे सोयीचे होईल. तसेच शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फ ेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे, असभ्य हावभाव करणे, ग्राम्य भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळ्या जाती जमातीच्या भावना दुखावल्या जातील, त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल, सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करुन त्याचा प्रसार करण्यास मनाई करण्यात येत आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# लातूर दैनिक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## डॉ. जे. एम. वाघमारे यांना राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातर्फे श्रध्दांजली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ मार्च :** 'लातूर पॅटर्न'चे जनक, माजी कुलगुरू, माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांना राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते डॉ. वाघमारे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

थोर विचारवंत, लातूरचे माजी नगराध्यक्ष डॉ. जे. एम. वाघमारे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने सोमवारी सकाळी निधन झाले. मंगळवारी त्यांच्या पार्थिवावर कवठा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेज, संगमेश्वर अध्यापक विद्यालय, तुळजाभवानी इंग्लिश स्कूल, तुळजाभवानी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, संगमेश्वर प्राथमिक विद्यामंदिर येथे डॉ. जे. एम. वाघमारे यांना श्रध्दांजली अपर्ण करण्यात आली. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, समन्वयक राजीव मुंढे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य डॉ. आर. एम. चव्हाण, डॉ. नाजनीन सय्यद, प्राचार्य अरुण करदुरे, मुख्याध्यापक अविनाश पवार, पर्यवेक्षक संजय गुरमे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



# लातूर जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीत
# आ. अभिमन्यू पवार समर्थकांचे पारडे जड

## जिल्ह्यातील सुजाण मतदारांतून व्यक्त होत असलेला 'कल'

**श्रीधर स्वामी**

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ मार्च :** प्रत्यक्षात त्रिशंकू अवस्थेत असलेल्या लातूर जिल्हा परिषदेत भाजप - राष्ट्रवादी ( अप गट ) महायुती सत्तेत येणार हे स्पष्ट झाले आहे. या निवडणुकीत भाजपने १८ तर राष्ट्रवादीने १२ जागा जिंकून एकत्रित सत्तेसाठी आवश्यक असणारे संख्याबळ गाठले आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद सर्वसाधारण गटातील महिलेसाठी आरक्षित असल्याने या पदावर आ. संभाजी पाटील निलंगेकर आणि आ. अभिमन्यू पवार या दोन नेत्यांपैकी कोणाच्या समर्थक उमेदवाराच्या गळ्यात अध्यक्षपदाची माळ पडणार ? याकडे सगळ्यांचे लक्ष आहे. या दोन्ही आमदारांपैकी आ. पवार समर्थक असणाऱ्या लोदगा गटाच्या सदस्या सौ. पूनम मुक्ता यांचे पारडे सद्यःस्थितीत जड असल्याचे निदर्शनास येत आहे. मतदारांतूनही भाजपचे वरिष्ठ नेते निलंगेकर समर्थकाऐवजी पवार समर्थक उमेदवाराची वर्णी या पदावर लावण्यास प्राधान्य देतील असा मतप्रवाह व्यक्त होताना ऐकायला मिळत आहे.



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत लातूर जिल्ह्यात मागच्या निवडणुकांच्या तुलनेत जिल्हा परिषद आणि लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपचा टक्का बऱ्यापैकी घसरल्याचे दृष्टीपथास येते. स्थानिक नेतृत्वाकडून हेतूतः झालेल्या चुका या बाबीला कारणीभूत असल्याचे सर्वज्ञात आहे. अगदी शंभर टक्के सत्तेच्या चाव्या हातात येण्याची खात्री असलेली लातूर शहर मनपा अंतर्गत मतभेदातून भाजपच्या नेत्यांनी काँग्रेसकडे सुपूर्द करता येईल अशी परिस्थिती निर्माण केली. परिणामतः लातुरात कधी नव्हे ते भाजप मधील काही निष्ठावंतांनी वेगळी चूल मांडून आपली नाराजी पक्षाच्या शिर्ष नेतृत्वापर्यंत पोहचविण्याचे कामही केले. भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नुकतीच वर्णी लागलेल्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना निवडणूक प्रमुख पदावरून बाजूला सारण्याची आ. निलंगेकरांची खेळी अपेक्षेप्रमाणे त्यांच्यावरच उलटली. विधानसभा निवडणुकीत निसटत्या पराभवाचा



सामना करावा लागलेल्या डॉ. अर्चनाताईंनी अल्पावधीत भाजपमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण करण्यात यश संपादन केले आहे. त्यांच्यामुळे आपली कारस्थाने नेत्यांच्या लक्षात येतील, या अनाहूत भीतीपोटीही काही मंडळींकडून चुका घडल्याच्या बाबी आता समोर येत आहेत. शेवटी कोंबडा कितीही झाकून ठेवला तरी सूर्य उगवायचा थांबत नसतो या उक्तीप्रमाणे सारेकाही घडताना दिसतेय.

लातूर जिल्हा परिषदेचे यावेळचे अध्यक्षपद सर्वसाधारण गटातील महिलांसाठी आरक्षित आहे. या साठी भाजपाकडे औसा तालुक्यातील लोदगा गटाच्या सौ. पूनम मुक्ता,



देवणी तालुक्यातील वलांडी गटाच्या उषा पाटील, निलंगा तालुक्यातील सरवडी गटाच्या कविता गोरे आणि रेणापूर तालुक्यातील खरोळा गटाच्या शिवकन्या गोडभरले अशा चार महिला सदस्या चर्चेत आहेत. यामध्ये पूनम मुक्ता आणि उषा पाटील यांच्यापैकी एकाला संधी मिळेल,असा अंदाज लावला जात आहे. मुक्ता आ. पवार समर्थक तर पाटील ह्या आ. निलंगेकर समर्थक आहेत. लातूरच्या राजकारणात आ. पवार आणि आ. निलंगेकर हे दोन्ही नेते एकाच पक्षातील असले तरी त्यांच्यात फारसे सख्य नसल्याचे सर्वांना माहिती आहे. यामध्ये सुरुवातीपासूनच आ. निलंगेकर हे आ. पवारांना दुय्यम स्थान देण्याची एकही संधी सोडत नसल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यातच आ. पवार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अत्यंत विश्र्वासू मंडळींपैकी एक असल्याने निलंगेकरांच्या तुलनेत पवारांचे पारडे कायम जड राहत असल्याचे वेळोवेळी दृष्टीपथास आले आहे. निलंगेकरांकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीदरम्यान जाणते - जाणतेपणे झालेल्या चुकाही एका अर्थाने जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्यांच्या पथ्यावर पडू शकतात. हे दोन्ही आमदार आपल्याच समर्थकाची वर्णी अध्यक्षपदावर लागावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. आता भाजपचे वरिष्ठ नेते आ. पवारांच्या समर्थकाची या पदासाठी निवड करतात की आ. निलंगेकर समर्थकाची ? याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

## चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजची पोस्टर सादरीकरण स्पर्धेत चमकदार यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ मार्च :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथील डी. फार्मसी द्वितीय वर्षातील विद्यार्थी अभय हिप्पळणरे आणि दत्तप्रसाद पुरी यांनी औषधनिर्माणशास्त्र संकुल, एम.आय.टी. विश्वप्रयाग युनिव्हर्सिटी, सोलापूर आयोजित राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. सदर स्पर्धेत राज्यभरातील विविध फार्मसी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी संशोधनाधारित आणि नाविन्यपूर्ण विषयांवर पोस्टर सादर करत आपले कौशल्य प्रदर्शित केले. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेला आणि संशोधनपर उपक्रमांना नवे बळ मिळाले असून विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.




या यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवणीकर, विश्वस्त श्री. विजयकुमार मठपती, श्री. अरुण हालकुडे, प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. शिवराज नागोबा, डॉ. विवेक पंचभाई, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. राम साखरे, डॉ. सुनील हिंडोळे, डॉ. शिवकुमार लद्दे, डॉ. नसीर शेख, प्रा. महेश मानके, प्रा. स्वस्तिका चामे, प्रा. प्रशांत बनसोडे, प्रा. रोहित कोंबडे, प्रा. स्नेहल जोगदंड, प्रा. वैष्णवी मुगळे, प्रा. श्रद्धा सुरवसे आणि प्रा. स्वाती बिद्री, शिवहार विभुते, सिद्धेश्वर स्वामी, प्रमोद स्वामी आणि विशाल निलंगेकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी महानगरपालिकेची जप्ती मोहीम तिव्र

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ मार्च :** आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये मालमत्ता कर वसुलीसाठी लातूर महानगरपालिकेने अनेक कर सवलतीची योजना राबवली मात्र बर्याच मालमत्ताधारकांनी याकडे कानाडोळाच केला.त्यामुळे महानगरपालिकेमार्फत जप्ती मोहिम राबविण्यात येत आहे.त्याकरिता चार मुख्य कार्यालयातील पथक व चार क्षेत्रीय कार्यालय पथक असे एकूण आठ पथके नेमण्यात आले आहेत.

महानगरपालिकेमार्फत शहरातील प्रलंबित मालमत्ता कर वसुलीसाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत मालमत्ताकराची थकबाकी ठेवणाऱ्या करदात्यांविरुद्ध कठोर पावले उचलून त्यांच्या मालमत्तांवर जप्ती व नळ खंडन कारवाई करण्यात येत आहे.



मंगळवार दिनांक ०३ मार्च रोजी क्षेत्रीय कार्यालय सी अंतर्गत रु. ८,४५,०००/-थकित मालमत्ता करापोटी २ दुकाने सील करण्यात आली तसेच गंजगोलाई परिसरात रु.२,३३,१२०/- थकबाकी पोटी दोन दुकाने जप्त करण्यात आले. क्षेत्रीय कार्यालय अ अंतर्गत २,००,९६२/- थकित मालमत्ता करापोटी २ दुकाने सील करण्यात आली तसेच चार निवासी मालमत्तांवर अटकावणी व नळखंडनाची कार्यवाही करण्यात आली. क्षेत्रीय कार्यालय ड अंतर्गत एकूण सहा मालमत्तांचे अटकावणी व नळखंडन करण्यात आले. क्षेत्रीय कार्यालय ब अंतर्गत २ मालमत्तांची अटकावणी व २ मालमत्तांचे नळ खंडन करण्यात आले.

या व्यतिरिक्त शहरातील सर्व नागरिकांपर्यंत पोहोचून मालमत्ता व पाणी कर भरण्याबाबत प्रोत्साहित करण्यासाठी महानगरपालिकेने १२ स्वतंत्र पथके नेमलेले आहेत. या १२ पथकातील जवळपास १०० कर्मचारी घरोघरी जाऊन मालमत्ता कराचा व पाणी कराचा भरणा करून घेत आहेत.

थकीत कराच्या वसुलीसाठी मनपाकडून मोहीम राबविण्यात येत आहे. ही मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे. त्यामुळे जप्तीसारखी कटू कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी कर भरून मनपाला सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त श्रीमती मानसी व उपायुक्त (कर संकलन) डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

## श्री सिध्देश्वर यात्रा महोत्सवाचा शोभेची दारू आतिषबाजीने सांगता

### उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांच्या हस्ते महाआरती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ मार्च :** लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून दि. १५ फेब्रुवारीपासून यात्रा महोत्सव सुरु झाला होता. या महोत्सवाची सांगता दि. २ मार्च रोजी रात्री ८ वाजता शोभेची दारू आतिषबाजीने करण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. याप्रसंगी देवस्थानचे प्रशासन सचिन जांबुतकर यांची उपस्थिती होती.





प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने ७३ वा यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. तब्बल १५ दिवस विविध धार्मिक, सामाजिक उपक्रम, वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते. त्याच बरोबर शेतकऱ्यांसाठीही विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सदर यात्रा महोत्सवात सहभागी होण्यासाठी लातूर जिल्ह्यासह परजिल्हा व राज्यातील अनेक भाविक व नागरिक दररोज मोठ्या संख्येने येत होते. सदर यात्रा महोत्सव यशस्वी पार पाडण्यासाठी देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांच्यासह विश्वस्त विक्रम गोजमगुंडे, श्रीनिवास लाहोटी, प्रदीप राठी, मन्मथप्पा लोखंडे, अशोक भोसले, बाबासाहेब कोरे, नरेश पंड्या, सुरेश गोजमगुंडे, रमेशसिंह बिसेन, चंद्रकांत परदेशी, व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे, ओम गोपे आदींनी पुढाकार घेतला होता.

या यात्रा महोत्सवाची सांगता सोमवार दि. २ मार्च रोजी करण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांच्या हस्ते श्रीची महाआरती करण्यात आली. यानंतर मंदीर प्रांगणात शोभेच्या दारूची मनमोहक आतिषबाजी करण्यात आली. यानंतर श्रीची मिरवणूक काढून दहीहंडी व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांच्यासह नायब तहसीलदार सुधीर देशमुख विश्वस्त अशोक भोसले, सुरेश गोजमगुंडे, नरेशकुमार पंड्या,रमेशसिंह बिसेन, व्यंकटेश हालिंगे,विशाल झांबरे आंदीची उपस्थिती होती. सदर यात्रा महोत्सव यशस्वी पार पाडल्याबद्दल प्रशासक सचिन जांबुतकर यांनी विश्वस्तांसह शिवभक्त व लातूरकरांचे आभार व्यक्त केले.


### जाहीर प्रगटन

माझे पक्षकार प्रभाकर विठ्ठलराव घोगरे रा. मुखेड ता. मुखेड जि.नांदेड हा.मु. शिवाजी चौक लातूर यांनी दिलेली माहिती, दर्शविलेले कागदपत्रे व अधिकृत केल्यावरुन तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकाराची वडिलोपार्जित शेतजमीन मौजे मुखेड ता. मुखेड येथे जमीन गट क्र. ९११ क्षेत्र २ एकर १० गुंठे शेतजमीन आहे व राहती घरजागा मिळकत क्र. ८, वार्ड क्र. ४ मध्ये आहे. माझे पक्षकार व त्यांची पत्नी नामे गंगाबाई प्रभाकर घोगरे यांच्यामध्ये रितसर सन २००५ मध्ये घटस्फोट झालेला आहे व तेंव्हापासून गंगाबाई ही मुलाबाळासह माझे पक्षकारापासून विभक्त तिचे माहेरी राहत आहे. माझे पक्षकार व गंगाबाई हिचा घटस्फोट झाल्यामुळे त्यांचे एकमेकासोबत कसल्याही प्रकारचे संबंध राहिलेले नाही. असे असताना गंगाबाई ही बेकायदेशीर रित्या माझे पक्षकाराच्या वर नमुद मिळकतीमध्ये हस्तक्षेप व अडथळा करत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीचे माझे पक्षकार हे एकमेव मालक व कब्जेदार आहेत. तरी कोणीही व्यक्ती, बँक, कार्यालय, संस्था वर नमुद मिळकती बाबत माझे पक्षकाराचे परस्पर इतर कोणासोबतही खरेदी विक्री, गहाण, बक्षीस, दान, साठेखत इ. व्यवहार करु नये, याउपरही जर कोणी कांही व्यवहार केल्यास तो व्यवहार बेकायदेशीर असेल व सदर व्यवहार माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. तसेच माझे पक्षकार संबंधीतांविरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करतील, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन
दिनांक ०२/०३/२०२६

तर्फे
**अ‍ॅड. एस.एस. श्रृंगारे,**
**अ‍ॅड. कल्पना एम. भुरे,**
ऑफिस जिल्हा व सत्र न्यायालय,
लातूर, मो.क्र. ९८६०७८५७९०.

जाहीर प्रगटन देणार
**प्रभाकर विठ्ठलराव घोगरे**

### जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार महेश बालासाहेब चव्हाण, रा.चनई, ता. अंबाजोगाई जि. बीड यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना ज्ञानदेव सुर्यकांत धायगुडे, रा. रामलिंगेश्वर मंदिरजवळ, काळे गल्ली, लातूर यांनी मालकी व कब्जेवहिवाटीचा प्लॉट मौजे. लातूर ग्रामीण, ता. जि. लातूर येथील जमीन गट नंबर २५२/२ पैकीचा याची गुंठेवारी झालेला प्लॉट नंबर ३ याचा गुंठेवारी नियमाधीन प्रमाणपत्र क्रं.जा.क्र. लामनपा/न.र.वि/८/३२५/२०२१-२०२२, मे. नगर रचनाकार, लातूर यांनी मंजूर केलेला असून याची लांबी दक्षिण -उत्तर ५० फुट व रुंदी पुर्व पश्चिम ४० फुट असून याचे एकूण क्षेत्रफळ २००० चौ. फुट आणि त्यालगतचे असलेला प्लॉट नंबर ४ चा भाग याचा गुंठेवारी नियमाधीन प्रमाणपत्र क्रं. जा.क्रं/लामनपा/न.र.वि/८/३५४/२०२१-२०२२, मे. नगर रचनाकार, लातूर यांनी मंजूर केलेला प्लॉट याची लांबी पुर्व पश्चिम ४० फुट व रूंदी दक्षिण - उत्तर २५ फुट याचे एकूण क्षेत्रफळ १००० चौ. फुट असून या दोन्ही प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ ३००० चौ. फुट आहेत. याची एकत्रित चतुःसीमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस :- महेश पंडीत धायगुडे यांची जमीन, पश्चिमेस २५ फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस :-ज्ञानदेव सुर्यकांत धायगुडे यांचा प्लॉट, उत्तरेस उमा विलास सोम यांचा प्लॉट

येणे प्रमाणे वरील चतुःसीमेच्या आतील मिळकत विद्यमान मालकाकडुन लेखी करार करुन घेऊण, इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर मिळकती बाबत जर कोणाचा उजर, आक्षेप, हितसंबंध, हक्क संबंध, कर्ज बोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्ट डिग्री, मृत्युपत्र, तारण, लीज, शेजाऱ्याचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक ०३/०३/२०२६

तर्फे
**अ‍ॅड. अशोक ज्ञा. लोखंडे**
नोटरी भारत सरकार. शाहू चौक,
लातूर, मो नं.९४२१९ ८६४९५

जाहीर प्रगटन देणार
**महेश बालासाहेब चव्हाण**
रा.चनई, ता.अंबाजोगाई जि.बीड
मो नं.९७६३७१२४२५


## संक्षिप्त...

### बोरोळ येथे रमजान निमित्ताने मुस्लिम बांधवांना इफ्तार पार्टी



**देवणी :** २८ फेब्रुवारी २०२६ रोजी बोरोळ पंचायत समिती गणातुन प्रचंड बहुमताने विजयी झालेले गजानन भोपणीकर यांच्या वतीने बोरोळ येथे रमजान निमित्ताने मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोरोळ येथील हमजु पठाण साहब, युसुफ पठाण साहब, नगर पंचायतीचे नगरसेवक डॉ. प्रा. अनिल इंगोले, शाकीर पठाण, मुकरम मुजेंवार सर, मैनोद्दीन मणियार, रशिद मनियार, जमीर पठाण, दस्तगीर पठाण, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश युवक सरचिटणीस मनोज कन्नाडे, जिल्हा सरचिटणीस अनिल कांबळे, जिल्हा सरचिटणीस प्रताप कोयले बोरोळकर, दत्ता चाळकापुरे, जितेंद्र शिवगे, गफुर भाई शेख, काशिनाथ शेंडगे, ज्ञानोबा सुर्यवंशी, निवृत्ती सुर्यवंशी, सत्यदेव गरड, संतोष पंढरपुरे, सत्यवान बालुरे, अनिल तेलगावे, माधव सपकाळे सह अदिंची उपस्थिती होती.

### किराणाच्या गोडाऊनला शॉकसर्किटने आग लागून चार लाखाचे नुकसान



**वलांडी :** देवणी तालुक्यातील वलांडी येथील जुन्या गाव भागात अमोल विलास खंवदे यांच्या किराणा दुकानाचे गोडाऊन आहे. सदर गोडाऊनला आज रविवारी दुपारी अडीच ते तीन च्या सुमारास अचानक शॉकसर्किटने आग लागली. या आगीत किराणा दुकानात विक्रीसाठी आणलेले व गोडाऊन मध्ये साठवून ठेवलेले सुमारे चार लाखाचा किराणामाल जळून खाक झाल्याची माहिति दुकान मालक अमोल विलास खंवदे यांनी दिली. सदरील आग विजवण्याचा प्रयत्न करीत असताना गोडाऊन शेजारील रहिवासी विजय प्रदीप चवाळे वय २२ हा तरुण जखमी झाला आहे. सदरील आग स्थानिक ग्रामस्थ व देवणी नगरपंचायतीच्या अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी आटोक्यात आणली. सदरील घटनास्थळाचा महसूल विभागाच्या वतीने तलाठी मुकेश सांगावे, पोलीस हवालदार राजेश लामतुरे महसूल सहाय्यक ऋषी वाघमारे यांनी पंचनामा केला आहे. नुकसानग्रस्त किराणा दुकान मालकाला शासनाकडूनआर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी वलांडी व्यापारी कमिटीचे अध्यक्ष उमाकांत नागलगावे यांनी केली आहे.

### व्यसनमुक्त समाज निर्माण करणे ही काळाची गरज - डॉ. अरविंद भातांब्रे




**निलंगा :** सध्या समाजामध्ये व्यसनाधीनतेचे वाढते प्रमाण ही गंभीर सामाजिक समस्या बनली असून त्यामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. व्यसनाधीनतेमुळे मानसिक, आर्थिक व सामाजिक अडचणी निर्माण होत असून गुन्हेगारी घटनांमध्येही वाढ होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे व्यसनमुक्त समाज निर्माण करणे ही आजच्या काळाची अत्यंत महत्त्वाची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. अरविंद भातांब्रे यांनी केले.

निलंगा शहरात सुरू करण्यात आलेल्या 'साई व्यसनमुक्ती व उपचार केंद्र केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष प्रल्हाद बाहेती हे होते. यावेळी डॉ. आशिष चेपुरे, संचालक चक्रधर शेळके, माजी नगराध्यक्ष हमीद शेख, डॉ. मेनगुले, डीवायएसपी विशाल ढुम्मे, नगरसेवक हरिभाऊ सगरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

डॉ. अरविंद भातंब्रे पुढे म्हणाले की, निलंगा तालुक्यात युवकांमध्ये दारू व इतर व्यसनांचे प्रमाण वाढल्यामुळे अनेक कुटुंबांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. व्यसनाधीन तरुणांमुळे कुटुंबियांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याने उपचारासाठी स्वतंत्र केंद्राची आवश्यकता होती. समाजहिताच्या दृष्टीने हे साईव्यसनमुक्ती उपचार केंद्र सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

संचालक चक्रधर शेळके यांनी आपल्या मनोगतातून तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकू नये यासाठी जनजागृती व उपचाराच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जाणार असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमास डॉक्टर प्राध्यापक पत्रकार व्यापारी वनागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश हाणेगाव यांनी केले

# रेणापूर तालुक्यातील अवकाळी पाऊस आणि गारपीठीचा आ. कराड यांच्याकडून आढावा

## शासकीय योजनेपासून एकही लाभार्थी वंचित राहू नये अधिकाऱ्यांना केल्या सूचना

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. ०४ मार्च :** गेल्या आठवड्यात अचानकपणे गारपिटीसह जोरदार वादळवारा आणि अवकाळी पाऊस होऊन रब्बी पिकाचे आणि फळबागायचे मोठे नुकसान झाले वीजपुरवठा खंडित झाल्याच्या अनेक ठिकाणी घटना घडल्या याबाबत लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी आढावा घेऊन नुकसानीचे सर्वच पंचनामे करावे त्याचबरोबर शासनाच्या कोणत्याही योजनेपासून एकही लाभार्थी वंचित राहणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी अशा सूचना त्यांनी दिल्या.



महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईत सुरू असून दोन दिवसाच्या सुट्टीमुळे आ. रमेशआप्पा कराड हे परत आले असता त्यांनी शनिवारी सकाळी रेणापूर येथे अवकाळी पाऊस आणि गारपिटीच्या नुकसानीचा आढावा घेतला. यावेळी रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, गट विकास अधिकारी सुमित जाधव, तालुका कृषी अधिकारी कांबळे, वीज वितरण कंपनीचे आळगे, रेणापूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिंदे, विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी त्याचबरोबर भाजपाचे महेंद्र गोडभरले, अभिषेक आकनगिरे, पद्माकर चिंचोलकर, सतीश आंबेकर, अनिल भिसे, शरद दरेकर, दशरथ सरवदे, बाबासाहेब घुले, वसंत करमोडे, दत्ता सरवदे, श्रीकृष्ण मोटेगावकर, विजय चव्हाण, यांच्यासह विविध गावचे सरपंच, लोकप्रतिनिधी, प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

अवकाळी पावसाने तालुक्यातील बहुतेक गावांमध्ये पिकांचे आणि काही संपत्तीचे नुकसान झाले आहे त्यात इट्टी, नागापूर, खानापूर, डि. देशमुख, मोटेगाव, भोकरंबा, पोहेरेगाव या भागात जास्त नुकसान झाले असून भोकरंबा, डि. देशमुख येथे काही लोकांचे घरावरील पत्रे उडाले. भोकरंबा येथे अंगणवाडी इमारतीची पडझड झालेली आहे. सूचनानुसार कारवाई पूर्ण झालेली आहे. पंचनामे केले आहेत. लवकरच याबाबत निधी सुद्धा उपलब्ध होईल अशी माहिती बैठकीत अधिकाऱ्याच्या वतीने देण्यात आली. तर पशुधन चोरीचे वाढते प्रमाण, अवैध धंदे, शेतकरी सन्मान, लाडकी बहीण, घरकुल योजना, शेतकऱ्याच्या राशनचे पैसे, शेत रस्त्याच्या अडचणी या सर्व विविध अडीअडचणी लोकप्रतिनिधींनी मांडल्या.

अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे फळबागेसह रब्बीच्या नुकसानीत आलेल्या सर्व पिकाचे पंचनामे करावेत, तारा तुटून व इतर कारणाने खंडित झालेला शेतकऱ्यांचा वीजपुरवठा पूर्ववत करावा असे सांगून यावेळी बैठकीत बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लाडकी बहीण, घरकुल योजना, शेतकरी सन्मान योजना यासह शासकीय योजनेतील गरजू लाभार्थ्यांच्या त्रुटी दूर करून एकही लाभार्थी लाभार्थी वंचित राहणार नाही याची संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दक्षता घ्यावी अशा सूचना दिल्या.

रेणापूर तालुक्यात अवैध दारू विक्री, जुगार, मटका यासारखे कुठेही अवैध धंदे चालता कामा नये तात्काळ संबंधिताविरुद्ध कडक कारवाई करावी वाढते चोरीचे प्रकार थांबवण्यासाठी योग्य ते उपाययोजना करावी असे सांगून सर्वसामान्य माणसांना शासन आपल्या हक्काचे आहे दिलासा देणारे आहे याची जाणीव आपल्या तत्पर कामातून अधिकाऱ्यांनी दाखवावी असेही आव्हान आ. रमेशआप्पा कराड यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केले.

### रसिका संकुलन देवणी येथे धुलिवंदन- होळी साजरी

**देवणी :** धुलिवंदन हा होळीची राख व माती अंगाला लावण्याचा दिवस असून हा सण होळीच्या दुसऱ्या दिवशी साजरा करतात. यास धुळवड असेही म्हणले जाते. या दिवशी महाराष्ट्रात सार्वजनिक सुट्टी असते. हा सण फाल्गुन कृष्ण प्रतिपदेला साजरा करतात. परंपरेप्रमाणे या दिवशी होलीका दहनाची राख एकमेकांना लावतात. कोकणात प्रत्येक गावाचे धूलिवंदन वेगवेगळ्या दिवशी असू शकते. या गावाचे धूलिवंदन सामान्यतः होळीच्या १५व्या दिवशी असते.



या होळी उत्सवा निमित्ताने बोरोळ पंचायत समिती गणातुन प्रचंड बहुमताने विजयी झालेले गजानन भोपणीकर यांच्या रसिका संकुलन देवणी येथे जाऊन मोठ्या आनंदाने होळी साजरी करण्यात आली. होळी साजरी करताना कुमारी आरोही गजानन भोपणीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा युवक सरचिटणीस प्रताप कोयले बोरोळकर, दिपक खुळे, संतोष पंढरपुरे, माधव सपकाळे, गणेश खोंडे, सत्यवान बालुरे सह अदिंची उपस्थिती होती.

## सुग्रीव सुरवसेची सेंट्रल बँकेत निवड

### नुतन जि.प. सदस्य दयानंद सुरवसे यांच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर , दि. ०४ मार्च :** चाकूर तालुक्यातील झरी बुद्रुक येथील सुग्रीव शिवाजी सुरवसे यांनी राज्य शासनाच्या स्पर्धा परीक्षेत भाग घेऊन मोठ्या जिद्दीने अभ्यास करून यश संपादन केले. त्यामुळे त्याची सेंट्रल बँकेत क्लर्क पदावर निवड झाली आहे.या निवडीबद्दल सुग्रीवचा नुतन जिल्हा परिषद सदस्य दयानंद सुरवसे यांच्या हस्ते सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



यावेळी ग्राम पंचायत सदस्य शिवशंकर मुदाळे, रत्नाकर पाटील, मोरेश पाटील, शिवाजी सुरवसे,ओमकार सुरवसे, रामदास सुरवसे, व्यंकट पाडुळे, सिद्धेश्र्वर चव्हाण,दिपक सुरवसे सह गावातील अनेक नागरिक उपस्थित होते.

सत्कारमूर्ती सुग्रीव सुरवसे याला मानाचा फेटा,शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन गौरविण्यात आले.यावेळी जिल्हा परीषद सदस्य दयानंद सुरवसे म्हणाले की,ग्रामीण भागातील युवकांनी स्पर्धा परीक्षेकडे वळून कठोर परिश्रम केल्यास यश नक्की मिळते. आजचा हा सन्मान इतर तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.सुग्रीव सुरवसे यांनी कठोर परिश्रम करून घवघवीत यश संपादन केले इतरही तरूणांनी अभ्यासात सातत्य ठेवून यश संपादन करावे असा मोलाचा संदेश जिल्हा परिषद सदस्य दयानंद सुरवसे यांनी दिले.

सत्कारमूर्ती तरुणाने या यशाचे श्रेय आई-वडील, गुरुजन व गावकऱ्यांना दिले.सर्वांनी सहकार्य केल्यानेच मी हे यश गाठू शकलो.त्याचा गावकऱ्यांनी सन्मान केल्याबद्दल आभार मानले.या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण होते.या कार्यक्रमास गावातील मान्यवर, ज्येष्ठ नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दोन देवस्थानांना तीर्थक्षेत्राचा क दर्जा मिळवून दिल्याबद्दल आ. रमेशआप्पा कराड यांचे पानगावकरांनी मानले आभार



**तभा वृत्तसेवा**

**पानगांव, दि. ०४ मार्च :** रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील मुख्य हनुमान मंदिर आणि श्री संत माधव मामा संस्थान या दोन्ही देवस्थानांना जिल्हा परिषदेचा तीर्थक्षेत्र विकासाचा क दर्जा मिळून दिल्याबद्दल भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांचे पानगाव भाजपाच्या वतीने यशोचित सत्कार करून आभार व्यक्त केले.

पानगाव येथील मुख्य हनुमान मंदिर आणि श्री संत माधव मामा संस्थान या दोन्ही देवस्थानाचा सर्वांगीण विकास व्हावा, विकास कामांना निधी मिळावा यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी संबंधित अधिकाऱ्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केल्याने या दोन्ही देवस्थानांना जिल्हा परिषदेच्या तीर्थक्षेत्र विकास योजनेचा क दर्जा नुकताच प्राप्त झाला आहे.

मुख्य हनुमान मंदिर आणि श्री संत माधव मामा संस्थान या दोन्ही देवस्थास तीर्थक्षेत्र विकास योजनेचा क दर्जा मिळून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून माजी सरपंच सुकेश भंडारे, भाजपाचे शहराध्यक्ष दिगंबर येडले, युवा मोर्चा मंडल अध्यक्ष अमर चव्हाण, हरिकृष्ण गुरले, जगन्नाथ नरारे, नाथराव गीते, बाबुराव कस्तुरे, बालाजी गिरी, संभाजी वालेकर, रामदास गुडदे, महादू कस्पटे, विश्र्वंभर डोणे, रामेश्र्वर डोणे, अक्षय मद्दे यांच्यासह अनेकांनी आभार व्यक्त केले आहे.

### महायुतीत लढलो लातूर जि.प.महायुतीचाच झेंडा फडकवणार- सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ०४ मार्च :** तालुक्यात आपण महायुती म्हणून निवडणुका एकत्र लढवल्या व आज महायुती म्हणूनच जिल्हा परिषदेमध्ये आपण एकत्रित सत्ता स्थापन करून लातूर जिल्हा परिषदेवर महायुतीचा झेंडा फडकवू असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी अहमदपूर येथे केले.

अहमदपूर येथे दीपवर्षा मंगल कार्यालयात अंधोरी जिल्हा परिषद मतदार संघाच्या वतीने ऋणनिर्देश सोहळ्यात सोहळ्यात बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारतभूषण क्षीरसागर होते.

व्यासपीठावर प्रदेश सरचिटणीस शिवानंद हैंगणे, बापूराव सारुळे, मुजीब पटेल जागीरदार, शिवाजीराव देशमुख, अय्याज शेख, अजहर बागवान, शिवाजीराव खांडेकर, रहीम पठाण, संग्राम चामे, हुसेन मनियार, सुंदरराव साखरे, मीनाक्षीताई शिंगडे, निवृत्ती कांबळे, प्रवीण रेड्डी,जावेद बागवान, तानाजी राजे, सादिक शेख, सय्यद युसूफ भाई, नागेश बेंबडे, सत्यभूषण क्षीरसागर, राजकुमार शिंदे, चंद्रप्रकाश हंगे, प्रदीप कांबळे, शेखर जाधव, अविनाश चाटे, अफरोज शेख, महेश हंबीर, मुजमिल सय्यद, आशिष तोगरे, बाळू केंद्रे, गजानन परांडे, खीजर जागीरदार, दीपक शिंगडे, युवराज पाटील, माधव सरवदे, बाळासाहेब बेडदे, किरण बारमाळे, अशोक कासले सह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी नूतन जिल्हा परिषद सदस्य प्रफुल्लचंद गुंडरे (अंधोरी), उत्तमराव माने (शिरूर ताजबंद), अश्विन नागराळे (रोकडा सावरगाव) भागवत गुट्टे (किनगाव) तसेच पंचायत समिती सदस्य देवेंद्र बोडके, माधव सरवदे ,सुलोचना कासले आदींचा सत्कार सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की, आपण आंधोरी जिल्हा परिषद मतदार संघात उमेदवारांचं सोशल इंजिनिअरिंग केलं त्यामुळे आपल्याला अधिकचा फायदा या मतदारसंघात झाला. मागील कालखंडात सहकारी पक्षाच्या नेत्यांनी आपल्यावर केलेल्या आरोपा संदर्भात संकुचित विचार न बाळगता आपण महायुतीचा झेंडा जिल्हा परिषदेवर फडकवणार असून नूतन जिल्हा परिषद सदस्य आणि पंचायत समिती सदस्यांसाठी एक कार्यशाळेचे सुद्धा आयोजन आपल्या वतीने करण्यात येणार असून सर्व लोकप्रतिनिधींनी आता लोकहिताला प्राधान्य देऊन लोकहिताची काम आपण केली पाहिजे असा कानमंत्र सुद्धा सहकार मंत्री नामदार पाटील यांनी या कार्यक्रमाच्या माध्यमातून नूतन जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्यांना दिला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शरद गुट्टे यांनी केले.

# पटसंख्येची पडताळणी करुन पदसंख्येचे समायोजन करावे आधार नसलेल्या ३९४ विद्यार्थ्यांचा प्रश्न विधानसभेत

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. ०४ मार्च :** २०२५-२६ च्या संच मान्यतेत औसा तालुक्यातील आधार नसलेल्या ३९४ विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष पडताळणी करून त्यांची संख्या ग्राह्य धरुनच शिक्षकांचे समायोजन करण्याचाबाबतचा विषय औसा मतदार संघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी विधानसभेत उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले.



औसा तालुक्यातील १७९ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील एकूण १५,३१६ विद्यार्थ्यांपैकी ३९४ विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण न झाल्यामुळे व २१८ विद्यार्थ्यांच्या आधारमध्ये तांत्रिक त्रुटी असल्यामुळे त्यांच्या संख्येला शाळांच्या संच मान्यतेत समाविष्ट करण्यात अडचणी येत आहेत. आधार लिंक नसल्याने या विद्यार्थ्यांची नोंद अधिकृत पटसंख्येत धरली जात नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. परिणामी संबंधित शाळांमधील शिक्षक समायोजन व पदसंख्या निश्चितीवर परिणाम होत आहे. औसा तालुक्यातील ९ शाळांमध्ये शिक्षक पदे अतिरिक्त ठरण्याची शक्यता निर्माण झाली असून सुमारे १० शिक्षकांवर त्याचा परिणाम होणार आहे. या संदर्भात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ शाखा औसाच्या शिक्षक संघटनेचे अध्यक्ष महादेव खिचडे यांनी औसा तालुक्याचे आमदार अभिमन्यू पवार यांच्याकडे निवेदन देऊन प्रत्यक्ष पडताळणी करावी. विद्यार्थ्यांची वास्तविक उपस्थिती लक्षात घेऊन २०२५-२६ ची संच मान्यता करून शिक्षकाचे समायोजन करावे. अशी मागणी केली होती. यावेळी शिष्टमंडळात संघाचे तालुकाध्यक्ष महादेव खिचडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन चंद्रशेखर सोनवणे, नागरसोगा ग्रामपंचायतचे सरपंच भास्कर सूर्यवंशी, कुमार शिंदे, परमेश्वर कांबळे, प्रदीप टोंगरे, संजयकुमार बिराजदार, राजेंद्र सूर्यवंशी आदी शिक्षक उपस्थित होते. आमदार अभिमन्यू पवार यांनी विद्यार्थ्यांचा प्रश्न विधानसभेत उपस्थित करून शिक्षण विभागाकडे योग्य तो निर्णय घेण्याची मागणी केली. ३९४ विद्यार्थी नियमित शाळेत उपस्थित राहून शिक्षण घेत आहेत. त्यांना पाठ्यपुस्तके, पोषण आहार व इतर शासकीय योजना मिळत आहेत. मात्र आधार प्रमाणीकरण प्रक्रियेमधील तांत्रिक अडचणी, जन्मनोंदणीतील त्रुटी आदी कारणांमुळे त्यांची नोंद प्रणालीमध्ये प्रलंबित आहे. या कारणामुळे शाळांची अधिकृत विद्यार्थी संख्या कमी दाखवली जात असून काही शाळांमध्ये शिक्षक पदे कमी होण्याची शक्यता निर्माण झाली.

औसा तालुक्यातील ६१२ विद्यार्थ्यांचा प्रश्न विधानसभेत मांडल्याबद्दल महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष महादेव खिचडे, संजय जगताप, दीपक डोंगरे, हरीश आयतनबोणे व पदाधिकाऱ्यांनी आमदार अभिमन्यू पवार यांचे आभार मानले आहेत.तसेच हा प्रश्न्न शासनस्तरावर लवकरात लवकर निकाली निघेल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तालुक्यातील ९ शाळांमधील आधार नसलेल्या ३९४ व आधारमध्ये तांत्रिक त्रुटी असलेल्या २१८ विद्यार्थ्यांचा प्रश्न्न मार्गी लागल्यास सुमारे १० शिक्षक अतिरिक्त होणार नाहीत व शाळांची स्थैर्य आणि शैक्षणिक गुणवत्ता अबाधित राहणार असल्याचे संघटनेने यावेळी नमूद केले. औसा तालुक्यातील शिक्षण व्यवस्थेसाठी महत्त्वाचा असलेला हा प्रश्न्न विधानसभेत मांडल्यामुळे पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## श्री तुळजाभवानी मंदिरात पौर्णिमेनिमित्त पारंपरिक होलिकादहन संपन्न

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.४ मार्च -

हुताशनी पौर्णिमेच्या निमित्त श्री तुळजाभवानी मंदिरात पारंपरिक पद्धतीने होलिकादहनाचा सोहळा उत्साहात पार पडला. मंदिर परिसरातील होमकुंडासमोर विधीवत होळीचे पूजन करण्यात आले.

श्री तुळजाभवानी मंदिरातील होमकुंडासमोर होळीचे पूजन केल्यानंतरच तुळजापूर शहरातील घरोघरी होळी पूजन करण्याची परंपरा आहे. या परंपरेनुसार मंदिरातील होळी



पूजनानंतर शहरात सर्वत्र होळी साजरी करण्यात आली.

हुताशनी पौर्णिमेच्या होळी सणाच्या निमित्ताने सायंकाळच्या अभिषेक पूजेची वेळ बदलून ती सायंकाळी ६ वाजता पार पडली. अभिषेक पूजेनंतर श्री तुळजाभवानी देवींची आरती व धुपारती करण्यात आली. यावेळी महंत हमरोजीबुवा, महंत वाकोजीबुवा, भाविक व पुजारी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### वडगांव गाजा येथे अनोख्या पध्दतीने होळीचे दहन

लोहारा, दि.४ मार्च -

लोहारा तालुक्यातील वडगांव गांजा येथील जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सर्व विद्यार्थ्यांनी शालेय परिसरातील तसेच गावातील प्लास्टिक, कागद, कचरा इत्यादी वस्तूं गोळा करून त्याची होळी तयार करून यावेळी होळीचे दहन करण्यात आले. यावेळी शालेय समिती अध्यक्ष सचिन पवार, लक्ष्मण भुजबळ, पांडुरंग फुलसुंदर, सुभाष लोहार, शिवाजी म्हेत्रे, तसेच शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते.



### संत मीरा पब्लिक स्कूलमध्ये 'राष्ट्रीय विज्ञान दिन' साजरा

परंडा, दि.४ मार्च -


संत मीरा पब्लिक स्कूल परंडा येथे 'राष्ट्रीय विज्ञान दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध विज्ञानाधारित उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न शास्त्रज्ञ सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विज्ञान दिनाचे महत्त्व स्पष्ट करणारी भाषणे सादर करत विज्ञानामुळे दैनंदिन जीवनात झालेली प्रगती, संशोधनाचे महत्त्व व वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याची गरज यावर प्रभावी विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी नांगरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विद्यार्थ्यांनी केले. या विज्ञान दिन सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास प्रेरणा मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.



### जिजाऊ इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

अणदूर, दि.४ मार्च -

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जिजाऊ इंग्लिश स्कूल अणदूर यांचा वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी शाळेतील चिमुरड्यांनी विविध महाराष्ट्रीयन लोककला सादर करत अणदूरकरांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे संस्थापक वैजनाथ शेटे होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद सभापती ॲड. दिपक आलूरे, माजी सरपंच धनराज मुळे, माजी पंचायत समिती सदस्य साहेबराव घुगे, दयानंद मुडके, ब्रमानंद कापसे, सिद्राम शेटे, सचिन तोग्गी, फुलवाडीच्या सरपंच छायाबाई लोहार तसेच आरबळीच्या सरपंच आफ्रीन नदाफ यांची उपस्थिती होती. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अप्पासाहेब धुमाळ व सदस्य सोमनाथ शेटे, राधिका जिडगे, लक्ष्मण लोहार, रवि व्हंड्रे, गणेश घुगे, नित्यानंद आलूरे, महेश कुंभार, आनंदी मुळे, प्रशांत खुने आदी उपस्थित होते.



### रणजीत मोरे यांना 'व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार'

येरमाळा, दि.४ मार्च -

येरमाळा येथील रणजीत मोरे यांना व्यसनमुक्ती कार्यात सक्रीय सहभाग व उल्लेखनीय योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले. शैलेश जी. ब्रम्हे यांच्या हस्ते त्यांना 'व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. धाराशिव येथील लेडीज क्लब येथे 'विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा' कार्यक्रमात हा सन्मान सोहळा पार पडला. या कार्यक्रमात व्यसनमुक्ती चळवळीत सक्रीयपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. यावेळी सचिन कवले व डॉ. संदीप तांबारे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या या कार्याची दखल घेत सन्मान करण्यात आल्याने येरमाळा परिसरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## लोहाऱ्यात अवैध गौण खनिज उत्खनन; विशेष पथक नेमण्याचे तहसीलदारांचे आदेश



तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.४ मार्च -

लोहारा शहरासह तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खननाचा प्रकार सध्या मोठ्या प्रमाणात सुरू असून दररोज लाखो रुपयांची उलाढाल होत असल्याची चर्चा परिसरात आहे. तहसील कार्यालयाच्या कथित 'कृपाशिर्वादा'खाली हा प्रकार 'रात्रीस खेळ चाले' या गीताप्रमाणे प्रत्यक्षात सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

तालुक्यातील माकणी, सास्तूर, जेवळी, बेलवाडी, तावशीगड, बेंडकाळ सर्कल परिसरातील वैयक्तिक मालकीच्या शेतजमिनी, गायरान आणि शासकीय गावठाणातून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात गौण खनिज उत्खनन सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे. स्थानिक महसूल कर्मचारी गौण खनिज माफियांच्या राजकीय पाठबळ व दादागिरीमुळे 'चिडीचूप' असल्याची चर्चा रंगत आहे. अवैध खरेदी-विक्रीतून दररोज लाखो रुपयांची आर्थिक उलाढाल होत असून संबंधित माफियांनी स्वतःचे स्वतंत्र 'ग्रुप नेटवर्क' तयार केल्याची माहिती समोर येत आहे. टिप्पर व हायवा वाहनांच्या ताफ्यासोबत मोटारसायकली, खाजगी सुरक्षा रक्षक आणि चारचाकी वाहनांचा गराडा घालून खडक-दगडाची वाहतूक केली जात असल्याचे सांगितले जाते. ग्राहकांच्या म्हणण्यानुसार, एका हायवा खडकाची विक्री सुमारे चार हजार रुपयांना केली जात आहे. काही ठिकाणी दहा ट्रिपची रॉयल्टी भरून पन्नास ट्रिपपर्यंत उत्खनन केल्याचे प्रकार सर्रास सुरू असल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, गेल्या पाच-सहा महिन्यांत खाजगी बांधकामांसाठी काढलेल्या रॉयल्टी चलनाची नोंद तहसील कार्यालयातील संबंधित विभागाकडे आढळून न आल्याची बाबही समोर येत आहे. या संपूर्ण प्रकारामुळे शासनाचा महसूल बुडत असून पर्यावरणाचेही मोठे नुकसान होत आहे. संबंधित प्रशासनाने तातडीने तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

### उत्खननप्रकरणी तात्काळ स्थळ पंचनामा...

गौण खनिजाच्या उत्खननाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची गंभीर दखल घेत संबंधित ठिकाणी तात्काळ स्थळ पंचनामा करण्याचे तसेच विशेष पथक नेमून सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती रणजितसिंह कोळेकर यांनी दिली. उत्खनन प्रकरणात नियमांचे उल्लंघन झाले असल्याची शक्यता लक्षात घेऊन महसूल विभागाकडून प्राथमिक तपास सुरू करण्यात आला आहे. संबंधित अधिकाऱ्यांना घटनास्थळी जाऊन पंचनामा करण्याचे निर्देश देण्यात आले असून, अहवाल सादर झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचेही तहसीलदारांनी स्पष्ट केले. बेकायदेशीर उत्खननास आळा घालण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असून, दोषी आढळल्यास कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## आढाळा शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिन संपन्न

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.४ मार्च -

कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आढाळा येथे राष्ट्रीय विज्ञान दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा राजश्री वायसे या होत्या.

प्रमुख पाहुणे म्हणून गावच्या सरपंच ज्योतीताई वायसे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष डॉ. विकास आरकडे, माजी सरपंच धनंजय वायसे, अनुराधा शिंदे, सुरेखा सावंत, ज्ञानेश्वरी वायकर व विकास धावडे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महान शास्त्रज्ञ सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांच्या प्रेरणेने व विज्ञान शिक्षिका शिवनंदा स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'रमणयान २०२६' या प्रतिकात्मक उपग्रहाचे मान्यवरांच्या हस्ते प्रक्षेपण करण्यात आले. या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांनी केले. सूत्रसंचालन महादेव खराटे यांनी तर आभार प्रदर्शन तुकाराम कराळे यांनी मानले. कार्यक्रमास गावातील पालक व नागरिक उपस्थित होते.

## 'चिगुर'ची भेट, संस्कृतीचा संगम आणि २.८० लाखांची देणगी; त्रिकोळीत स्नेहसंमेलन उत्साहात

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.४ मार्च -

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा त्रिकोळी येथे आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती मातेच्या पूजनाने झाली.

उद्घाटन प्रसंगी उमरगा पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी, त्रिकोळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी थोरात तसेच सरपंच मुद्रिका बाई सूरवसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पारंपरिक शाल-श्रीफळाऐवजी वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचा अभिनव उपक्रम राबवण्यात आला. त्रिकोळी येथील लेखक, कवी, पत्रकार व संपादक मनोज कुलकर्णी लिखित चिगुर ही कादंबरी प्रमुख पाहुण्यांना स्वागत भेट म्हणून देण्यात आली.



शालेय व्यवस्थापन समितीचे शिक्षणतज्ञ सदस्य ॲड. शुभम स्वामी यांनी या कादंबरीची निवड का केली, याविषयी मनोगत व्यक्त केले. १९९३ च्या भूकंपानंतरच्या ग्रामीण जीवनातील संघर्ष, संस्कृती, मैत्री आणि शिक्षक-विद्यार्थ्यांतील जिव्हाळ्याचे प्रभावी चित्रण या कादंबरीत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात श्रीगणेश स्तवनाने झाली. विद्यार्थ्यांनी सुप्रसिद्ध गीतांवर ग्रुप डान्स, 'शिवबाचा पाळणा', 'वराहरूपम', 'संदेशे आते है', छत्रपती संभाजी महाराज व कवी कलश यांच्या शेवटच्या संवादाचे प्रभावी सादरीकरण, 'खेळ मांडला', लावणी तसेच मोबाईल वापरावर आधारित लघुनाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विविध प्रांतांतील लोकनृत्यांनी कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढवली.

या कार्यक्रमादरम्यान प्रत्यक्ष उपस्थित प्रेक्षक तसेच युट्यूबवरून कार्यक्रम पाहणाऱ्या शिक्षणप्रेमींनी ऑनलाइन पेमेंटद्वारे तब्बल २ लाख ८० हजार रुपये इतकी रक्कम शाळेला बक्षीस म्हणून दिली. गावकऱ्यांनी शाळेवरील प्रेम व विश्वास व्यक्त केल्याची भावना यावेळी व्यक्त झाली.

मुख्याध्यापक कडगंचे, सुनिल गायकवाड, सुधावानी कडगंचे, सुनील सूर्यवंशी, गोपाळ भोसले, राजश्री घोगरे, गोविंद येवते, संजय चव्हाण, वंदना बिराजदार, विलास जाधव यांच्यासह शालेय समितीचे अध्यक्ष संभाजी भोसले, उपाध्यक्ष अस्मिता वाडीकर, ड. शुभम स्वामी, कमलाकर पाटील, बब्रुवान वाडीकर, विजयकुमार कांबळे, दयानंद पाटील, महेश कोडगीर, हरिदास बनसोडे, पोलीस पाटील, उपसरपंच शिवाजी सुरवसे तसेच गावातील पालक व शिक्षणप्रेमींनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

गावामध्ये प्रथमच जिल्हा परिषद शाळेत इतका सुनियोजित कार्यक्रम पार पडल्याने विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून शाळेचे कौतुक होत आहे. गेल्या दीड वर्षात लोकसहभागातून शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे, पाणी फिल्टर, कायमस्वरूपी स्टेज, पुस्तके, रंगकाम आणि सुरक्षा भिंत यांसारखी अनेक विकासकामे पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## तालुका पातळीवर वाचन चळवळ रुजली तरच जनमानस बदलणार : डॉ. सोमनाथ रोडे



तभा वृत्तसेवा
अणदूर, दि.४ मार्च -

ग्रंथालय संघाचे अधिवेशन तालुका पातळीवर घेण्याची गरज असून, जोपर्यंत तालुकास्तरावर वाचन चळवळ विकसित होत नाही तोपर्यंत ती जनमानसात रुजणार नाही, असे प्रतिपादन डॉ. सोमनाथ रोडे यांनी केले.

ते जिल्हा ग्रंथालय संघ धाराशिव व शेतकरी वाचनालय खुदावाडी यांच्या संयुक्त विद्यमाने खुदावाडी (ता. तुळजापूर) येथे आयोजित जिल्हा अधिवेशनात बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी गावातील महिला भजनी मंडळाने टाळ-मृदंगाच्या गजरात ग्रंथ दिंडी काढून अधिवेशनाचे शानदार उद्घाटन केले. समाजसेवक डॉ. सिद्रामप्पा खजूरे, सरपंच सरोजनिताई रेवणप्पा कबाडे व शेतकरी वाचनालयाचे सचिव प्रा. वसंत चिंचोले यांच्या हस्ते मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

समाजसेवक डॉ. सिद्रामप्पा खजूरे यांनी संस्कारक्षम पिढी घडवण्यासाठी वाचनालय चळवळीला उभारी देण्याचे आवाहन केले. प्रा. वसंत चिंचोले यांच्या कार्याचा गौरव करत उपस्थितांनी त्यांचा सत्कार केला. उत्तरादाखल त्यांनी गावातील वाचकांना घरपोच ग्रंथसेवा सुरू करण्याचा संकल्प व्यक्त केला तसेच वाचनालय 'अ' वर्गाकडे वाटचाल करत असल्याची माहिती दिली.

अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातुर येथील प्रा. कमलाकर दादा कबाडे होते.

प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय तुळजापूर चे सतीश कदम, ग्रंथालय संचालक सुनील हुसे, संतोष जाधव (छत्रपती संभाजीनगर), जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमानजी ढाकणे, अध्यक्ष व.ग. सूर्यवंशी, प्रा. मनोहर कबाडे आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन मुख्याध्यापक मनोहर घोडके यांनी केले तर आभार प्रदर्शन तुकाराम बोंगरगे यांनी मानले. यावेळी जिल्ह्यातील विविध वाचनालयांचे पदाधिकारी, ग्रामस्थ व वाचनप्रेमी उपस्थित होते.

### शेतकरी वाचनालय खुदावाडीला ५० वर्षे पूर्ण

१९७५ साली केवळ १० पुस्तके व २ वर्तमानपत्रांपासून सुरू झालेले शेतकरी वाचनालय खुदावाडी आज ५० वर्षे पूर्ण करत आहे. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या या वाचनालयाचा सर्वच मान्यवरांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. 'ब' वर्ग दर्जा असलेले हे वाचनालय लवकरच 'अ' वर्ग दर्जा प्राप्त करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. मोबाईलच्या युगातही दररोज सुमारे १०० वाचक येथे येऊन वाचन करतात, ही बाब अभिमानास्पद आहे. वाचाल तर वाचाल ही म्हण प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न खुदावाडीकर करत असून, इतर गावांसाठीही हा आदर्श ठरत आहे.

## राज्यस्तरीय 'साहित्यिक काव्यरत्न' पुरस्काराने भाग्यश्री देवकते यांचा गौरव

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.४ मार्च -

येथील युवा कवयित्री व लेखिका भाग्यश्री देवकते बाचके यांच्या साहित्यसेवेची दखल घेत अहिल्यानगर येथे आयोजित राज्यस्तरीय सोहळ्यात त्यांना साहित्यिक काव्यरत्न पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

अहिल्यानगर येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात हा पुरस्कार सोहळा पार पडला. सोहळा समितीच्या प्रमुख आयोजिका श्रुती बत्तीन तसेच संचालिका वैशाली जाधव यांच्या हस्ते भाग्यश्री देवकते बाचके यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.



याप्रसंगी प्रा. रघुनाथ बाचके, विश्वनाथ देवकते उपस्थित होते.

भाग्यश्री देवकते बाचके या अल्पावधीतच आपल्या लेखनशैलीमुळे व विचारांच्या मांडणीमुळे वाचकांच्या पसंतीस उतरल्या आहेत. त्यांच्या कवितांमधून समाजातील विविध विषय, स्त्रीशक्ती, नातेसंबंध, संस्कृती आणि जीवनमूल्ये यांचे प्रभावी चित्रण आढळते. त्यांनी विविध साहित्यिक व लेखन स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून अनेक सन्मानही मिळवले आहेत.

विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मद्यधुंद अवस्थेत वाहनचालकावर गुन्हा

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.४ मार्च -

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविल्याप्रकरणी एका वाहनचालकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

आरोपी आनंता अशोक गायकवाड (वय ३०, रा. खेड) यांनी दि.३ मार्च रोजी सायं. ५.४५ वा. सु. आपले वाहन क्र. एमएच २४ बीएन ७९६० हे येडशी टोलनाका येथे मद्यधुंद अवस्थेत चालवून मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन केले. याप्रकरणी पोलिसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरून संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

## कळंबमध्ये मुकबधीर विद्यार्थ्यांसोबत रंगोत्सव

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.४ मार्च -

स्व. गणपतरावजी कथले युवक आघाडीच्या वतीने कळंब येथील संत ज्ञानेश्वर मुकबधीर निवासी विद्यालय येथे जाऊन मुकबधीर विद्यार्थ्यांसोबत रंगोत्सव मोठ्या साजरा करण्यात आला.

विविध प्रकारचे रंग उधळत विद्यार्थ्यांच्या आयुष्यात आनंदाचे रंग भरण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी बाळासाहेब कथले, भाऊसाहेब शिंदे, यश सुराणा, पंकज कोचेटा, सुशील बलदोटा, ओंकार कुलकर्णी, गोविंद खंडेलवाल, अशोक फल्ले, नवनाथ पुरी, धर्मराज पुरी, मनोज शिंगणापुरे, संस्कार फल्ले, राहुल किरवे, रोहित किरवे, मनोज फल्ले, संकेत भोरे, विश्वजीत पुरी आदी उपस्थित होते.

## राज्यस्तरीय संविधान गुण गौरव परीक्षेत उमरगा (चि.) केंद्राची उज्ज्वल कामगिरी




तभा वृत्तसेवा
इटकळ, दि.४ मार्च -

भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्तीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय संविधान गुण गौरव परीक्षा २०२५-२०२६ मध्ये उमरगा (चि.) केंद्राने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जि.प. प्रा. शाळा उमरगा (चि.) येथे घेण्यात आलेल्या केंद्रस्तरीय परीक्षेत कुमारी ज्ञानेश्वरी एकनाथ जाधव (इयत्ता ६ वी) हिने प्रथम क्रमांक पटकावत शाळेचा व परिसराचा मान उंचावला. या परीक्षेस एकूण २५ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यामध्ये प्रथम क्रमांक ज्ञानेश्वरी जाधव (इयत्ता ६ वी), द्वितीय क्रमांक प्रगती कदम (इयत्ता ७ वी), तृतीय क्रमांक आयान पिंजारी (इयत्ता ७ वी) यांनी सुयश प्राप्त केले.

यशस्वी विद्यार्थ्यांचा जिल्हास्तरावर आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

या यशामागे मुख्याध्यापक कांबळे एस.एस. तसेच शिक्षक सालेगावकर एम.पी., स्वामी एस.एस., पोतदार, काळे, राजगुरु, राठोड आणि कोरे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे उमरगा केंद्राच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा पुन्हा एकदा उमटला असून परिसरात सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## राजाराम देशमुख यांचे आई तुळजाभवानीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ मार्च -**

मुंबईतील प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाचे विश्वस्त राजाराम देशमुख यांनी आपल्या पत्नीसह महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले.



यावेळी त्यांनी देवीच्या चरणी नतमस्तक होत राज्य व देशाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. पुजारी स्वराजराजे कदम परमेश्वर यांच्या मार्फत देवीची विधीवत पूजा-अर्चा करण्यात आली.

याप्रसंगी भोपे पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमरराजे कदम, भाजपाचे गुलचंद व्यवहारे, मंदिराचे प्रशासकीय व्यवस्थापक देशपांडे, सुरज कोठावळे, खंडू कुंभार, विपीन खोपडे आदी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### चेअरमनपदी अनिता वाघे यांची निवड

**तुळजापूर, दि.४ मार्च -**

तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ मर्या. यांच्या चेअरमनपदी महाविकास आघाडीच्या अनिता श्रीकांत वाघे यांची अधिकृत निवड करण्यात आली. निवडणूक प्रक्रिया शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या निवडणुकीचे निर्णय अधिकारी म्हणून सहायक निबंधक कार्यालय तुळजापुर येथील ए.व्ही. जाधव यांनी कामकाज पाहिले. निवड प्रक्रियेदरम्यान संघाचे सर्व संचालक उपस्थित होते. यावेळी व्हा. चेअरमन अनिल शिंदे, शिवाजी बोधले, सुहास साळुंके, सुधीर कदम, सुनिल जाधव, श्रीकांत वाघे, खंडाप्पा पावले, माणिक तोडकरी, भैरू जाधव, संजय धुरगुडे तसेच दयानंद क्षीरसागर आदी उपस्थित होते.

### मकरंद पाटील यांना जिल्हास्तरीय विज्ञान शिक्षक पुरस्कार

**अणदूर, दि.४ मार्च -**

अणदूर येथील जवाहर विद्यालयमधील विज्ञान शिक्षक मकरंद चनबसाप्पा पाटील यांना राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या




पूर्वसंध्येला थोर भौतिकशास्त्रज्ञ 'डॉ. सी. व्ही. रमणयांच्या नावाने दिला जाणारा जिल्हास्तरीय विज्ञान शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. सन २०१३ पासून मकरंद पाटील हे जवाहर विद्यालय, अणदूर येथे विज्ञान शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. शाळास्तर, केंद्रस्तर, तालुकास्तर, जिल्हास्तर तसेच विभागस्तरावरील विज्ञान प्रदर्शनांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून त्यांना यशाच्या शिखरावर पोहोचवण्यासाठी ते सातत्याने मार्गदर्शन करीत असतात. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल संस्थेचे सचिव रामचंद्र आलुरे, संस्थेचे मार्गदर्शक ज्येष्ठ विधिज्ञ लक्ष्मीकांत पाटील, नागनाथ कानडे, विद्यालयाचे मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.



### नागराळ (लो) येथे शेतकरी मार्गदर्शन बैठक संपन्न

**लोहारा, दि.४ मार्च -**

लोहारा तालुक्यातील नागराळ (लो) येथे दि.२ मार्च रोजी ग्रामपंचायत कार्यालयात कोहिजण फाऊंडेशन ट्रस्ट यांच्या वतीने शेतकरी मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे प्रकल्प समन्वयक मनोज देवकते यांच्या मार्गदर्शनाखाली अनुकूलन तज्ञ व सामाजिक कार्यकर्ते श्रीकृष्ण गंगणे यांनी बदलत्या हवामान परिस्थितीनुसार शेतकऱ्यांनी अवलंबावयाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी वातावरण बदल व त्याचे दुष्परिणाम, सेंद्रिय शेतीचे म हत्त्व तसेच वृक्ष लागवडीची गरज या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमात क्लायमेट चॅम्पियन किरण चिंचोले व सदस्य रोहित पाटील यांनी सहकार्य केले. यावेळी बळीराम गोरे, रत्नाजी गोरे, जयश्री गोरे, अर्चना भोकरे, सीना चिंचोले, शामल घाडगे, सत्यनारायण गोरे, अर्जुन गोरे, आदित्य काकडे, अतुल गोरे, नीलकंठ गोरे, उमाकांत गोरे, संजय गोरे, तानाजी गोरे, गुंडू जाधव आदी ग्रामस्थ शेतकरी उपस्थित होते.



### पुरस्काराने तानाजी क्षिरसागर सन्मानित

**तुळजापूर, दि.४ मार्च -**

वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न राज्यस्तरीय पुरस्कार तानाजी क्षिरसागर यांना जाहीर झाला असून, त्यांचे वितरण मुंबई येथे रविवारी पार पडले. राज्याचे कॅबिनेट आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर तसेच आरोग्य राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कारप्राप्तीनंतर जिल्हा परिषद धाराशिवचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांच्या हस्ते क्षिरसागर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतिष हरिदास, जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. कुलदीप मि टकरी, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अभिजित बनसोडे उपस्थित होते.

### सुमनताई पाटील यांचे निधन

**धाराशिव, दि.४ मार्च -**

धनेश्वरी बोरगाव (ता. कळंब) येथील सुमनताई त्र्यंबकराव पाटील यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ८६ व्या वर्षी निधन झाले. त्या महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या ज्येष्ठ भगिनी होत. तसेच धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरद पवार गट) चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील आणि परभणीचे आ. डॉ. राहुल पाटील यांच्या त्या चुलती होत.

## 'महाराष्ट्र केसरी'साठी पैलवानांची ८ मार्चला होणार आरळी येथे निवड



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ मार्च -**

भारतीय माती शैली विभागाच्या वतीने सासवड (जि. पुणे) येथे दि.१२ ते १५ मार्च दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या म हाराष्ट्र केसरी २०२६ भारतीय माती शैली कुस्ती स्पर्धेसाठी धाराशिव जिल्हास्तरीय निवड चाचणी दि.८ मार्च रोजी पार पडणार आहे.

ही निवड चाचणी तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल मधील श्रीमंत कुस्ती आखाडा येथे आयोजित करण्यात आली असल्याची माहिती संयोजक संजय पारवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला उप महाराष्ट्र केसरी मारुती वडार, लोहारा तालुका अध्यक्ष दयानंद साळुंखे, कुस्ती पंच गोविंद घारगे, दर्याप्पा मुळे, चंद्रकांत उळेकर, महेश गवळी, अमर परमेश्वर, शिवाजी गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

सासवड येथे प्रथमच मातीतील महाराष्ट्र केसरी स्पर्धा होत असून राज्यभरातील नामांकित मल्लांचा सहभाग अपेक्षित आहे.

त्या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यातील गुणवंत व होतकरू मल्लांना संधी मिळावी, यासाठी जिल्हास्तरावर निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीमंत कुस्ती आखाड्याचे सर्वे सर्वा फौजदार संजय पारवे यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

याप्रसंगी धाराशिव जिल्ह्याचे पहिले ऐतिहासिक अधिवेशन जिल्हा सचिव वामन गाते व राष्ट्रीय कुस्ती पंच धनराज बुजबळ यांच्या म ार्गदर्शनाखाली होणार असल्याची माहिती देण्यात आली. राज्य सचिव मोहन खोपडे यांच्या समन्वयातून अधिवेशनाची रूपरेषा निश्चित करण्यात आली आहे.

या स्पर्धेत प्रत्येक वजनगटातील सुवर्णपदक विजेत्यास बुलेट म ोटारसायकल, रौप्यपदक विजेत्यास स्प्लेंडर मोटारसायकल, खुल्या गटातील महाराष्ट्र केसरी विजेत्यास थार चारचाकी वाहन स्पर्धेचे प्रमुख आकर्षण, वजनगट निश्चित ५५, ६०, ६५, ७०, ७५, ८०, ८५, ९० किलो तसेच १४० किलोपर्यंत खुला गट आहे.

सकाळी ८ ते १२ वजन प्रक्रिया, दुपारी २ वाजता स्पर्धेला सुरुवात, सर्व सामने आंतरराष्ट्रीय नियमानुसार (माती विभागात) निवड झालेल्या मल्लांनी आधारकार्ड व दोन पासपोर्ट फोटो तांत्रिक समितीकडे जमा करणे बंधनकारक आहे.

### वस्तादांना आवाहन...

धाराशिव जिल्ह्यातील जास्तीत जास्त वस्तादांनी आपल्या मल्लांना निवड चाचणीसाठी पाठवावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. महाराष्ट्र केसरी स्पर्धेत जिल्ह्याची छाप पाडण्यासाठी ही सुवर्णसंधी असल्याचे आयोजकांनी आवाहन केले.



## खैरी नदीपात्रातून २० ब्रास वाळूचा अवैध उपसा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मार्च -**

आंबी पोलीस ठाणे हद्दीत खैरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा केल्याप्रकरणी एकावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी काका किसन शेळके (रा. तांदुळवाडी, ता. परंडा) यांनी दि.२५ फेब्रुवारी रोजी सकाळी सुमारे ११.४५ वाजता खैरी नदीपात्रातून अंदाजे २० ब्रास वाळू (किंमत सुमारे १ लाख ४० हजार रुपये) शासनाचा कर बुडवून विनापरवाना बेकायदेशीररीत्या उपसा केला. उपसा केलेली वाळू तांदुळवाडी शिवारातील गट क्रमांक ११ मधील स्वतःच्या शेतात साठवून ठेवलेली आढळून आली.

याप्रकरणी फिर्यादी धिरज काकासाहेब साळुंके (वय २५, ग्राम महसूल अधिकारी, सज्जा तांदुळवाडी, रा. चिखली ता. जि. धाराशिव) यांनी दि.३ मार्च रोजी दिलेल्या प्रथम खबरावरून आंबी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अवैध कत्तल प्रकरणी १२५ चमड्यांसह मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मार्च -**

परंडा पोलीस ठाणे हद्दीत अवैध कत्तल प्रकरणी कारवाई करण्यात आली आहे.

आरोपी इम्रान गणी कुरेशी (वय ३२, रा. कुरेशी गल्ली, परंडा जि. धाराशिव) यांनी दि.३ मार्च रोजी सकाळी ६.३० वा. सु. कुरेशी गल्ली, परंडा येथे अवैध कत्तल केलेल्या गोवंशीय जनावरांचे १२५ चमडे साठवून ठेवल्याचे आढळून आले.

पोलिसांनी छापा टाकून एकूण २६,४०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

## विज्ञान प्रज्ञा शोध परीक्षेत मधु हजारी राज्यात प्रथम



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ मार्च -**

बीड येथील बलभीम महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय विज्ञान प्रज्ञा शोध परीक्षेत नळदुर्ग येथील मधु हजारी हिने १०० पैकी ९२ गुण मिळवत संपूर्ण राज्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे.

दि.२३ फेब्रुवारी रोजी झालेल्या या परीक्षेस महाराष्ट्रातील पश्चिम म हाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र व मराठवाडा विभागांतील २८ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता. नळदुर्ग महाविद्यालयातून ७१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ५० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून १८ विद्यार्थी प्रमाणपत्रासाठी पात्र ठरले आहेत.

विजेत्यांचा सन्मान माधुरी शानबाग यांच्या हस्ते करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या यशासाठी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. उद्धव भाले यांनी समन्वयक म्हणून मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, उपप्राचार्य डॉ. अशोक कदम, डॉ. उद्धव भाले, डॉ. शिवाजी घोडके, धनंजय पाटील व सर्व प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## धाराशिव शहरात दिशाभूल करून ८७ हजारांचे सोन्याचे दागिने लंपास; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मार्च -**

धाराशिव शहरात अज्ञात व्यक्तीने दिशाभूल करून महिलेच्या पर्समधील सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हसीमा उर्फ हलीमा गफ ूर कुरेशी (वय ५२, रा. कुरेशी गल्ली, आझाद चौक, धाराशिव) या दि.२६ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे १२.३० वाजता बाजार पोलीस चौकीजवळ जिकरे यांच्या कपड्याच्या दुकानाजवळ उभ्या असताना अज्ञात व्यक्तीने त्यांची दिशाभूल केली. सदर इसमाने कपटीपणाने फिर्यादीच्या पर्समधील अंदाजे १८.७५० ग्रॅम वजनाचा सोन्याचा लच्छा व गलसर असे एकूण ८७,५०० रुपये किंमतीचे दागिने घेऊन फसवणूक केली.

याप्रकरणी हसीमा कुरेशी यांनी दि.३ मार्च रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## संत गोरोबाकाका मंदिरासमोरील गोठ्यातून तीन गायी व वासरू चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मार्च -**

ढोकी पोलीस ठाणे हद्दीत तेर येथील संत गोरोबाकाका मंदीर परिसरातून गायी चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे.




पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी दत्तात्रय सिद्धेश्वर धुपेकर (वय २४, रा. तेर ता.जि. धाराशिव) यांच्या तक्रारीनुसार मंदिरासमोरील निरल हणुमंत एडके यांच्या शेतातील गोठ्यातून अंदाजे ६५ हजार रुपये किंमतीच्या तीन गावरान गायी व एक लहान वासरू अज्ञात व्यक्तीने चोरून नेले. ही घटना दि.२८ फेब्रुवारी रोजी पहाटे २ ते ५ वाजण्याच्या दरम्यान घडल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

याप्रकरणी दत्तात्रय धुपेकर यांनी दि.३ मार्च रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## नळदुर्ग बसस्थानकाचा जिल्ह्यात प्रथम क्रमांक

### कर्मचाऱ्यांचा संत गाडगेबाबा संस्थेकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ मार्च -**

राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियान' अंतर्गत धाराशिव जिल्ह्यात नळदुर्ग बसस्थानकाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल तुळजापूर तालुक्यातील देवसिंगा तुळ येथील श्री संत गाडगेबाबा सामाजिक संस्थेच्या वतीने १ मार्च रोजी नळदुर्ग बसस्थानकातील वाहतूक नियंत्रक व स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.



या अभियानात नळदुर्ग बसस्थानकाने जिल्ह्यात अव्वल स्थान मिळवण्यासाठी वाहतूक नियंत्रक महेश डुकरे, अनिल हांडे, गुंडाप्पा डुकरे तसेच स्वच्छता कर्मचारी लहु देडे, आकाश हराळकर, कुणाल बेले यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या मेहनतीमुळे बसस्थानक परिसर स्वच्छ व सुबक ठेवण्यात यश आले.

सत्कार सोहळ्यास नळदुर्ग येथील नगरसेवक सुधीर पोतदार, आकाश कुलकर्णी, संस्थेचे अध्यक्ष तानाजी जाधव, शहर शिवसेना प्रमुख संतोष पुदाले, तुळजापूर येथील डॉ. सतीश महामुनी, म ोमीन, इरफान काझी आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते. अशपाक जमादार व इतर मान्यवरांच्या हस्ते कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी रिपाईचे बाबासाहेब बनसोडे, बाबासाहेब मस्के, खम रअली जमादार यांच्यासह नागरिक व प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.के. गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन संतोष पुदाले यांनी मानले.

## बंदी कागदावरच? नळदुर्ग तालुक्यात गुटख्याची खुलेआम विक्री

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ मार्च -**

महाराष्ट्र सरकारने बंदी घातलेल्या गुटख्याची नळदुर्ग शहर व परिसरात खुलेआम विक्री सुरू असल्याचा आरोप होत आहे. नळदुर्ग, तुळजाभवानी साखर कारखाना परिसर, लोहगाव, दहिटना, सलगरा दिवटी, जळकोट व अणदूर येथे गुटखा विक्रीचे मुख्य एजंट कार्यरत असून त्यांच्या माध्यमातून संपूर्ण तालुक्यात गुटखा पोहोचवला जात असल्याची चर्चा आहे. संबंधित विभागाने या एजंटांच्या मुसक्या आवळून मुख्य गुटखा विक्रेत्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



राज्यात लाखो युवक गुटखा व्यसनाच्या आहारी गेले असून तोंडाच्या कर्करोगासारख्या गंभीर आजारांचे प्रमाण वाढत असल्याची चिंताजनक स्थिती आहे.

धोकादायक रासायनिक पदार्थांचा वापर करून तयार होणाऱ्या गुटख्यामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने गुटखा विक्रीवर बंदी घातली असली तरी प्रत्यक्षात ही बंदी केवळ कागदावरच असल्याचे चित्र दिसत आहे. नळदुर्ग शहरासह तालुक्यातील अनेक खेड्यांमध्ये गुटख्याची पुडी सहज उपलब्ध होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. बंदीची अंमलबजावणी करण्यासाठी असलेली यंत्रणा नेमकी काय करत आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. मागील अधिवेशनात संबंधित खात्याचे मंत्री नरहारी झिरवाळ यांनी गुटखा विक्रेत्यांवर मकोका लावण्याचा इशारा दिला होता. मात्र त्याचा प्रत्यक्षात काहीही परिणाम झाल्याचे दिसत नाही.

गुटखा विक्रेते निर्भयपणे व्यवसाय करत असल्याने यामागे नेमके कोणाचे पाठबळ आहे, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

तालुक्यातील विविध ठिकाणी मुख्य विक्रेत्यांनी एजंट नेमले असून हे एजंट मोटारसायकलवरून गुटख्याची वाहतूक करून पानटपऱ्या व किरकोळ दुकानांमध्ये पुरवठा करतात, असे सांगितले जाते.

या बेकायदेशीर प्रकाराला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासन, पोलीस व महसूल विभागाने संयुक्त कारवाई करून दोषींवर कठोर पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. तसेच बंदीची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यास संबंधित यंत्रणेवरही जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी पुढे येत आहे.

## लोककला केंद्रावर सशस्त्र दरोडा; ९.५१ लाखांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.४ मार्च -**

परिसरातील चोराखळी (ता. कळंब) येथे पहाटेच्या सुमारास सशस्त्र दरोड्याची थरारक घटना घडली असून, कालिका सांस्कृतिक लोकनाट्य कलाकेंद्राच्या संचालिका निर्मला मोहन जाधव (वय ४५) यांच्या घरी सहा जणांनी घुसखोरी करून तब्बल ९ लाख ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून याप्रकरणी येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यानंतर आरोपींनी निर्मला जाधव यांच्या अंगावरील सुमारे १२१.६०० ग्रॅम वजनाचे अंदाजे ६ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, चार मोबाईल फोन (किंमत सुमारे ३ लाख ४९ हजार रुपये) तसेच सीसीटीव्ही डीव्हीआर असा एकूण ९ लाख ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

दोघांनी शिवम गंगावणे याला जमिनीवर दाबून धरले, एकाने निर्मला जाधव यांच्या डोक्याला पिस्तूल लावले, तर दुसऱ्याने रेखा शिंदे यांच्या गळ्याला लोखंडी सुरा लावून धमकी दिली.

आरडाओरड केल्याने आरोपींनी तिघांच्या डोळ्यांत चटणी टाकून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.